मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषद

नियतकालिक

(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

भारतीय सौर आश्विन–पौष १९४१

ऑक्टो.–डिसेंबर २०१९ / खंड ४३, अंक ३

# HAPPY NEW YEAR
# 2020

## Dr. Mrs. Sonal Shivanand Kore

MBBS, Diploma in Radiology (DMRE)
Cell : 9028809337
E-mail : sonalkore86@gmail.com

- DMRE from Walness Hospital, Miraj.
- Worked as Junior Registrar at GMCH, Miraj

## Dr. Shivanand Maruti Kore

MD Anaesthesiology
Cell : 9422613514, 8788099329
E-mail : shivakorex@gmail.com

- MD Anaesthesiology, JJ Hospital, Mumbai.
- Ex. Assistant Professor, RCSM GMC, Kolhapur.
- Ex. Senior Registrar, ICU, Deenanath Mangeshkar Hospital, Pune

310, Shivalaya, Radha-Krishna Extension,
Opposite ST Stand, Sangli 416416

सौजन्य : बी. जी. कोरे

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।
www.marthpari.org
(स्थापना वर्ष - १९७७)

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

# अर्थसंवाद

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452
ऑक्टों.- नोव्हें. -डिसेंबर २०१९/ खंड ४३ / अंक ३

**प्रमुख संपादक**
**राहुल शं. म्होपरे**
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

**सहाय्यक संपादक**
**चंद्रकांत जाधव**
(य.च.वारणा महाविद्यालय,वारणा नगर)

**सल्लागार मंडळ**
**(२०१८-२१)**
**जनार्दन काकडे**
**राजू शिंदे**
**अजय दरेकर**
**मोहन सदामते**

**संपादकीय पत्रव्यवहार**
**राहुल शं. म्होपरे**
विद्यापीठ क्वार्टर नं. डी-३४,
सायबरसमोर,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
ता. करवीर, जि. कोल्हापूर
पिन : ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**लेखातील मते लेखकांचीच**

## अ नु क्र म णि का

१. रामदास यशवंतराव माहोरे :
आरोग्याचे अर्थशास्त्र ........................................ २१७

२. श्रीनिवास खांदेवाले :
भारतातील मंदी-२०१९-२० : कारणे व उपायांचे विश्लेषण... २२९

३. प्रशांत हरमकर :
२०१९ चे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक
दारिद्र्याशी लढा देणाऱ्या संशोधनाला ........................ २३७

४. जे.एस.इंगळे :
राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे
तत्कालीन इंदूर राज्याच्या विकासातील योगदान .............. २४९

५. पी. एस. कांबळे :
सामाजिक समावेशक शिक्षण आणि विकास
कृतिशील धोरणकर्ता : छ. शाहू महाराज ..................... २६६

६. गजानन भा. पाटील :
भारतातील बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची
सुवर्ण महोत्सवी ५० वर्षे .................................. २७४

७. मंजुषा मुसमाडे : (पुस्तक परिचय)
'लोकसंख्याशास्त्र' २०१९ .................................. २८४

८. जे. एफ. पाटील : (अर्थ शब्दांची वाट पाहे...)
जागतिक भूक निर्देशांक .................................... २८६

९. शि. ना. माने : (प्रतिक्रिया)
प्रतिक्रिया - अर्थसंवाद ...................................... २८८

१०. आर बी. भांडवलकर
अहवाल ....................................................... २९०

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### कार्यकारी मंडळ २०१९-२०

- **अध्यक्ष**

  **रामदास यशवंतराव माहोरे (नागपूर)**

- **कार्याध्यक्ष**

  **कैलास के. पाटील (परभणी)**

- **कार्यवाह खजिनदार**

  **रामदास बापूराव भांडवलकर (यवतमाळ)**

- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

  **राहुल शंकरराव म्होपरे (कोल्हापूर)**

- **विश्वस्त**

  **जगन्नाथ पाटील (सातारा)**
  **आप्पासाहेब पुजारी (मंगळवेढा)**
  **रामकृष्ण टाले (नागपूर)**

- **सदस्य**

  **महादेव पाटील (मिरज-सांगली)**
  **संतोष कदम (सोलापूर)**
  **सुभाष पाटील (पुणे)**
  **विनोद गावंडे (अमरावती)**
  **अशोकगीर गोस्वामी (भुसावळ)**
  **मारोती तेगमपुरे (अंबड)**
  **विजय भोपाळे (नांदेड)**
  **स्नेहा देशपांडे (नागपुर)**
  **बळवंत कोरे (कराड)**
  **गणेश मांगडे (दापोली)**
  **माधव शिंदे (अहमदनगर)**

- **स्वीकृत सदस्य**

  **सुरेश भास्कर ढाके (भुसावळ)**
  **शिवाजी कारभारी ढगे (पिंपळगाव)**

- **स्थानिक कार्यवाह**

  **प्रितम प्रवीन कोठारी (सोलापूर)**



### कार्यालयीन पत्रव्यवहार:

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **आर. बी. भांडवलकर**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गजानन नगर, पिंपळगाव रोड, यवतमाळ - ४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६


### अर्थसंवाद वर्गणी :

- **परिषदेचे सदस्य :**

  आजीव सदस्य : रु.३०००/- (एकरकमी)
  इमारत निधी : रु.२०००/-
  सदस्य सूची : रु. १००/-
  एकूण : रु. ५१००/-

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

  शैक्षणिक संस्था : रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  व्यावसायिक संस्था : रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  ग्रंथालये : रु.१५००/-(पंचवार्षिक)

- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व **वार्षिक वर्गणी** स्वीकारली जात नाही.


### अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.


टिप: म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.


हे त्रैमासिक, प्रकाशक आर. बी. भांडवलकर (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहुपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गजानन नगर, पिंपळगाव रोड, यवतमाळ - ४४५ ००१ येथे प्रसिद्ध केले.

# आरोग्याचे अर्थशास्त्र

**रामदास यशवंतराव माहोरे** †

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४३वे राष्ट्रीय अधिवेशन, अभिजीत कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड सोशल सायन्सेस, सोलापूर दि. ३१ ऑक्टोबर, ०१ व ०२ नोव्हेंबर २०१९ दरम्यान संपन्न झाले. या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणाचा सारांश.

**प्रस्तावना :**

मी अध्यक्षीय भाषणासाठी आरोग्याचे अर्थशास्त्र या विषयाची निवड केली आहे. दिवसेंदिवस आरोग्याच्या समस्या वाढत आहेत. आरोग्य आणि अर्थशास्त्र यामधील संबंध स्पष्ट करण्याच्या दृष्टीने मी प्रयत्न केला आहे. आरोग्याचे अर्थशास्त्र यामध्ये दोन शब्द आहेत. ते म्हणजे आरोग्य आणि अर्थशास्त्र, या दोन्ही संकल्पनांचा अर्थ समजून घेतल्यानंतर आपणास आरोग्याचे अर्थशास्त्र याविषयी अधिक माहिती प्राप्त होते. जागतिक आरोग्य संघटनेने आरोग्याची व्यापक अर्थाने व्याख्या केली आहे. 'आरोग्य म्हणजे केवळ रोग किंवा दुर्बलतेचा अभाव नसून शारीरिक, मानसिक आणि सामाजिकदृष्ट्या पूर्णत: चांगली स्थिती होय.'

'आरोग्याचे अर्थशास्त्र म्हणजे आजारी व्यक्तीवर उपचार करणे, देशातील लोकांच्या आरोग्याचा स्तर जोपासणे, संवर्धित करणे आणि सुधारित करणे याकरिता पर्यायी उपयोगाच्या दुर्मिळ साधनांचा मेळ घालण्याचा प्रयत्न करणारे शास्त्र होय.' आरोग्याचे अर्थशास्त्र म्हणजे अर्थशास्त्राचे सिद्धांत, संकल्पना आणि तंत्राचा आरोग्याच्या क्षेत्रात उपयोग करणे होय. धोरणकर्त्यांना निर्णय निर्धारणासाठी आरोग्याचे अर्थशास्त्र अधिक उपयुक्त ठरते. आरोग्याच्या अर्थशास्त्रासंबंधी सर्वप्रथम लिखाण व्यापारवादी विचारवंत सर विल्यम पेट्टी यांनी १७ व्या शतकात केले होते (Sen, 1968).

मॉरिस, डेवलिन पार्किन आणि स्पेन्सर (Morris, 2012) यांच्या मते, ''आरोग्याचे अर्थशास्त्र म्हणजे आर्थिक सिद्धांत, प्रारूपे आणि अनुभवजन्य तंत्राचे वैयक्तिक निर्णय निर्धारण, आरोग्यनिगा प्रदान करणारे आणि सरकारचे आरोग्य आणि आरोग्यनिगेसंबंधी विश्लेषणाचे उपयोजन होय.''

आरोग्य आणि इतर वस्तू यामध्ये संकल्पनात्मक फरक स्पष्ट करून नोबेल पारितोषिक विजेते अर्थशास्त्रज्ञ केनेथ ॲरो (Arrow, 1963) यांना

† अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, आजीव सभासद क्र. ३२०, भ्रमणध्वनी - ९८२२७०६१९१,
ई-मेल -drrymahore@yahoomail.com

आरोग्याचे अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची स्वतंत्र शाखा विकसित करण्याचे श्रेय दिले जाते. आरोग्य क्षेत्रातील अनिश्चितेवर त्यांनी भर दिला. आरोग्य निगेच्या मागणी व पुरवठ्यात अनिश्चितता असते. आपल्या आरोग्याची स्थिती आणि आरोग्याच्या भविष्यकालीन आवश्यकते-संबंधी उपभोक्ते अनिश्चित असतात. याचा अर्थ उपभोक्त्यांच्यादृष्टीने आरोग्य निगेची मागणी अनियमित असते. पुरवठ्याच्या बाजूने सुद्धा अनिश्चितता आढळून येते. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार विविध उपचारांपासून उपभोक्त्याला कोणता फायदा झाला हे सांगता येत नाही. डॉ. ॲरो यांच्या मते आरोग्याच्या अर्थशास्त्रात अनिश्चितता महत्त्वाची असून आरोग्यविषयक समस्यांच्या पूर्ण विश्लेषणासाठी आर्थिक विश्लेषणातील अनिश्चितता आणि जोखीम या घटकांचा उपयोग अनिवार्य ठरतो.

आरोग्याचे अर्थशास्त्रज्ञ, व्यय, आकारलेले शुल्क आणि खर्च इत्यादी विविध वित्तीय माहितीचे मूल्यांकन करतात. डॉक्टर आणि रोगी यांच्यामध्ये ज्ञानासंबंधी बरीच तफावत असते. यामुळे निर्माण होणारी स्थिती डॉक्टरांसाठी अधिक फायदेशीर असते. या स्थितीला विषम माहितीची अवस्था म्हटले जाते. संसर्गजन्य रोगाच्या संदर्भात आरोग्य आणि आरोग्याच्या निगेबाबत वारंवार बाह्यता निर्माण होतात. आरोग्याचे अर्थशास्त्र एका बाजूने आरोग्याची उद्दिष्ट्ये आणि दुसऱ्या बाजूने ती साध्य करण्यासाठी आवश्यक असणारी वित्तीय तरतूद यामधील संबंधाचा अभ्यास करणारे शास्त्र होय. यामध्ये वैद्यकशास्त्र आणि अर्थशास्त्र अशा दोन शास्त्राचा समन्वय साधण्यात आला आहे.

**आरोग्य अर्थशास्त्राच्या अध्ययनाची क्षेत्रे**

ॲलन विल्यम यांनी आरोग्याच्या अर्थशास्त्राचे अध्ययन करण्यासाठी खालील क्षेत्रे सुचविली आहेत.

**१. आरोग्यावर परिणाम करणारे घटक**

जागतिक आरोग्य संघटनेने आरोग्याच्या तीन उद्दिष्टांवर भर दिला आहे. यात सामाजिक, शारीरिक आणि मानसिक आरोग्याचा समावेश होतो. आरोग्य संपन्न सामाजिक जीवन जगणे हा प्रत्येक व्यक्तीचा अधिकार आहे. त्यासाठी योग्य परिस्थिती निर्माण करणे सरकारचे कर्तव्य ठरते.

**२. आरोग्य म्हणजे काय? त्याचे महत्त्व कोणते?**

आरोग्य म्हणजे रोगाचा अभाव होय. ज्या व्यक्तीचे जीवन आरोग्यदायी आहे त्याला चांगले जीवन जगता येते. परंतु ज्या व्यक्तीचे आरोग्य चांगले नाही, त्याला सुखी जीवन जगता येत नाही. त्याच्या जीवनातील कमतरता दूर होईल या आशेवर तो जीवन जगतो. शारीरिक आरोग्य चांगले असले तर मानसिक आरोग्यसुद्धा चांगले राहते.

**३. आरोग्य निगेची मागणी**

आरोग्य निगेची मागणी करणाऱ्या उपभोक्त्यांचा उद्देश आरोग्य भांडवलात भर टाकणे असतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, व्यक्ती आरोग्य निगेमध्ये चार प्रकारची भूमिका पार पाडते. ती म्हणजे योगदानात्मक, नागरिक म्हणून आरोग्य सेवा प्रदान करण्याची भूमिका आणि आरोग्यसेवेचा उपभोक्ता. आरोग्य हे साठ्याच्या स्वरूपात असते. प्राचीन काळी आयुर्वेद आयुष्याचे शास्त्र मानले जात होते. काही रुग्ण ॲलोपॅथी, होमिओपॅथी, युनानी, योग, सिद्ध, निसर्गोपचार इत्यादी पद्धतींच्या उपचारांची मागणी करतात.

**४. आरोग्य निगेचा पुरवठा**

बाजारातील आरोग्य निगेचा पुरवठा उत्पादनावर अवलंबून असतो. आरोग्य निगेचा पुरवठा बाजाराच्या प्रकारावर अवलंबून असतो. जेव्हा जास्त संस्था आरोग्यसेवा प्रदान करतात तेव्हा त्यांना जास्त नफा

मिळणार नाही. एकाधिकारी पेढी जास्त किमतीला वस्तू विकते त्याचप्रमाणे आरोग्यसेवा प्रदान करणारी एकच संस्था असेल तर ती जास्त नफा मिळवू शकते.

**५. उपचारात्मक पातळीचे सूक्ष्म आर्थिक मूल्यमापन**

रोगाचे निदान करून डॉक्टर औषधोपचार करतात. ॲलोपॅथी आणि आयुर्वेदापेक्षा होमिओपॅथी औषधोपचार पद्धतीत औषधावर होणारा खर्च फारच कमी असतो. हकीम नाडी परीक्षण करून औषधोपचार करतात. ॲलोपॅथी पद्धतीने औषधोपचार करणाऱ्या रोग्यांची संख्या सर्वात जास्त आहे. या पद्धतीत रोग निदान, योग्य उपचार आणि रोगी पूर्णतः चांगला करणे इत्यादी बाबींचा समावेश होतो.

**६. बाजार संतुलन**

बाजार संतुलन आरोग्याची मागणी आणि पुरवठ्यावर अवलंबून असते. मागणी नियमानुसार कमी किमतीला जास्त सेवांची मागणी केली जाते तर जास्त किमतीला कमी सेवांची मागणी केली जाते. परंतु आरोग्याच्या बाबतीत असे आढळत नाही. रोगी बरा व्हावा अशी अपेक्षा असते म्हणून तो आपल्या आर्थिक परिस्थितीनुसार आरोग्यसेवांची मागणी करतो.

**७. संपूर्ण व्यवस्थेचे मूल्यमापन**

आरोग्यविषयक संपूर्ण व्यवस्थेचे मूल्यमापन करण्यासाठी पाच प्रकारच्या आरोग्यविषयक बाजारांचे अध्ययन करावे लागते. यात अ) आरोग्यनिगेसाठी वित्तीय बाजार म्हणजे आरोग्यासाठी वित्ताची मागणी व पुरवठा ब) डॉक्टर्स आणि नर्सेसची मागणी व पुरवठा क) आरोग्य सेवा प्रदान करणाऱ्या संस्थात्मक सेवांची मागणी व पुरवठा ड) आरोग्यसेवांसाठी लागणाऱ्या उपकरणांची मागणी व पुरवठा ई) व्यावसायिक शिक्षणाची मागणी व पुरवठा.

सन २००० पर्यंत 'सर्वांसाठी आरोग्य' अशी घोषणा १९७८ मध्ये आल्माआटा परिषदेत करण्यात आली होती. परंतु आजही वरील घोषणेची पूर्तता झालेली नाही. प्राथमिक स्तरावर प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रे आरोग्यसेवा प्रदान करतात. मध्यम स्तरावर प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या जिल्हा रुग्णालयाद्वारे आरोग्यसेवा प्रदान केल्या जातात. उच्चस्तरावर शहरी भागातील वैद्यकीय महाविद्यालयातील दवाखाने, विशेष चिकित्सा रुग्णालये, विशेषीकृत रुग्णालये आरोग्यसेवा प्रदान करतात.

**८. नियोजन, अर्थसंकल्पन आणि संनियंत्रण यंत्रणा**

हा आरोग्याच्या व्याप्तीचा महत्त्वाचा घटक आहे. भारतीय नियोजनाच्या १२ पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्या आहेत. अर्थसंकल्पात आरोग्यविषयक उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी खर्चाची तरतूद केली जाते यालाच अर्थसंकल्पन म्हणतात. त्या कार्यक्रमाची योग्य अंमलबजावणी करावी लागते. कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतून किती उद्दिष्ट्ये साध्य झाली याविषयीचे मूल्यमापन संनियंत्रण विभागाद्वारे केले जाते. आरोग्याच्या अर्थशास्त्राची व्याप्ती व्यापक आहे. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाशी निगडित असे हे शास्त्र आहे. या शास्त्राच्या विकासाला बराच वाव आहे.

**आरोग्याच्या अर्थशास्त्राचे स्वरूप**

अमेरिकेत सन २०१० मध्ये ''Patient Protection and Affordable Care Act ¼ PPACA½ '' संमत झाला. सन १९९० नंतर आरोग्याच्या अर्थशास्त्राचे स्वरूप बदलले. अमेरिकन अर्थव्यवस्थेत आरोग्यावर जीडीपीच्या १६% खर्च केला जातो. आरोग्य, आरोग्यनिगेवरील खर्च आणि आरोग्य विम्याने अमेरिका आणि इतर देशातील आर्थिक आणि राजकीय क्षेत्रावर वर्चस्व प्रस्थापित केले आहे. आरोग्याच्या निगेचे क्षेत्र अमेरिकन अर्थव्यवस्थेत फार मोठे आहे. अमेरिकेचा आरोग्यावरील दरडोई खर्च जगात सर्वात

जास्त आहे. आरोग्यनिगेवरील खर्च सामान्यता आणि तंत्रज्ञानाधिष्ठित खर्च विशेषता सर्वच राष्ट्रांसाठी यथार्थ मानले जातात. आरोग्याच्या अर्थशास्त्राने आरोग्यसेवांच्या तरतुदीसंबंधी माहिती उपलब्ध करून दिली पाहिजे.

**आरोग्याच्या अर्थशास्त्राचे महत्त्व**

आरोग्याच्या अर्थशास्त्राच्या अध्ययनाचे महत्त्व खालीलप्रमाणे आहे.

१. आरोग्य क्षेत्राची अर्थव्यवस्थेतील व्याप्ती जीडीपीच्या किती प्रमाणात आरोग्यावर खर्च होतो यावर अवलंबून असते.

२. आरोग्याची निगा राखताना आर्थिक प्रश्न निर्माण होतो.

३. आरोग्यविषयक अनेक समस्या सोडविण्यासाठी आर्थिक तरतूद महत्त्वाची ठरते.

**आरोग्य अर्थव्यवस्थेतील श्रम व भांडवल**

अमेरिकेत आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांचे प्रमाण ४०.५% होते. जर आरोग्यावरील खर्चात कपात केली तर तेथील रोजगारात कपात होते. ज्येष्ठ व्यक्तींची जर शुश्रूषा केली तर त्याचा वैकल्पिक खर्च किती याचेही मोजमाप करण्याचा प्रयत्न केला. प्रौढांच्या सेवेसाठी दररोज दोन तास आठवडाभर सेवा केली तर १४ तास होतात. त्या सेवेचे मूल्य बाजारातील वेतनानुसार १५ डॉलर प्रति तास मानले जाते. म्हणजे एका वर्षासाठी १०,५०० डॉलरच्या सेवा दिल्या जातात. अमेरिकेत अति उच्च तंत्रज्ञानावर आधारित आरोग्य सेवांचे शुल्क बरेच जास्त आहे. विमा, तंत्रज्ञान आणि सेवांचा उपभोग यातील परस्परसंबंध अर्थशास्त्रज्ञांच्यादृष्टीने महत्त्वपूर्ण मानले जातात. (Folland S. A., 2013)

**आरोग्य अर्थशास्त्र विश्लेषणाची उदाहरणे**

मिल्टन फ्रीडमन आणि सायमन कुझनेट्स (Milton Friedman & Simon Kuznets, 1945) या दोन्ही नोबेल पारितोषिक विजेत्यांनी १९३० च्या दशकातील डॉक्टर्सच्या कमतरतेचे अध्ययन केले होते. त्यांनी असा निष्कर्ष काढला होता की, डॉक्टर्स हे दंतवैद्यकांच्या तुलनेत दरवर्षी ३२ टक्के जास्त प्राप्ती करतात; तर त्यांचा शिक्षणावरील खर्च दंतवैद्यकांच्या तुलनेत १७% जास्त असतो. तसेच डॉक्टरांची गुंतवणूक जास्त असल्यामुळे त्यांना मिळणाऱ्या परताव्याचा दर जास्त असतो. १९५८ मध्ये केसेल (Kessel, 1958) यांनी असे दर्शविले होते की डॉक्टर्स गरिबांकडून कमी फी घेतात. ही एक प्रकारची समाजसेवा आहे. केसेल यांनी असे प्रतिपादन केले होते की, डॉक्टरांनी दवाखान्यांच्या विशेषाधिकार प्रणालीचा अवलंब करून, मूल्य विभेदनाला चालना दिली होती. यावरून आरोग्याच्या अर्थशास्त्राची दोन वैशिष्ट्ये स्पष्ट होतात. एक, आरोग्य संशोधनाचे स्वरूप आंतरशाखीय आहे आणि दोन, आरोग्य निगा प्रणालीमधील संस्था महत्त्वपूर्ण मानल्या जातात.

**आर्थिक कार्यक्षमता आणि व्यय-लाभ विश्लेषण**

आर्थिक साधने मर्यादित असल्यामुळे आरोग्यावरील खर्चांसाठी निवडीचा प्रश्न निर्माण होतो. सरकारला योग्य पर्यायाची निवड करावी लागते. जास्त खर्च प्रतिबंधात्मक आरोग्य निगेवर करावा किंवा प्राणघातक रोगांवर करावा किंवा आरोग्य संशोधनावर करावा यासंबंधीचा निर्णय विवेकपूर्ण असला पाहिजे. व्यय-लाभ विश्लेषणात सीमांत विश्लेषणाचा उपयोग केला जातो. ज्या ठिकाणी सीमांत सामाजिक लाभ हा सीमांत सामाजिक व्ययाबरोबर होतो तेव्हा समाजाला महत्तम फायदे मिळतात. आरोग्य निगेमध्ये नाकारता न येणारे कार्य म्हणजे व्यय-लाभ विश्लेषणाच्या आधारे मानवी जीवनाचे मूल्य निर्धारित करणे होय. यासाठी विविध दृष्टिकोनाचा विचार

करण्यात आला. डेव्हिड कटलर (Cutler, 2007) यांनी अमेरिकेच्या संदर्भात हृदयरोगावर होणाऱ्या शस्त्रक्रियेचे लाभ-व्यय विश्लेषण केले. त्यांनी असा निष्कर्ष काढला की रुग्णाला खर्चाच्या तुलनेत अधिक लाभ प्राप्त होतो. उत्पादन फलनात आदान आणि प्रदानाचा संबंध महत्त्वाचा असतो. आरोग्यनिगेमध्ये आरोग्याच्या अनेक घटकांचा समावेश होतो. यात डॉक्टरांच्या सेवा तसेच इतर व्यावसायिकांच्या सेवांचा अंतर्भाव होतो (Cochrane, 1972).

**औषधांची भूमिका आणि आरोग्यनिगा**

औषधांमुळे लोकसंख्येच्या मृत्युदरात घट झाली आहे. काहींच्या मते पोषणात्मक सुधारणांमुळे मृत्युदरात घट झाली. वैद्यकीय इतिहासतज्ञ थॉमस मॅकेओन (McKeown, 1976) आणि आर्थिक इतिहासतज्ञ रॉबर्ट फोगेल (Fogel, 2004) यांच्या मते, मृत्युदरात झालेली घट मुख्यत्वेकरून पोषणात्मक सुधारणांमुळे झाली. आरोग्याच्यादृष्टीने वैद्यकीय संशोधनावरील गुंतवणूक महत्त्वपूर्ण ठरते. मर्फी आणि टोपेल (Murphy, 2005) यांच्या मते, लोकांच्या खर्च करण्याच्या इच्छेमुळे वैद्यकीय ज्ञान वृद्धिंगत झाले. आर्थिक विवेचनात अर्थशास्त्रज्ञांनी जीवनशैली आणि आरोग्याचा दर्जा हे दोन्ही घटक महत्त्वाचे मानले आहेत. धूम्रपान, व्यायाम आणि पुरेशी झोप या तीन घटकांमुळे आरोग्यात सुधारणा होते (हॅडली १९८२).

**सामाजिक भांडवल आणि आरोग्य**

अलीकडील संशोधनावरून असे आढळून आले की, कुटुंब, मित्र आणि समाज यावरच वैयक्तिक आणि सामाजिक आरोग्य अवलंबून असते. व्यक्तींचे सामाजिक संपर्काचे जाळे किंवा समाजाचे गुंतागुंतीचे सरमिसळीचे जाळे यांना आपण सामाजिक भांडवल संबोधतो. सामाजिक भांडवलाचा आरोग्यावर परिणाम घडून येतो. (Islam, 2006) यासंबंधीचे निष्कर्ष राजकीयतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ आणि वैद्यकीय संशोधकांनी काढले आहेत. आरोग्याच्या अर्थशास्त्रज्ञांनी यावर आपले लक्ष केंद्रित केले आहे. सामाजिक भांडवलात सुधारणा झाली तर आरोग्यात सुधारणा घडून येते असा निष्कर्ष त्यांनी काढला. (Folland S., 2006)

**उत्पन्न, शिक्षण आणि आरोग्य**

उत्पन्न जास्त असूनही अमेरिका आणि इंग्लंड या देशातील उत्पन्न आणि आरोग्यातील संबंध गुंतागुंतीचे आणि परस्परविरोधी होते. त्यामुळे आरोग्या-वरील गुंतवणूक वाढते. शिक्षित व्यक्तींना चांगल्या आरोग्याच्या फायद्याची जाणीव असते. ते पोषक आहार आणि व्यायामाद्वारे आरोग्यसंपन्न जीवन जगू शकतात. शिक्षणाचा आरोग्यावर अनुकूल परिणाम घडून येतो. (Lleras-Muney, 2005)

**रुग्णालयाच्या कार्यक्षमतेसंबंधी अभ्यास**

अमेरिकेमध्ये रुग्णालयाच्या कार्यक्षमतेसंबंधी अनेक अभ्यास करण्यात आले. अमेरिकेतील रुग्णालय अधिक कार्यक्षम आहे. खर्च अधिक असला तरी रुग्णालयाच्या कार्यक्षमतेवर टीका करता येत नाही. दवाखान्यातील मृत्यूदर जास्त असेल तर गुणवत्ता निम्न प्रतीची आहे असे म्हणता येईल. (Street, 2003)-

परंपरागत मागणी दृष्टिकोनापेक्षा आरोग्याचा मागणी दृष्टिकोन भिन्न आहे.

अ) उपभोक्ता वैद्यकीय निगेची मागणी करीत नसून तो आरोग्याची मागणी करतो.

ब) उपभोक्ते बाजारातून आरोग्य केवळ निष्क्रियपणे खरेदी करीत नाहीत.

क) चांगले आरोग्य अधिक काळ टिकते.

ड) आरोग्य हे उपभोग्य वस्तू आणि भांडवली वस्तू अशा दोन्ही प्रकारचे मानले जाते.

इ) आरोग्यही भांडवली वस्तू मानली जाते कारण त्यामुळे आरोग्य संपन्न दिवसांमध्ये वाढ होते.

### आरोग्यात डॉक्टरांची भूमिका

डॉक्टर आरोग्यनिगा उत्पादनात महत्त्वाची भूमिका पार पाडतात. डॉक्टर आरोग्यनिगेसंबंधीचे निर्णय स्वत: घेतात किंवा समूहाद्वारे घेतात. बेंचमार्क प्रारूपानुसार डॉक्टरचा उद्देश नफा मिळविणे असतो. (Pauly, 1980) वैद्यकीय शिक्षणापासून मिळणारा परताव्याचा दर धोरणाच्या निर्धारणासाठी उपयुक्त ठरतो. रेनहार्ड (Reinhardt, 1972) यांनी डॉक्टरांच्या उत्पादकतेचे मापन करण्याचा प्रयत्न केला.

### वाईटाचे आरोग्य अर्थशास्त्र (Health Economics of Bads)

आपण आरोग्याच्या दृष्टीने चांगल्या गोष्टींचा स्वीकार करतो. तसेच आपण आरोग्यासाठी हानीकारक बाबींच्या वापरावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतो. उदा. अल्कोहोलच्या उपयोगावर नियंत्रण, सिगारेट व ड्रग्जच्या वापरावर नियंत्रण इत्यादी. सिगारेटमुळे श्‍वसनाच्या कर्करोगात वाढ होते. अर्थमिती अभ्यासावरून असे स्पष्ट होते की, सिगारेट पिण्यामुळे मृत्युदरात वाढ होते. लेव्हीट आणि पोर्टर (Levitt, 1999) यांच्या अभ्यासावरून असे स्पष्ट होते की, अल्कोहोलसारख्या मादक पदार्थांचा उपभोग घेतलेल्या ड्रायव्हरकडून सामान्य ड्रायव्हरपेक्षा अपघाताची शक्यता आठपट जास्त असते. अमेरिकेत मानसशास्त्रज्ञ, वैद्यकीय-शास्त्रज्ञ आणि अर्थशास्त्रज्ञांनी व्यसनाधिनतेची तीन प्रारूपे विकसित केली आहेत.

### धूम्रपानाचे वैद्यकीय आणि सामाजिक परिणाम

आरोग्याच्या अर्थशास्त्रज्ञांनी असे मत मांडले की, आरोग्यासाठी ज्या गोष्टी वाईट आहेत त्यावर परिणाम करणारे घटक म्हणजे किमती, कर आणि जाहिराती होत. सफेर आणि दवे (Saffer, 2005) यांनी असा निष्कर्ष काढला की, मानसिक आजारामुळे व्यसनाधिनतेत वाढ होते. सामाजिक प्रभावाची सुद्धा महत्त्वपूर्ण भूमिका आहे. फोलंड (Folland S. , 2008) यांच्या अभ्यासावरून असे स्पष्ट होते की, ज्या व्यक्तीवर सामाजिक प्रभाव जास्त आहे त्या व्यक्ती धूम्रपान कमी करतात.

### इंग्लंडमधील आरोग्यनिगेवरील खर्च

वैद्यकीय शास्त्रात सतत नवनवीन संशोधन होत आहे. आरोग्यविषयक तंत्रज्ञानामुळे आरोग्यनिगेवरील खर्च वाढत आहे. ज्येष्ठ नागरिकांची आरोग्यविषयक सेवांची मागणी वाढत आहे. २००५ मध्ये इंग्लंडमध्ये २५लक्ष(४%) लोकसंख्या ८० वर्षे व त्यावरील वयोगटातील होती. २०३१ पर्यंत ही लोकसंख्या ५० लाख (७.६%); तर २०७१ मध्ये ही लोकसंख्या (११%) पर्यंत वाढणार आहे. याउलट कर्त्या लोकसंख्येच्या प्रमाणात घट होणार आहे. २००५ मध्ये ३.८ कोटी (६४%), २०३१ मध्ये ३.८ कोटी (५९%) आणि २०७१ मध्ये ३.७ कोटी (५७%) अपेक्षित आहे.

इंग्लंडमधील आरोग्यावरील दरडोई खर्च २००२ मध्ये १२०० पौंड होता. ३० वर्षांपूर्वी तो ५८ पौंड होता. राष्ट्रीय आरोग्यसेवेत १२ लक्ष कर्मचारी कार्यरत होते. ४० वर्षांपूर्वी ही संख्या ६ लक्ष होती. आरोग्याच्या सोयी वाढल्यामुळे सरासरी आयुर्मानात वाढ झाली आहे. यॉर्क विद्यापीठातील आरोग्याच्या अर्थशास्त्राचे प्राध्यापक ॲलन विल्यम (Office of National Statistics, 2005) यांनी असे सुचविले होते की, मर्यादित साधनांच्या पद्धतीमध्ये आरोग्य व्यावसायिकांचे कर्तव्य म्हणजे फक्त चांगल्या सेवा प्रदान करणे नसून तेवढ्याच साधनांच्या साहाय्याने त्यापेक्षा अधिक चांगल्या सेवा त्यांनी प्रदान केल्या पाहिजेत.

१९४५ मध्ये इंग्लंडमध्ये राष्ट्रीय आरोग्य सेवेची निर्मिती करण्यात आली की जेव्हा आर्थिक धोरणात मूलभूत बदल घडून आले होते. डोनाल्डसन आणि

जिरार्ड (Donaldson C, 1993) यांनी असे प्रतिपादित केले होते की आरोग्याची समानता प्रस्थापित करणे कठीण आहे. त्यांनी असे म्हटले होते की, याकरिता अशा धोरणांचा अवलंब करावा की ज्यामुळे आरोग्याऐवजी आरोग्यनिगेची समानता प्रस्थापित होईल. समांतर, समता आणि उर्ध्व समता यामध्ये फरक आहे. समांतर समतेनुसार समानांना समान उपचार पद्धती उपलब्ध करून देणे होय. उर्ध्व समता म्हणजे असमानांना असमान उपचार पद्धती होय. (Mooney, 1992) समाजातील नागरिकांच्या आरोग्याची स्थिती ही पर्यावरण, सामाजिक दर्जा, शैक्षणिक पातळी, राहण्याचे ठिकाण, वय, लिंग इत्यादींवर अवलंबून असते. यावरच सरासरी आयुर्मान अवलंबून असते. (Mitton, 2004) विभिन्न देशात सरासरी आयुर्मानात बरीच तफावत आढळते. आरोग्याच्या सेवांमध्ये देखील बरीच विषमता आढळून येते. जपानचा आरोग्यावरील खर्च स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ७% होता. जपानचे सरासरी आयुर्मान ८२ वर्षे होते. अमेरिकेपेक्षा ते ४ वर्षांनी जास्त होते. (Gould, 2004)

मॅथर्स आणि शोफील्ड (Mathers, 1998) यांनी असे प्रतिपादन केले होते की, बेरोजगारी ही आरोग्या-साठी फार विघातक आहे. त्यामुळे मृत्युदरात वाढ होते. सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या व्यक्तींचा आरोग्याचा दर्जा निम्नप्रतीचा असतो. त्यांचे सरासरी आयुर्मान कमी असते आणि ते आरोग्यसेवांचा जास्त उपयोग घेतात. (Department of Health and Social Security, 1980) सरकारला कोणत्या रोगाच्या उपचारासाठी अधिक तरतूद करावयाची यासाठी निवडीचा प्रश्न निर्माण होतो. या बाबतीत आरोग्य अर्थशास्त्रज्ञ मार्गदर्शन करू शकत नाही. जेव्हा आपण आरोग्यसेवांवर खर्च करतो तेव्हा त्या खर्चापासून अपेक्षित फायदा मिळाला पाहिजे अशी अपेक्षा करतो. (Philips, 2005) ॲलन विल्यमच्या (Williams, 1990) मते, कार्यक्षम असणे नैतिक उत्तरदायित्व असले तरी व्यवस्थापकीयदृष्ट्या सोयीस्कर नसते. कार्यक्षम नसणे म्हणजे टाळता येण्याजोगे मृत्यू लादणे होय. त्यामुळे लोकांच्या दु:खात अनावश्यक वाढ होते. परिणामी साधनांचा दुरुपयोग होतो. ही साधने इतर उपयोगासाठी उपयोगात आणली असती तर समाजाला त्याचा फायदा झाला असता.

**आरोग्य वित्ताचे दृष्टिकोन**

आरोग्यनिगेवरील अर्थ प्रबंधनाच्या प्रमुख चार पद्धती आहेत.

अ) उपभोक्त्याने सेवांचे प्रत्यक्ष शोधन करावे.

ब) खाजगी आरोग्य विमा

क) सामाजिक किंवा सार्वजनिक विमा

ड) प्रत्यक्ष कर

आरोग्य आणि आरोग्यनिगा या दोन संकल्पना भिन्न आहेत. आरोग्यनिगेवर सरकारने जास्त खर्च केला पाहिजे. यादृष्टीने खालील चार दृष्टिकोण महत्त्वाचे मानले जातात. (Appleby, 1992)

अ) वाढीव निधीचा पुरवठा, ब) वाढीव निधीची खर्च करण्याच्या क्षमतेशी सांगड घालणे, क)आंतरराष्ट्रीय तुलना, ड) लोकतांत्रिक निर्णय

**आरोग्यनिगेवरील खर्चाचे प्रकार आणि त्याचे मापन**

आरोग्यनिगेवरील खर्चामध्ये तीन अवस्थांचा समावेश होतो-

अ) आरोग्यसेवा वरील खर्चाचा अंदाज घेणे :

आरोग्यावर प्रत्यक्ष खर्चाचा समावेश होतो. प्रत्यक्ष खर्च रुग्ण आणि त्याच्या नातेवाईकांना करावा लागतो. अप्रत्यक्ष खर्चात आरोग्यनिगेशी संबंधित उत्पादकता खर्चाचा समावेश होतो. (Luce et. al., 1996)

ब) आरोग्य खर्चाचे मापन करणे :

यात वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी किती तास सेवा दिल्यात, किती परिमाणात औषधांचा उपयोग केला, उपकरणांचा किती वापर केला यावरून खर्च निर्धारित केला जातो.

क) खर्च मौद्रिक स्वरूपात व्यक्त करणे :

इंग्लंडमध्ये रुग्ण कामावर गैरहजर राहिल्यामुळे होणारा वार्षिक खर्च किती याचे मापन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामुळे सकल राष्ट्रीय उत्पन्नात एक टक्का घट होते. (Chatterji, 2002) अमेरिकेतील अभ्यासावरून असा निष्कर्ष काढण्यात आला की, रुग्ण जर कामावर आला तर उत्पादकतेत होणारे नुकसान गैरहजेरीच्या तुलनेत ७.५ पट जास्त असते. (Main, 2005) आरोग्याची जोखीम आणि रोग यांचा श्रमिकांच्या उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम होतो. (Burton, 1999) नेदरलँडमध्ये मानेच्या (Neck) दुखण्यामुळे बिगर वैद्यकीय अप्रत्यक्ष खर्चाचे मापन करण्याचा प्रयत्न १९९६ मध्ये करण्यात आला होता. (Borghouts, 1999) इंग्लंडमध्ये सुद्धा पाठीच्या दुखण्यामुळे बिगर वैद्यकीय अप्रत्यक्ष खर्चाचे मापन करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. (Maniadakis, 2000)

**भविष्यकालीन संशोधनाच्या दिशा**

प्रतिबंधात्मक उपाय आणि सार्वजनिक आरोग्याच्या योजनांपेक्षा संशोधकांनी आरोग्याच्या अर्थशास्त्रात उपचाराच्या व्यय परिणामकारकतेवर भर दिला पाहिजे. आरोग्यसेवा प्रदान करणाऱ्यामध्ये आरोग्याच्या अर्थशास्त्राच्या यथार्ततेबाबत अधिक जागरुकता आहे. (McCrone, 1998) आरोग्याच्या अर्थशास्त्रात आर्थिक मूल्यांकनाच्या तंत्रावर जास्त भर देण्यात आला असून आरोग्य धोरण आणि गुणात्मकतेवर कमी लक्ष केंद्रित करण्यात आले. (Maynard, 1997) आरोग्यनिगेबाबत निवडीचा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. कारण आरोग्यावरील खर्चाची तरतूद कमी आहे. आरोग्याचे अर्थशास्त्र आरोग्यनिगेसंबंधी निर्णय निर्धारकांना फायदेशीर ठरू शकेल. त्याचे फायदे रुग्णांना मिळतील. (McCrone, 1998)

**भारतातील आरोग्य सोयींची राज्यनिहाय विषमता**

२०१५-१६ मध्ये सरकारी दवाखान्यांची संख्या उत्तर प्रदेशात ४६३५ सर्वात जास्त होती; तर चंदीगड मध्ये सर्वात कमी म्हणजे ४ होती. एका सरकारी दवाखान्यामागे भारतात ५५.५९१ लोकसंख्या होती. चंदीगडमध्ये ४४५००० लोकसंख्येसाठी एका सरकारी दवाखान्याद्वारे सेवा प्रदान करण्यात येतात. अरुणाचल प्रदेशात ६०८७ लोकसंख्येमागे एक सरकारी दवाखाना आहे. भारतात शासकीय दंत चिकित्सकांची संख्या ७२३९ होती. सर्वात जास्त शासकीय दंत चिकित्सकांची संख्या तामिळनाडूमध्ये ५८४ होती; तर सर्वात कमी संख्या लक्षद्वीपमध्ये १ होती. भारतात १७६००४ लोकसंख्येसाठी एक शासकीय दंत चिकित्सक उपलब्ध आहे. छत्तीसगडमध्ये २५८७९०० लोकसंख्येला १ शासकीय दंत चिकित्सक उपलब्ध आहे. दादरा व नगर हवेलीमध्ये ८४०४ लोकसंख्येसाठी एक दंत चिकित्सक उपलब्ध आहे. भारतीय सरासरीपेक्षा एका दंत चिकित्सकामागे जास्त प्रमाण असणारी राज्ये बिहार, छत्तीसगढ, गुजरात, झारखंड, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, ओडिशा, राजस्थान, तेलंगणा, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड ही आहेत. इतर राज्ये व केंद्रशासित प्रदेशातील प्रमाण भारताच्या सरासरीपेक्षा कमी होते.

**जागतिक आरोग्य संघटनेच्या निकषानुसार डॉक्टर लोकसंख्या प्रमाणाची स्थिती**

वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या आणि एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता विचारात घेता एक हजार लोकसंख्येसाठी एक डॉक्टर या

प्रमाणाची पूर्तता करण्यासाठी आसामला १३.४५ वर्षे, बिहार ४७ वर्षे, छत्तीसगड २० वर्षे, गुजरात २.२३ वर्षे, हरियाणा २२ वर्षे, हिमाचल प्रदेश ६.५४ वर्षे, झारखंड ९४ वर्षे, मध्यप्रदेश २०.४५ वर्षे, ओडीसा १५.२७ वर्षे, राजस्थान १३.३१ वर्षे, तेलंगणा १०.२ वर्षे, उत्तर प्रदेश २८.२८ वर्षे, उत्तराखंड ४ वर्षे, पश्चिम बंगाल ११.३६ वर्षे आणि दिल्लीला ४.६ वर्षे लागतील. केंद्र सरकारने नवीन वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे यापेक्षा कमी कालावधी लागेल. भारतात ४७६ वैद्यकीय महाविद्यालये आहेत. सर्वात जास्त वैद्यकीय महाविद्यालये कर्नाटकमध्ये ५७ आहेत. अरुणाचल प्रदेश, मिझोराम, नागालँड, दादरा व नगर हवेली, दमन व दीव आणि लक्षद्वीपमध्ये वैद्यकीय महाविद्यालय नाही. केंद्रशासित प्रदेशाचा विचार करता पुडुचेरीमध्ये ९ वैद्यकीय महाविद्यालये असून प्रवेश क्षमता १४०० आहे. एका वैद्यकीय महाविद्यालयामागे झारखंडमध्ये १.११ कोटी लोकसंख्या आहे. पुडुचेरीमध्ये एका वैद्यकीय महाविद्यालयामागे १.७८ लाख लोकसंख्या आहे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या संख्येत अग्रक्रमाने वाढ करणे अनिवार्य आहे.

**आयुष्य, आरोग्य, उपचार पद्धतीची स्थिती**

आयुष्य उपचार पद्धतीत आयुर्वेद, युनानी, सिद्ध, योग, निसर्गोपचार आणि होमिओपॅथीचा समावेश होतो. आयुष्य उपचार पद्धतीमध्ये ७,७३,६६८ डॉक्टर्स कार्यरत आहेत. आयुर्वेद वैद्यांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ५५.४३% आहे. युनानी सेवा देणाऱ्या हकीमांचे प्रमाण ६.४०% आहे. सिद्ध पद्धतीद्वारे उपचार करणाऱ्यांचे प्रमाण १.१% आहे. निसर्गोपचार करणाऱ्यांचे प्रमाण ०.२९% आहे. होमिओपॅथी डॉक्टरांचे प्रमाण ३६.७७% आहे. आयुष्य अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांचा विचार करता, आयुर्वेद महाविद्यालयांचे प्रमाण आणि प्रवेश क्षमता सर्वात जास्त म्हणजे अनुक्रमे ५४.३४% आणि ५३.२७ % आहे. होमिओपॅथी महाविद्यालयाचे प्रमाण आणि प्रवेश क्षमता अनुक्रमे ३२.३१% आणि ३४.६४% आहे. सिद्ध उपचार पद्धतीचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे अनुक्रमे १.४५% आणि १.३०% आहे. इस्पितळांचा विचार करता आयुर्वेदचे प्रमाण ८०.३०% आहे इतर उपचार पद्धतींची इस्पितळे कमी आहेत. दवाखान्यांचा विचार करता आयुर्वेद व होमिओपॅथीचे प्रमाण अनुक्रमे ६२.९६% आणि २७.२७% आहे.

**भारतातील आरोग्य समस्या निर्माण होण्याची कारणे**

भारतात अनेक कारणांमुळे आरोग्य समस्यानिर्माण होतात. काही महत्त्वाची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१) दारिद्र्य, २) शिक्षणाचा अभाव, ३) आरोग्यास विघातक कामाचे ठिकाण व स्वरूप, ४) पोषक आहाराचा अभाव, ५) व्यायामाचा अभाव, ६) नैसर्गिक आपत्ती, ७) स्वच्छतेचा अभाव, ८)सांडपाण्याची अपुरी व्यवस्था.

**आरोग्य वित्ताचे स्त्रोत**

१. केंद्र व राज्य सरकारे,
२. सरकार व खाजगी भागीदारी,
३. खाजगी खर्च,
४. स्वयंसेवी संस्था,
५. आरोग्य विमा

**भारतातील आरोग्याच्या समस्या व त्या सोडविण्यासाठी उपाययोजना**

१. तंबाखूचे दुष्परिणाम व अर्थव्यवस्थेतील योगदान याची सांगड घालावी.
२. काळ्या दम्याच्या रोगावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टिने प्रयत्न करावे.
३. मद्यपानामुळे वार्षिक नुकसान व नियंत्रणामुळे

फायदा याची तुलना करावी.

४. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अनिवासी भारतीयांच्या राखीव जागा कमी कराव्यात.

५. आदिवासींच्या आरोग्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करावी.

६. जलप्रदूषणाचा वाढता धोका कमी करावा.

७. सर्वांना आरोग्य सेवा मिळाल्या पाहिजेत.

९. जेनेरिक औषधांवर भर द्यावा.

१०. रक्तदाब कमी करण्यावर भर द्यावा.

११. आपले आरोग्य आपल्या हातात याचा अवलंब करावा.

१२. आरोग्य संवर्धन केंद्राच्या संख्येत वाढ करावी.

१३. तणावमुक्त जीवन जगण्याचा प्रयत्न करावा.

१४. कुपोषणाचे प्रमाण कमी करावे.

१५. असंसर्गजन्य आजारांचा आरोग्य धोरणात समावेश करावा.

१६. दवाखाने रोगांची उगमस्थाने होणार नाहीत याची काळजी घ्यावी.

१७. क्षयरोग निर्मूलनावर भर द्यावा.

१८. सेंद्रिय पद्धतीद्वारे सांडपाणी प्रदूषण मुक्त करावे.

१९. पिकांची धसकटे जाळण्यावर नियंत्रण ठेवावे.

२०. घनकचऱ्याची योग्य विल्हेवाट करावी.

२१. वायू प्रदुषण नियंत्रणावर भर द्यावा.

२२. आरोग्यावरील खर्चांत वाढ करावी.

**जागतिक आरोग्य संघटनेने पुढील पाच उद्दिष्टांवर भर दिला आहे.**

अ) आरोग्यनिगा प्रणालीत जास्तीत जास्त लोकांना सेवा मिळाल्या पाहिजेत.

ब) लोकांना मिळणाऱ्या आरोग्यसेवेतील विषमता कमी झाली पाहिजे.

क) आरोग्यसेवेचा प्रतिसाद महत्तम असला पाहिजे.

ड) प्रतिसादातील विषमता कमी असली पाहिजे.

इ) आरोग्यनिगेवरील खर्च सुयोग्य पद्धतीने झाला पाहिजे.

सरकारने आरोग्यावरील संशोधन खर्चात वाढ करावी. औषधांच्या किमती कमी करण्यासाठी प्रयत्न करावेत. ग्रामीण भागात डॉक्टर वास्तव्य करीत नाहीत म्हणून त्यांना वेगवेगळ्या सुविधा प्रदान कराव्यात. औद्योगिकरणाच्या वाढीमुळे आरोग्यनिगा रक्षणात मोठी आव्हाने निर्माण झाली आहेत. आरोग्याची आव्हाने पेलण्यासाठी खाजगी आरोग्य विम्याच्या सोयीत वाढ केली पाहिजे. खाजगी आरोग्य विमा क्षेत्रातील नोकरशाही नियंत्रणे कमी केली पाहिजेत. सरकारने खाजगी आरोग्य क्षेत्रातील आरोग्यसेवांवरील अवास्तव खर्चावर नियंत्रणे लादली पाहिजे. एकाच रोगाच्या निदानावरील सर्व खाजगी दवाखान्यातील खर्चात सुसूत्रता आणली पाहिजे. आरोग्यसेवांवरील सार्वजनिक खर्चात सरकारने वाढ केली तर आरोग्यविषयक सर्व समस्यांवर मात करता येईल आणि गरिबांना आरोग्याच्या सेवा प्राप्त होतील.

**संदर्भ सूची:**


1. Appleby, J. (1992), Financing Health Care in the 1990s, Milton Keynes: Open University Press.
2. Arrow, K. J. (1963), Uncertainity and the Welfare Economics of Medical Care, American Economic Review, 941-973.
3. Burton, W. C. (1999), The role of health risk factors and disease on worker productivity, Occupational Environment Medicine, 863-877.
4. Chatterji, M. (2002), Sickness, absenteesim, presenteesim and sick pay, Oxford Economics Papers, 669-87.
5. Cochrane, A. L. (1972), Effectiveness and Efficiency: Random Reflectons on

Health Services. London: Nuffield Provincial Hospital Trust.
6. Cutler, D. M. (2007), The Lifetime Costs and Benefits of Medical Technology, Journal of Health Economics, 1081-1100.
7. Department of Health and Social Security. (1980), Inequalities in Health: report of a research working group chaired by Sir Douglas Black,. London: HMSO.
8. Donaldson C, G. K. (1993), Economics of Health Care Financing, Basing-Stoke: Macmillan.
9. Fogel, R. W. (2004), The Escape from Hunger and Premature Death, 1700-2100 : Europe, America and the Third World, Cambridge University Press.
10. Folland, S. (2006), Value of Life and Behavior Toward Health Risks: An Interpretation of Social Capital, Health Economics, 159-171.
11. Folland, S. (2008). An Economic Model of Social Capital and Health. Health Economics, Policy and Law, 333-348.
12. Folland, S. A. (2013). The Economics of Health and Health Care, New Jersey: Pearson.
13. Gould, E. (2004, December 21), Health care: US spends more, gets less, Retrieved from www.epinet.org: http://epinet.org/content.cfm/webfeatures_10202004
14. Islam, M. K. (2006), Social Capital and Health: Does Egalitarianism Matter? A Literature Survey, International Journal for Equity in Health , 1-28.
15. Kessel, R. (1958), Price Discrimination in Medicine, Journal of Law and Economics, 20-53.
16. Levitt, S. D. (1999), Estimating the Effect of Alcohol on Driver Risk Using Only Fatal Accident Statistics, NBER Working Paper 6944.
17. Lleras-Muney, A. (2005), The Relationship between Education and Adult Mortality in the United States, Review of Economic Studies, 189-221.
18. Luce et. al. (1996), Estimating costs in cost-effectiveness analysis. In S. J. Gold M R, Cost effectiveness in health and medicine, New York: Oxford University Prss.
19. Main, C. P. (2005), Secondary prevention in health care and occupational settings in musculoskeletal conditions focusing on low back pain . In G. R. Schultz I, Handbook of Complex Occupational Disability Claims. New York: Springer.
20. Maniadakis, N. G. (2000), The economic burden of back pain in the UK. Pain, 95-103.
21. Mathers, C. D. (1998), The Health Consequences of Unemployment: the evidence. Medical Journal, 178-82.
22. Maynard, A. S. (1997), Health Economics : has it fulfilled its potential? In C. I. Maynard A, Non-random reflections on health services research: on the 25th annniversary of Archie Cochrance's Effectiveness and Efficiency. London: BMJ Books.
23. McCrone, P. (1998), Understanding health economics: a guide for health care decision makers. London : Kogan Page.
24. McKeown, T. (1976), The Modern Rise of Population. New York: Academic Press.
25. Milton Friedman & Simon Kuznets. (1945), Income from Independent Professional Practice. New ork: National Bureau of Economic research.
26. Mitton, G. D. (2004), Priority Setting Toolkit: a Guide to the use of econom-

ics in healthcare decison making. London: BMJ Books.
27. Mooney, G. (1992), Economics, Medicine and Health Care. London: Harvester Wheatsheaf.
28. Morris, D. P. (2012), Economic Analysis in Healthcare. Noida, UP India: Wiley.
29. Murphy, K. M. (2005), The Value of Health and Longevity. NBER Working Paper.
30. Pauly, M. V. (1980), Doctors and their Workshops. Chicago: University of Chicago Press.
31. Philips, C. J. (2005), Health Economics: An Introduction for Health Professionals. UK: Blackwell Publishing Ltd.
32. Reinhardt, U. E. (1972), A Production Function for Physician. Review of Economics adn Statistics, 55-65.
33. Saffer, H. a. (2005), Mental Illness and the Demand for Alcohol, Cocaine, and Cigarettes. Economic Inquiry, 229-246.
34. Sen, A. S. (1968), The Economics of Health . New Delhi: Health division, Planning Commission, Government of India.
35. Street, A. (2003), How Much Confidence Can We Have in Hospital Efficiency Estimates? Health Economics, 896-907.
36. Williams, A. (1990), Ethics, Clinical freedom and the Doctors' role. In A. M. Culyer, Competition in Health care:reforming the NHS. Sasingstoke: Macmillan.

◆

फक्त एका उत्पन्नावर अवलंबून राहू नका,
उत्पन्नाचे अनेक मार्ग निर्माण करा.

**- वॉरेन बफे**

तुम्ही जर अशा गोष्टींवर खर्च करत असाल ज्याची तुम्हाला गरज नाही, तर लवकरच तुम्हाला गरज असलेल्या गोष्टी विकाव्या लागतील.

**- वॉरेन बफे**

# भारतातील मंदी-२०१९-२० : कारणे व उपायांचे विश्लेषण

**श्रीनिवास खांदेवाले †**

आर्थिक विश्लेषणात, विशेषत: वित्तीय क्षेत्रात काही वेळा घटना इतक्या वेगाने घडतात व त्यातून इतकी अनिश्चितता निर्माण होते की त्यातून स्थिर प्रवृत्ती ओळखून विश्लेषण करणे कठीण होते. त्या उलट काही वेळा विविध प्रकारच्या घटना अशा रीतीने घडून येतात की त्या एकमेकींना जोडल्याबरोबर निर्माण होणारे संयुक्त चित्र आपल्या धूसर कल्पना स्पष्ट करून टाकते. सध्याची गतिमान परिस्थिती त्याच प्रकारची आहे.

**ताज्या घटना**

केंद्रीय अर्थसंकल्प सादर हावून पाच महिने पूर्ण झाले. परंतु त्यानंतर दोन वेळा उद्योजक वर्गाने सांगितल्यानुसार अर्थसंकल्पातील अत्युच्च उत्पन्नावरील अधिभार, कंपनी, सामाजिक उत्तरदायित्वासंबंधी दंड व तुरुंगवासाची तरतूद, विदेशी भांडवलाला मुक्त प्रवेश कंपनी उत्पन्नावरील करामध्ये विक्रमी कपात, स्टार्टअप कंपन्यांवर कर आणखी कमी करणे इत्यादी सर्व मान्य करूनही शेअर बाजारात गुंतवणुकीसाठी उत्साहजनक वातावरण निर्माण झालेले नाही. अजूनही अर्थमंत्र्यांनी आम्ही सूचनांचा विचार करीत राहू, असे जाहीर केले आहे. एका अर्थाने ते सकारात्मकतेचे दर्शक आहे. परंतु संसदीय परंपरेनुसार पारित झालेल्या अर्थसंकल्पात एप्रिल ते डिसेंबर ह्या नऊ महिन्यांमधील विविध खात्यांमधील कमी-अधिक खर्चाचे समायोजन हिवाळी अधिवेशनात केले जाते. परंतु २०१९-२० ह्या आर्थिक वर्षाकरीता, एप्रिल-मे २०१९ मधील लोकसभा निवडणुका विचारात घेऊन फेब्रुवारी २०१९ मध्ये तात्पुरता किंवा अंतरिम अर्थसंकल्प (व्होट ऑन अकाऊंट) अपेक्षित होता. परंतु तेच सरकार पुन्हा निवडून येणार असा विश्वास जनतेत निर्माण व्हावा म्हणून पूर्णच अर्थसंकल्प पारित करून घेण्यात आला; नंतर जुलै महिन्यात पुन्हा पूर्ण अर्थसंकल्प मांडला गेला; त्यानंतर ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये त्यात वर उल्लेख केलेले बदल करण्यात आले. त्यामुळे गांभीर्याने विचार करणाऱ्यांना देशातील अर्थसंकल्पीय प्रक्रियेबद्दल चिंता वाटत आहे. पण अशी चिंता केवळ सैद्धांतिक वाटू लागते. कारण ज्यांच्यावर सरकार चालविण्याची जबाबदारी असते त्यांना व्यावहारिकच राहावे लागते. पण कुठेतरी गडबड आहे, हे जाणवते. परंतु २ ऑक्टोबर, २०१९ रोजी वित्त मंत्रालयाने आदेश निर्गमित करून १४ ऑक्टोबरपासून

† माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, आजीव सभासद क्र. १०९, भ्रमणध्वनी : ०७४४७५६१५४४,
ई-मेल : shreenivaskhandewale12@gmail.com

२०२०-२१ च्या अर्थसंकल्पासाठी खर्चाचे अंदाज तयार करण्यास सांगितले आहे.

सरकारने स्वत:चे उत्पन्न वाढविणे आवश्यक आहे. त्यावरच कल्याणात्मक खर्च अवलंबून असतो. परंतु उत्पादन वाढीचा दर कमी झाल्यामुळे आणि रिझर्व्ह बँकेने स्वत:च जाहीर केलेला ६.९% हा वास्तविक राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर घटवून पूर्ण वर्षासाठी ६.१% असा अंदाज ३ ऑक्टोबर रोजी व्यक्त केल्याबरोबर मंदी गहिरी होत असल्याच्या चर्चांवर शिक्कामोर्तब झाले. परिणाम म्हणून प्रत्यक्ष कर आणि वस्तू व सेवा करांचे उत्पन्नही घटले आहे. सरकारने निर्यात व्यापार वाढवून उत्पन्न वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवणे साहजिक आहे. परंतु सगळ्या जगभरच मंदी असल्यामुळे निर्यात वाढविणे सोपे राहिलेले नाही. कच्च्या तेलाचे भाव ह्या वर्षभरात वाढले व भारतीय अर्थव्यवस्था ऊर्जा पुरवठ्याकरिता आयात होणाऱ्या (विदेशी चलन देऊन) तेल व कोळशावर अवलंबून आहे. परिणामी जरी सध्या भारताची विदेशी चलन गंगाजळी आतापर्यंतची सगळ्यात जास्त (४३० बिलियन डॉलर्स) असली तरी भारताने विदेशी चलनात जी कर्जे काढली आहेत त्यामध्ये चिंता निर्माण होण्याइतकी वाढ झाली आहे. २०१० मध्ये भारताचे विदेशी चलन कर्ज २६१ बिलियन डॉलर्स आणि विदेश चलनसाठा २७७ बि. डॉलर्स होतो. २०१८-१९ मध्ये विदेशी चलन कर्ज ५५७.४ बिलियन डॉलर्स तर विदेशी चलनसाठा ४२७.७ बिलियन डॉलर्स एवढा होता. त्यामुळे निर्यात व्यापारातून शिल्लक विकास कार्यासाठी मिळू शकेल असे दिसत नाही. अर्थसंकल्पात असे म्हटले होते की, उत्पन्न वाढविण्यासाठी सरकार स्वत:ची ऋणपत्रे विदेशी मुद्रा बाजारात विकून विदेशी चलन मिळवील. त्या रकमा अर्थसंकल्पात समाविष्ट होत नसल्यामुळे अर्थसंकल्पातील उत्पन्न-खर्च-तूट हे गणितही बिघडणार नाही. परंतु ह्यामुळे विदेशी ऋणदात्यांचा अर्थसंकल्पात शिरकाव होऊन धोरणांवरील दबाव वाढू शकतो, अशी टीका झाल्यामुळे सरकारने तो प्रस्ताव सध्या स्थगित केला आहे. पण वाढत्या प्रमाणावर विदेशी चलन उपलब्ध करून घेणे आणि संकल्पासाठी निधी मिळविणे हे दुहेरी आव्हान आहेच.

सरकारने रिझर्व्ह बँकेच्या व्यापारी नफ्याचा जो हिस्सा (स्वामित्व धन म्हणून) सरकारला मिळतो तो येनकेन प्रकारे विक्रमी रु. १.७६ लाख कोटी इतका मिळवून घेतला. त्याने अर्थसंकल्पाला हातभार लागल्याची चर्चा देशात झाली. पण नंतर श्रीमंतांच्या उत्पन्न करांवरील अधिभार काढून टाकणे. कंपन्यांचे व स्टार्टअपचे कर कमी करणे इत्यादी बदल केले गेले. त्यातून सरकारचा महसूल अंदाजे रु.१.५४ लाख कोटींनी कमी होणार असे प्रतिपादन केले गेले. ह्या घडामोडींचा साधा अर्थ काढावयाचा असेल तर असे म्हणता येईल की जेवढे उत्पन्न सरकारने रिझर्व्ह बँकेकडून मिळवून घेतले ते (जवळपास सर्व) उच्च उत्पन्न गटांच्या स्वाधीन केले! सार्वजनिक क्षेत्रांतील उद्योगांमध्ये सरकारचे शेअर्सच्या रूपाने गुंतलेले भांडवल (मोठ्या प्रमाणावर) विकून उत्पन्न मिळविणे व त्याच वेळी स्वत:चा भांडवल हिस्सा ५०% पेक्षा कमी करून त्या उद्योगांची मालकी व व्यवस्थापन खासगी व्यक्ती/कंपन्या ह्यांच्या स्वाधीन करणे असा दुहेरी कार्यक्रम सरकारने सुरू केला आहे. मंदीच्या काळात व्यक्ती व लहान कंपन्यांच्या जवळ पैसा नसतो. त्यामुळे मोठे उद्योजक त्या प्रक्रियेत भाग घेऊ शकतात. परिणामी, देशात उद्योगांमध्ये अल्पजनाधिकार (Oligopoly) व एकाधिकार (Monopoly) प्रवृत्ती बळकट होण्याची चिन्हे दिसतात.

देशात इन्फ्रास्टक्चर लेंडिंग अँड फायनान्शियल सर्व्हिसेस ही खासगी कंपनी दिवाळखोरीत

निघाल्यामुळे व इतर काही कंपन्या व बँका बंद पडल्यामुळे तसेच नोटबंदी व जी.एस.टी. यांच्या अनुक्रमे अनावश्यक व चुकीच्या धोरणांमुळे बाजारातील वित्त उपलब्धता कमी झाल्याचे म्हटले गेले. मंदीमुळे बँकांकडून दिल्या जाणाऱ्या कर्जामध्ये गेल्या वर्षीच्या एप्रिल-मध्य सप्टेंबरमधील रु. ७,३६,०८७ कोटींच्या तुलनेत २०१९ एप्रिल-मध्य सप्टेंबर ह्या काळात ८८% नी घट होऊन तो आकडा केवळ रु. ९०,९९५ कोटींवर घसरल्याचे रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे.

बाजारात कर्जासाठी मागणी सुधारावी म्हणून रिझर्व्ह बँकेने दि. ४ ऑक्टोबर, २०१९ रोजी ह्या वर्षातील रेपो रेटमधील (बँकांनी कर्ज मागितल्यास त्यावर रिझर्व्ह बँकेकडून आकारला जाणारा व्याजदर) पाचव्यांदा कपात जाहीर करून तो दर ५.१५% वर आणला. दि. ९ ऑक्टोबर, २०१९ रोजी आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीने असे वक्तव्य केले की तशी जगातच घसरण (स्लोडाऊन) सुरू आहे, पण भारतात ती सर्व क्षेत्रांच्या एकत्रित परिणामामुळे अधिक आहे. (हे असेच राहिले तर) २०२० या कॅलेंडर वर्षात भारताचा राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर आणखी कमी होऊन तो १० वर्षांतील सर्वात कमी असेल. दि. ९ ऑक्टोबर, २०१९ रोजी केंद्र सरकारने केंद्रीय कर्मचाऱ्यांना व निवृत्ती वेतन धारकांना जुलै २०१९ पासून ५% वाढीव महागाई भत्ता मंजूर केला आहे. त्याची रक्कम सुमारे रु.१६००० कोटी होते. ती पूर्णपणे बाजारात खर्च झाली तर तेवढा बाजाराला आधार मिळेल.[१]

**मतितार्थ**

बाजारव्यवस्थेत सगळ्यांची प्रगती अवलंबून असते ती बाजाराच्या विस्तारावर, त्यासाठी होणाऱ्या उत्पादन वाढीवर आणि त्यातून निर्माण होणाऱ्या मूल्यातून त्यात भाग घेणाऱ्यांना किती न्याय्य हिस्सा मिळतो त्यावर- त्यालाच आपण क्रयशक्ती म्हणतो. औद्योगिक श्रमिक, शेतकरी, शेतमजूर, आदिवासींना पुरेसा रोजगार, किमान वेतन व त्यात कालसंगत वाढ बाजारव्यवस्था देऊ करीत नसेल तर असे लोकसंख्या घटक गरिबीत राहतील व मोठ्या प्रमाणावर विषमता वाढेल.[२] औद्योगिक उत्पादन उच्च उत्पन्नाच्या गटांकरिता असेल तर त्याच्यासाठी खालच्या उत्पन्न गटांकडून मागणी निर्माण होणे कठीण असते. त्यामुळे त्यांनी स्वत:च्या उद्दिष्टांत अपेक्षांनुसार उत्पादन वाढवित नेले तर निश्चितच एका बिंदूनंतर खालच्या स्तरांमधून मागणी वाढत नसल्याचे व मंदी वाढत असल्याचे जाणवेल. २०१९ च्या मंदीच्या संदर्भात मोटरकार व ब्रिटानिया बिस्किटांची तक्रार ही या प्रकारात मोडते. इतर अनेक उदाहरणे आहेतच. संबंधित उत्पादन क्षेत्रात स्वत:चा एकाधिकार निर्माण करण्याच्या दृष्टीने (व आंतरराष्ट्रीय बाजारातही अल्पजनाधिकार निर्माण करण्याच्या दृष्टीने) उद्योजकांनी अतिरिक्त उत्पादन-क्षमता व उत्पादन करणे व त्याचे रूपांतर मंदीत होणे हा स्पर्धात्मक बाजारव्यवस्थेचा स्थायिभाव आहे.[३]

भारताच्या विशेष परिस्थितीत पाहिले तर १९९२ मध्ये नवे आर्धिक धोरण स्वीकारल्याबरोबर, ३-४ वर्षे एकदम सगळी मुक्तता झाल्याबरोबर, राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर तेजीच्या वातावरणात १९९५-९६ मध्ये शिखरावर होता. पुढच्याच वर्षी, १९९६-९७ मध्ये कारखानी उत्पादनाची दरवाढ निम्मी झाली व पुढील सहा वर्षे ती तशीच राहिली.[४] त्या काळात मंदी येत होती पण झपाट्याने बदलणाऱ्या विविध राजकीय गटबंधनांच्या सरकारांकडून त्याचे गांभीर्य सतत कमी लेखले गेले व नाईलाज झाला. तेव्हा सत्य मान्य केले गेले. हे त्या त्या वर्षीच्या आर्थिक सर्वेक्षणातील नोंदीवरून कळून येते : १९९६-९७ च्या सर्वेक्षणात एका चौकटीत लिहिले होते की,

''कारखानी क्षेत्राच्या काही शाखांमध्ये घसरलेला उत्पादन वाढीचा दर मंदीचा निदर्शक नाही.'' मात्र १९९७-९८ च्या सर्वेक्षणातील चौकटीत लिहिले होते 'औद्योगिक घसरण', १९९८-९९ च्या सर्वेक्षण चौकटीत लिहिले होते 'चालू असलेली औद्योगिक घसरण'; १९९९-२००० मध्ये लिहिले होते 'दीर्घकालीन सुधारणेची चिन्हे' आणि शेवटी २००१-०२ च्या सर्वेक्षणात लिहिले की ''व्यापक औद्योगिक घसरण''[५]

आर्थिक प्रतिकूल परिस्थितीचा राजकीय परिणाम होतो, हा सार्वत्रिक अनुभव आहे. २००४ मध्ये या मंदीचा परिणाम म्हणून राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार जाऊन संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार आले. सरकार व परिस्थिती बदलल्याचा संयुक्त परिणाम म्हणून २००४-०५ मध्ये तेजी आली. नव्या सरकारने त्याचा अतिसुलभ अर्थ काढून म्हटले की, 'आताची (२००४-०५) तेजी ही वेग संपल्याबरोबर मंदीमध्ये रूपांतरित होणारी नाही; हा वृद्धी दरातील कायमचा बदल आहे व तो एक उच्चस्तरीय विकास पथ आहे''[६] नंतर २००८ मध्ये जागतिक मंदी सुरू झाल्यावर ती भारतातही आली, हे सर्वांना ठाऊक आहे. पुन्हा आता २०१९-२० ची मंदी आली आहे. त्यामुळे उद्योजकांच्या अति उत्पादन - अल्प उत्पादन ह्या निर्णयश्रृंखलेचा एक अनिवार्य परिणाम म्हणून मंदी हा बाजारव्यवस्थेचा जैविक भाग आहे हे अधोरेखित होते. समाजाने एकदा बाजार ही आर्थिक जीवनाची संरचना किंवा व्यवस्था म्हणून स्वीकारल्यानंतर वारंवार येणारी मंदीसुद्धा स्वीकारावी लागेलच. त्यात तीन मुद्दे महत्त्वाचे आहेत. (१) उत्पादन तंत्रांमध्ये सातत्याने क्रांतिकारक बदल होत आहेत. परिणामी मंदीची वारंवारता वाढत आहे. तसेच तिची रोजगार, किमती याबद्दलची तीव्रता वाढत आहे. सध्या जागतिकीकरणात सुमारे १५० देश एकमेकांशी स्पर्धा करीत असतात. प्रत्येक देशातील विविध क्षेत्रांतील तांत्रिक घटनांमुळे त्यांचे अनुकूल-प्रतिकूल परिणाम व्यापाराद्वारा इतर देशांवर रोजच होतात. पूर्वी शेअर बाजारात १०-२० अंकांचा बदल सामान्य समजला जात असे. आता १००-१२५ अंकांचा बदल सामान्यच समजला जातो. (२) नव्या तंत्रामुळे उत्पादनासाठी पूर्वीपेक्षा कमी मजूर लागतात. त्यामुळे श्रमिकांच्या डोक्यावर (कायमचा रोजगार न देता कंत्राटी पद्धतीने तात्पुरता रोजगार देऊन) बेरोजगारीची तलवार सतत लटकत ठेवली जाते. रोजगार अनिश्चित म्हटल्याबरोबर श्रीमंत देशांमधील मोठ्या श्रमिक संघटनासुद्धा वेतनवाढीची मागणी मागे घेऊन नोकरी टिकविण्याला प्राधान्य देतात. अंतिमत: देशाचे राष्ट्रीय उत्पन्न वाढत राहते, श्रमिक वर्ग मात्र गरीबच राहतो. अमेरिकेत कार उद्योगातील युनायटेड ऑटो वर्क्स ह्या सगळ्यात मोठ्या श्रमिक संघटनेने (अ) कंत्राटी मजुरांचा उपयोग (ब) स्वास्थ्य योजनेचे लाभ न मिळणे, आणि (क) जनरल मोटर्स या कंपनीच्या विविध कारखान्यांमध्ये उत्पादन कार्याचे अनुचित वाटप यांच्याविरुद्ध अनिश्चित कालीन संप सुरू केला होता. (त्यांच्या काही मागण्या मान्य झाल्यानंतर साधरणत: २५ पेक्षाही जास्त दिवसांनंतर हा संप मागे घेण्यात आला). त्यात कायम रोजगार नाकारून श्रम हा उत्पादन घटक स्वस्तात वापरून घेण्याची भांडवलशाहीची प्रवृत्ती विकसित व श्रीमंत देशांमध्येसुद्धा कार्यरत आहे, ही अधोरेखनीय बाब आहे. त्यामुळे तेथील कामगार वर्ग तेथील परिस्थितीनुसार, पण गरीबच आहे. गेल्या सुमारे २७५ वर्षांचा अनुभव दर्शवितो की, भांडवलशाही विकासात देशपातळीवर विकास होतो. परंतु लोकसंख्या गटांनुसार विचार केल्यास दिसून येते की एका वर्गाची (उच्च

उत्पन्न) सुबत्ता दुसऱ्या वर्गाला (श्रमिक/ अल्प उत्पन्न) रोजगार आणि समाधानकारक जीवनमानापासून वंचित ठेवूनच मिळते. अमेरिकेसारख्या शेकडो वर्षे संपन्न राहिलेल्या देशात सुद्धा १% विरुद्ध ९९% आंदोलनाचा अर्थ असा होता आणि आहे की १२% लोकांच्याजवळ राष्ट्राची निम्मी संपत्ती असेल आणि उरलेल्या निम्म्या संपत्तीत ९९% जनता कोंबलेली असेल; तर वाढते उत्पादन विकत घेण्यासाठी क्रयशक्ती कुठून येणार? मग विषमतेमुळे मंदी येणे अपरिहार्य आहे.

चीनमधील समाजवादाला विरोध करून तिथे भांडवलशाहीचे बीज रोवणाऱ्या डेंग झायोपिंगने म्हटले होते की, 'To Be Rich Is Glorious'. त्या भांडवलशाही विकासात चीनच्या अर्थव्यवस्थेत २०१९ मध्ये किती भयंकर मंदी आली आहे तिचे विश्लेषण एक अभ्यासक पुढीलप्रमाणे करतात, ''While-the chinese economy was effected to slow down from its elevated growth levels, it has currently posted its slowest growth in industrial production in 18 years and the slowest GDP growth rate in 27 years. Debt levels have reached a record 310 percent of GDP, according to the Institute of International Finance...''[९] प्रश्न असा उद्भवतो की, जशी बिकट अवस्था व मंदी प्रवणता जगातील क्र. १ च्या अर्थव्यवस्थेत आढळते आणि तशीच ती क्र. २ च्या (चीनच्या) अर्थव्यवस्थेत आढळते आणि आर्थिक महाशक्ती होऊ पाहणाऱ्या भारतातही का आढळते? भारतात तर विषमता अधिक तीव्र आहे. १% श्रीमंतांकडे सुमारे ६०% संपत्ती आहे, ९९% ची वंचितता अधिक आहे. त्यामुळे मंदीची प्रवणता अधिक असणार हे स्पष्टच आहे.

यातून प्रश्न निर्माण होतो की मग सामान्य (बहुसंख्य) लोकांच्या कल्याणाचे भवितव्य काय? वरील विश्लेषणावरून वाचक स्वत:च्या निष्कर्षाप्रत पोचतील, यात शंका नाही.

**उपाय**

भांडवलशाही काही करून टिकवायची हे विविध सरकारांचे धोरण असले म्हणजे सरकार, मंत्री, संबंधित संस्था, त्यांची उपाययोजना, भाषा तशीच तयार होते. भारतात खालून मागणी कमी आहे असे विश्लेषण केले जाते, सवलती मात्र पुरवठा करणाऱ्यांना दिल्या गेल्या. अर्थमंत्र्यांनी दर आठवड्याला पत्रकार परिषदा घेऊन उच्च उत्पन्न गट, विदेशी भांडवल, कंपनी उत्पन्न कर ह्यात एकेका सवलतीला तोफेचा गोळा (Salvo) म्हणत सवलतींच्या घोषणा केल्या. परंतु आजतागायत खालून मागणी वाढण्यासाठी पॅकेज जाहीर केले नाही. ग्लोबल हंगर इंडेक्स (जागतिक भूक निर्देशांक) मध्ये दक्षिणपूर्व आशियात सगळ्यात खाली असलेला भारत मंदीतही उपभोग व मागणी वाढवू न शकणाऱ्या उच्च उत्पन्न गटांनाच अधिकच्या सवलती देत असेल आणि त्यातून मंदी हटेल व रोजगार वाढेल असे कोणी म्हणत असेल तर ते मान्य करणे कठीण आहे.

२०१९-२० च्या केंद्रीय अर्थसंकल्पात मनरेगावर रु.६०,०००/- कोटींची तरतूद केली गेली. ती २०१८-१९ च्या सुधारित अंदाजांपेक्षा कमी आहे. कारखानी/शहरी रोजगार मिळत नसेल तर ती योजना ग्रामीण जीवनाचा आधार आहे. परंतु सरकारच्या एका मंत्र्याने या घटनेचे असे समर्थन केले की आम्हाला मनरेगा योजना कायम चालवावयाची नाही!

उद्या सर्वोच्च उत्पन्नाच्या लोकांना अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात आकारलेला अधिभार रद्द केला व आता तो वर्ग उत्पन्न करात सवलतीची मागणी करू लागला आहे. देशातील श्रीमंत लोकांबाबत, अविकसित अशा, जम्मू-काश्मीरचे राज्यपाल नुकतेच काय म्हणाले ते मंदीवरील उपायांच्या विश्लेषणात महत्त्वाचे आहे. ते जम्मूमध्ये श्री माता वैष्णोदेवी विद्यापीठाच्या पदवीदान

समारंभात बोलत होते (त्यांचे वक्तव्य मूळ इंग्रजीतच वाचणे अधिक परिणामकारक आहे व समाजात पैसा सामान्य लोकांपर्यंत पोहचत का नाही हे सांगणारे आहे). ते म्हणाले, ''There are seths, people with money who spend Rs. 300 crore on an engagement, but will not give a penny to a university. They spend on their comforts... but they are not ready to pay... for the education of children of the country...? Say they are poorer than the common man. They are rotten potatoes.''[१०] देशातील प्रत्यक्ष परिस्थिती पाहून श्री. मलिक ह्यांचा उद्वेग आपण समजू शकतो. पण त्यावर उपाय ही आर्थिक व्यवस्था बदलण्यात आली आहे, हेही स्पष्ट होईल.

उत्पन्नाचे विषम वाटप, उत्पादकांच्या स्पर्धेतून वारंवार अति उत्पादन-मंदी-बेरोजगारीवर उपाय म्हणून मार्क्सने मागणी-पुरवठ्याचे संतुलन साधणारी नियोजित उत्पादन व्यवस्था आणि राष्ट्रीय उत्पन्नाचे न्याय्य वाटप करणारी समाजवादी व्यवस्था १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सुचवली होती. पण विषमताप्रिय शक्तींनी त्याचा विरोध केला व तो चालूच आहे. २० व्या शतकाच्या मध्यावर पहिल्या महामंदीतही भांडवली व्यवस्थेत एकूण प्रभावी मागणी कमी असते म्हणून उपभोग व मागणी वाढवू शकणाऱ्या अल्प उत्पन्नाच्या हाती क्रयशक्ती जाईल असे उपक्रम सरकारने चालवावे, असे केन्सने सुचविले. त्यातही केन्सने उच्च वर्गाच्या संपत्तीला धक्का न लागता (म्हणजे निर्माण झालेल्या विषमतेला धक्का न लावता) मंदी हटविण्याच्या कार्यक्रमासाठी सरकारने कर्ज काढावे, असे सुचविले. परंतु ते कर्ज फेडण्याचा भार आपल्यावर नंतर पडू शकतो, म्हणून भांडवली शक्तींकडून केन्सच्या शिफारसीही दुर्लक्षित केल्या गेल्या. आता २१ वे शतक सुरू झाले आहे. मंदी पुनःपुन्हा येतच आहे. अमेरिका व युरोपमध्ये विचारवंत मंदीवर उपाय म्हणून, अमूर्त का होईना, भांडवलशाहीच्या पलीकडील (Beyond Capitalism) व्यवस्था असा विचार करू लागले आहेत.

अमेरिकेसारख्या सर्वात श्रीमंत विकसित देशांमध्येसुद्धा भांडवलशाही व्यवस्थेमुळे सामान्य माणसांचे आर्थिक प्रश्न कसे बिकट झाले आहेत याची दोन उदाहरणे आपण पाहू. २००८ च्या मंदीच्या काळात अमेरिकन अर्थव्यवस्था बरीचशी सावरण्यामध्ये ज्यांचा मोलाचा वाटा होता त्या पॉल व्होलकर ह्या अमेरिकन फेडरल रिझर्व्हच्या अध्यक्षांनी असे विधान केले होते: मुख्य प्रश्न असा आहे की आपल्याकडे अतिविशाल संपत्ती असलेला विशाल लोकसंख्या समूह आहे. त्यांचा असा विश्वास आहे की ते इतरांपेक्षा चतुर (स्मार्ट) व सकारात्मक आहेत. त्यांना सरकार आवडत नाही व त्यांना कर भरणे आवडत नाही.[११]

दुसरे उदाहरण असे की रे डॅलिओ हे अर्थशास्त्रावर चिंतनशील लिहिणारे व बिग डेट क्रायसिस या ग्रंथाचे अमेरिकन लेखक आहेत. त्यांनी नुकतेच असे म्हटले: (जगामध्ये प्रचंड प्रमाणावर मुक्तपणे उपलब्ध असलेल्या पैशामुळे) जगाला वेड लागले आहे आणि (भांडवलशाही) व्यवस्था मोडली आहे ...उपलब्ध पैसा व त्यामुळे निर्माण झालेली पत यांच्या आधारे श्रीमंत लोक अधिक श्रीमंत होत आहेत व ज्यांच्या जवळ धन व पत नाही असे लोक गरीबच राहत आहेत. त्यामुळे वाढत्या संपत्तीतही संधी आणि राजकारण ह्याबाबत एक दरी निर्माण होत आहे. तंत्रज्ञानामुळे श्रमिक उत्पादन प्रक्रियेतून बाहेर फेकले जात असताना ही दरी वाढत आहे. भांडवलशाही व्यवस्था सर्व लोकांचे जीवन चालविण्याकरिता

मोडकळीस आली आहे... मला असे वाटते की जग नव्या प्रारूपाकडे झुकत आहे.[१२]

**संदर्भ व टिपणे**

१. येथपर्यंतचा आढावा, वृत्तवाहिन्या व सर्वच भाषांमध्ये प्रसारित झालेल्या बातम्यांवर आधारित आहे. म्हणून त्यांचे स्वतंत्र संदर्भ दिले नाहीत.

२) Shajan, Vandana : Globalization And Income Inequality (Ed.), The IEFAI University Press, Hyderabad 2007. ह्या संकलनात मुख्य प्रतिपादन असे आहे की, "Empirical evidence suggests that in the last few decades rapid market interation has been correlated with higher inequality in world income distribution...........most studies have found that inequality has sharply increases in the past fewr decades". २००७ च्या ह्या ग्रंथापासून आता २०१९ पर्यंत सुद्धा हा प्रवास वाढत्या विषमतेच्या दिशेनेच सुरू आहे.

३) विशिष्ट वेळेच्या मंदीला अल्पकालीन की दीर्घकालीन, वित्तीय की वित्तीयेतर, चक्रीय की संरचनात्मक घटक जबाबदार आहेत आणि त्यांची तीव्रता काय आहे, त्याबद्दल अर्थशास्त्रज्ञ व आर्थिक संस्थांचे पदाधिकारी ह्यांच्यात परस्परविरोधी मते आढळतात. ऑक्टोबर २०१९ च्या दुसऱ्या आठवड्यात बहुतेक सर्व (खासगी व सरकारी) वित्तीय संस्थांनी वर्ष २०१९-२० करिता स्थूल घरेलू उत्पन्नाचे (जी.डी.पी.) अंदाज दुसऱ्यांदा घटविले आहेत. त्यात इंडिया रेटिंग्ज अँड रिसर्च, मुडीज, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ह्यांना वाटते की परिस्थिती गंभीर आहे. तर एच.डी.एफ.सी. बँकेचे चेअरमन दीपक यांना वाटते की, सध्याची मंदी चक्रीय आहे आणि बँका थकीत कर्जांची जोखीम स्वीकारू इच्छित नाहीत म्हणून निर्माण झाली आहे. पाहा : इंडियन एक्सप्रेस, नागपूर, ११-१०-१९, पृ. १५-१६.

४. Aspects of India's Economy, Vols. 39-40, June 2005, Research Unit For Political Economy, Mumbai, June 2005, P.83.

५. तत्रैव. पृ. ९ (इंग्रजीतून भाषांतरित)

६. तत्रैव, पृ. ४ (इंग्रजीतून भाषांतरित)

७. Global Hunger Index : Joint Project or International Food Policy Research and wealthugerhilite, Coneern Worldwide is a co-publisher. whttps://en.m.wikipedia.org>wiki, dated the 16th October 2019.

८. खांदेवाले, श्रीनिवास : 'मंदी घरात : आपसूक जाणार नाही' महाराष्ट्र टाइम्स, नागपूर, १५-९-१९.

९. Misra Sanjiv : The Wall Ahead, Indian Express, Nagpur, dated 22-10-2019.

१०. Malik, Satyapal : Rich are rotten potatoes, Indian Express, Nagpur, 23-10-2019.

११. " The central issue is we're developing a plutocracy." He told The New York Times in October 2018. "We've got an enormous number of enormously rich people and that they have convinced themselves that they're rich because they're smart and constructive. And they don't like government and they don't like to pay taxes." Indian express, Nagpur 09/12/19.

१२. Ray Dalio: "The World has gone mad (with so much free money) and the system is broken.

At the same time as money is

essentially for those who have money and creditworthiness, it is essentially unavailable to those who don't have money and creditworthiness, which contributes to the rising wealth, opportunity, and political gaps. Also contributing to gaps are the technological advances.... That investors and the entrepreneurs...are excited by the ways.... That replace workers with machines. Because the " trickle -down" process of having money at the top trickle down to workers and others by improving their earnings and creditworthiness is not working, the system of making capitalism work well for work people is broken.

This set of circumstances is unsustainable and certainly can no longer be pushed as it has been pushed since 2008. That is why I believe that the world is approaching a big paradigm shift." Bloomberg 7/11/19.

◆

बऱ्याच उपयुक्त गोष्टींच्या उत्पादनाचा परिणाम बऱ्याच निरुपयोगी लोकांमध्ये होतो.

**- कार्ल मार्क्स**

**निवेदन : अर्थसंवाद**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल तर त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा; मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# २०१९ चे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक दारिद्र्याशी लढा देणाऱ्या संशोधनाला

**प्रशांत हरमकर** †

**प्रस्तावना :**

विकासाचे अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची एक शाखा आहे; ज्याचा जवळचा संबंध न्यून उत्पन्न देशातील विकास प्रक्रियेशी आहे. आर्थिक वृद्धी, आर्थिक विकास, संरचनात्मक बदल या संकल्पनेपेक्षाही न्यून विकसित देशांच्या दृष्टिकोनातून आरोग्य, शिक्षण, कर्जाच्या सुविधा, कामाच्या अटी, सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील बदल इत्यादी महत्त्वाचे असतात. कारण हे सर्व घटक न्यून उत्पन्न देशातील जनसमूहाच्या अंतर्गत क्षमतेत बदल घडवून आणणारे असतात. ज्याचा अंतिमतः परिणाम विकास प्रक्रियेवर होत असतो. विकासाचे अर्थशास्त्र, सिद्धांताचे निकष आणि मापन पद्धतीवर आधारलेले आहे; ज्यांचा संबंध आर्थिक धोरणांशी आहे. आर्थिक धोरणे अर्थ-व्यवस्थेच्या पातळीवर राबवून विकास वेगवान करण्याचा प्रयत्न केला जातो. विशेषतः आशिया आणि आफ्रिका खंडातील न्यून उत्पन्न गटातील देशांचे अध्ययन करून विकासाच्या अर्थशास्त्राची मांडणी ऑर्थर लेविस, गुन्नार मिर्दाल, राऊल प्रेब्रिश, पॉल रोजेस्टीन रोडान, हला मिन्ट, हांस सिंगर व अमर्त्य सेन इत्यादींनी केलेले आहे. २०१९ च्या नोबेल पारितोषिकामुळे या कडीमध्ये आता अभिजीत बॅनर्जी, इस्थर डूफ्लो आणि मायकेल क्रेमेर या त्रिकुटाचे नाव जुळलेले आहे. या त्रिकुटाला ज्याकरिता नोबेल प्राप्त झाले आहे त्या संशोधनाचा आढावा आपण घेणार आहोत.

**नोबेल विजेत्या त्रिकुटाविषयी :**

रॉयल स्विडीश ॲकॅडमीने १४ ऑक्टोबर, २०१९ रोजी अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक अभिजीत बॅनर्जी, इस्थर डूफ्लो आणि मायकेल क्रेमेर यांना जाहीर केले. रॉयल स्वीडीश ॲकॅडमीने असे म्हटले की, जागतिक पातळीवर दारिद्र्य कमी करण्याचा अनुभवनिष्ठ दृष्टिकोन (Empirical approach) आणि दारिद्र्याशी लढा देणाऱ्या संशोधनाकरिता अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक बहाल करण्यात येत आहे. विशेष म्हणजे अभिजीत बॅनर्जी आणि इस्थर डूफ्लो हे पती-पत्नी आहेत. अर्थशास्त्रामध्ये दाम्पत्याला नोबेल जाहीर होणारे हे पहिलेच जोडपे आहे. तर एकूणच संपूर्ण नोबेल पारितोषिक प्राप्त करण्यामध्ये हे सहावे दाम्पत्य संयुक्तपणे नोबेल पारितोषिक स्वीकारणारे आहे.

† सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, या.द.व. देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा, जि.अमरावती. आजीव सभासद क्रमांक –१३७९, मोबाईल – ९४२०६३३१२८, ई–मेल : haramkarp@yahoo.com

अर्थशास्त्रामध्ये इलिनार ऑस्ट्राम (२००९) नंतर नोबेल पारितोषिक प्राप्त करणारी इस्थर डूफ्लो दुसरी महिला आहे. अभिजीत बॅनर्जी आणि इस्थर डूफ्लो दोघेही एम.आय.टी. केंब्रिज (अमेरिका) येथे प्रोफेसर म्हणून कार्यरत आहे. त्यांनी एम.आय.टी.मध्ये The Abdul Latif Jammel Poverty Lab (J-PAL) ची स्थापना २००३ मध्ये केली आहे. ही प्रयोगशाळा म्हणजे दारिद्र्य कपात घडवून आणणाऱ्या संशोधनाचे जागतिक संशोधन केंद्र आहे. अभिजीत बॅनर्जी यांचा जन्म १९६१ मध्ये मुंबई (भारत) येथे झाला. त्यांचे पदव्युत्तर शिक्षण जे.एन.यू. दिल्ली येथे पूर्ण झाले, तर पीएच.डी. हॉर्वर्ड विद्यापीठामधून केली आहे. इस्थर डूफ्लो यांचा जन्म १९७२ मध्ये पॅरिस (फ्रान्स) येथे झाला, तर पीएच.डी. १९९९ मध्ये एम.आय.टी. केंब्रिज येथून केली आहे. त्यांचे पीएच.डी.चे मार्गदर्शक अभिजीत बॅनर्जी होते. मायकल क्रेमेर यांचा जन्म १९७४ मध्ये न्यूयॉर्क (अमेरिका) येथे झाला तर पीएच.डी. हॉर्वर्ड विद्यापीठातून केली आहे. या त्रिकुटाने गेल्या दोन दशकामध्ये अनुभवनिष्ठ दृष्टिकोनाचा वापर जागतिक दारिद्र्यामध्ये कपात घडवून आणण्याकरिता केला आहे. हा अनुभवनिष्ठ दृष्टिकोन विकासाच्या अर्थशास्त्रामध्ये लागू करण्याचे श्रेय या त्रिकुटाला जाते, ज्यामुळे संशोधनाचे क्षेत्र भरभराटीला आल्याचे नोबेल समितीने म्हटले आहे.

**बॅनर्जी, डूफ्लो आणि क्रेमेरचे योगदान :**

अर्थशास्त्रामध्ये मानवी दृष्टिकोनातून सर्वात महत्त्वाचा वादप्रश्न (Issue) म्हणजे जागतिक दारिद्र्यात कपात घडवून आणणे आहे. जागतिक पातळीवर ७०० दशलक्षापेक्षा जास्त लोक अत्यंत निम्न उत्पन्न गटात मोडणारे आहे. या निम्न उत्पन्नावर त्यांचा निर्वाह चालतो. दरवर्षी पाच वर्षाखालील ५ दशलक्ष मुलांचा मृत्यू आरोग्य सुविधांच्या अभावामुळे घडून येतो. निम्न उत्पन्न गटातील लोकांना मिळणाऱ्या आरोग्य सुविधामध्ये अडथळे आहेत. हे अडथळे दूर करण्याकरिता स्वस्त आरोग्य सुविधा असण्याची आवश्यकता नोबेल पारितोषिक विजेत्यांनी अधोरेखित केली आहे. जगातील निम्म्यापेक्षा जास्त मुले शाळेत जाऊन देखील मूलभूत शिक्षण आणि अंकगणितीय कौशल्यापासून वंचित आहे.

दारिद्र्य कपातीच्या मूलभूत समस्येवर विश्वसनीय उत्तर शोधण्याकरिता नवीन दृष्टिकोन नोबेल पारितोषिक विजेत्यांनी विकसित केलेला आहे. थोडक्यात, दारिद्र्याचा वादप्रश्न अनेक घटकांमध्ये गुंतून पडलेला आहे. मानव विकास निर्देशांकामध्ये शिक्षण, आरोग्य आणि प्रति व्यक्ती उत्पन्नावर भर दिलेला आहे. कारण मानव विकास या तीन निर्देशांकावर अवलंबून आहे. मानव विकास घडून येणे म्हणजेच पर्यायाने दारिद्र्यात कपात घडून येणे आहे. दारिद्र्य कपात घडून यायची असेल तर मुलांचे शिक्षण आणि आरोग्यामध्ये सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. हा बदल जरी अत्यंत लहान वाटत असला तरी तो अधिक महत्त्वाचा आहे. पुष्कळदा अशा समस्यांना अधिक चांगले उत्तर शोधावे लागते. काळजीपूर्वक उत्तराची रचना लोकांकरिता तयार करावी लागते. अधिक चांगल्या रचना तयार केल्यामुळे त्या देशातील संपूर्ण जनसमुदाय प्रभावित होत असतो.

माइकल क्रेमेर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी १९९०च्या दशकामध्ये प्रत्यक्ष दर्शविले की, अनुभवनिष्ठ दृष्टिकोन किंवा प्रयोग पद्धती अर्थशास्त्रामध्ये कशी सशक्त आहे आणि असू शकते. या अनुभवनिष्ठ दृष्टिकोनाचा वापर क्षेत्रीय चाचण्या घेण्याकरिता केला आहे. क्षेत्रीय चाचण्यामधून पश्चिम केनियामध्ये आरोग्य व शिक्षणाबाबत सुधारित निकाल प्राप्त झालेले आहेत. अभिजीत बॅनर्जी, इस्थर डूफ्लो

आणि मायकल क्रेमेर यांचे संशोधन समांतर आहे. त्यांच्या अनुभवनिष्ठ संशोधन पद्धतीने विकासाच्या अर्थशास्त्रावर वर्चस्व प्राप्त केले आहे.

या वर्षीचे नोबेल पारितोषिक अनुभवनिष्ठ संशोधनाच्या निष्कर्षांना मिळालेला बहुमान आहे. अशा प्रकारचे संशोधन अर्थशास्त्राला लागू पडणे म्हणजे पुढे पडलेले पाऊल आहे. यामुळे धोरणाच्या सामर्थ्यात वाढ होऊन प्रत्यक्ष दारिद्र्याशी लढा दिला जात आहे. यांचे संशोधन प्रत्यक्ष निष्कर्षांना लागू करणारे आहे. पाच दशलक्ष भारतीय मुलांना परिणामकारक कार्यक्रमांद्वारे लाभ प्राप्त झालेला आहे. विशेषत: शाळांमध्ये शिकवणी घेऊन केलेला उपाय (Remedial tutoring in school) महत्त्वाचा ठरला आहे. मोठ्या प्रमाणात आरोग्य सुविधांना अर्थसहाय्य दिले तर प्रतिबंधक उपाययोजना चांगल्या प्रकारे राबविता येतात. वरील दोन्ही निष्कर्ष जागतिक दारिद्र्यात कपात करण्यास मदतकारी ठरली आहे. अनुभवनिष्ठ दृष्टिकोनाचा वापर करून क्षेत्रीय चाचण्याच्या पातळीवर उपायांना पडताळून पाहाणे यामुळे धोरणात्मक सुधारणांना सामर्थ्य प्राप्त झाले आहे. धोरणात्मक सुधारणाचे सामर्थ्य अत्यंत वाईट स्थितीत राहणाऱ्या लोकांच्या जिविकेमध्ये सुधारणा घडवून आणणारे आहे. जागतिक दारिद्र्यामध्ये कपात घडवून आणण्याकरिता अधिक चांगली रचना, अधिक चांगल्या मापकाचा वापर कसा करता येईल याकरिता अनुभवनिष्ठ संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. मानवी दृष्टिकोनातून नोबेल पारितोषिक विजेत्यांना दारिद्र्यामध्ये कपात घडवून आणायची आहे. त्यांना पडलेल्या प्रश्नांना अधिक चांगली रचना व मापके वापरून उत्तराची बांधणी करायची आहे.

नोबेल पारितोषिक समितीचे मत आहे की, लोकांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारत असल्याचे जगभरामध्ये दिसून आले आहे. आर्थिक कल्याण (प्रति व्यक्ती उत्पन्न वाढ) गरीब देशामध्ये दुप्पट झालेली आहे. १९९५ ते २०१८ या कालावधी दरम्यान जागतिक पातळीवर बालमृत्युचे प्रमाण निम्म्यापेक्षा कमी झालेले आहे. लहान मुलांचे शाळेत जाण्याचे प्रमाण ५६ प्रतिशत वरून ८० प्रतिशतपर्यंत वाढलेले आहे. जरी अशी प्रगती दिसून येत असली तरी अजून प्रचंड आव्हान शिल्लक आहे. अजूनही ७०० दशलक्ष लोक अत्यंत निम्न उत्पन्नावर निर्वाह करीत आहे. यामुळे त्यांच्या शिक्षण व आरोग्य सुविधामध्ये बऱ्याच अडचणी निर्माण झालेल्या आहे.

नोबेल पारितोषिक विजेत्यांनी विकासाच्या अर्थशास्त्राची मांडणी करण्याकरिता आधुनिक दृष्टिकोन स्वीकारला आहे. याकरिता मुख्यत्वे तीन घटकांवर प्रकाश टाकलेला आहे. संक्षिप्त रूपात, वापरण्यात आलेला आधुनिक दृष्टिकोन म्हणजेच अनुभवनिष्ठ पद्धती आहे. याकरिता यादृच्छिक नियंत्रित चाचणीचा (Random Control Trial) वापर प्रत्यक्षात केलेला आहे.

**दारिद्र्य कपातीची त्रिसूत्री :**

विकासाच्या अर्थशास्त्राचा आधुनिक दृष्टिकोन मांडतांना दोन सोप्या पण सामर्थ्यशाली संकल्पना पारितोषिक विजेत्यांनी मांडलेल्या आहे. यामधील पहिली संकल्पना अनुभवनिष्ठ पातळीवरील आहे. सूक्ष्म पातळीवर केलेले अनुभवनिष्ठ संशोधन आर्थिक सिद्धांतांना मार्गदर्शन करते. यामधून धोरणांच्या रचनेचे निर्णायक मत स्पष्ट केले जाते. यामुळे प्रभावीपणे दारिद्र्य कपात घडून येऊ शकते. यावरून दुसरी संकल्पना मांडली आहे. सूक्ष्म पातळीवर केलेल्या अनुभवनिष्ठ संशोधनावरून जे निष्कर्ष प्राप्त होतात त्यावरून धोरणात्मक पातळीवर बदल करता येतो. धोरणाची परिणामकारकता वाढविण्याकरिता यादृच्छिक

नियंत्रित चाचणीचा (Random control trial) उपयोग करता येतो. अशा प्रकारे ही व्यवस्थाबद्ध उपयोजन संकल्पना आहे. गेल्या २० वर्षापासून या संकल्पनेचा उपयोग करून संशोधनामध्ये परिवर्तन घडवून आणले आहे.

प्रथम, काही तफावतीच्या आधारावर अधिकारीकपणे क्षेत्रीय चाचण्यामध्ये सुधारणा केल्या गेल्या आहे. यामध्ये नोबेल पारितोषिक विजेत्यांचा सहभाग चाकोरीबाहेरचा आहे. १९९० च्या दशकापासून क्रेमेर आणि त्यांच्या विविध सहकाऱ्यांच्या मदतीने क्षेत्रीय चाचण्या घेण्याची मालिका केनियामध्ये सुरू झाली. शैक्षणिक उत्पादन फलनामधील विविध घटकाचे विच्छेदन करण्यात आले. सारांश स्वरूपात, समस्यांवर उपाय शोधण्याचा सफल प्रयत्न करण्यात आला. मानवी भांडवलाला कशा प्रकारे चालना देता येईल? प्रामुख्याने हा मानवी भांडवलाच्या व्यवस्थापनाचा प्रश्न आहे. याचे वास्तवाच्या पातळीवर निर्णायकपणे अध्ययन होऊ शकते का? विशेषत: यादृच्छिक नियंत्रित चाचणीचा वापर करून धोरणात्मक रचना तयार करता येईल का? यावर बॅनर्जी, डूफ्लो आणि क्रेमेर यांनी विशेष भर दिलेला आहे. अशा यादृच्छिक नियंत्रित चाचण्याद्वारे न्यून उत्पन्न गटातील देशांमध्ये शिक्षणाची विस्तृत प्रमाणात मांडणी केली आहे. अशा प्रकारे क्षेत्रीय चाचण्याचे प्रस्तुतीकरण विकासाच्या अर्थशास्त्रामध्ये मध्यवर्ती भूमिका पार पाडू लागले आहे. क्षेत्रीय चाचण्याद्वारे काढलेले निष्कर्ष बाजार अकार्यक्षमतेच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे आहे. खाजगी व सार्वजनिक क्षेत्र असतांना अकार्यक्षमता घालविण्याकरिता प्रत्यक्षात पर्यायी मार्ग असण्यावर प्रकाश या त्रिकुटाने टाकलेला आहे.

द्वितीय, बॅनर्जी आणि डूफ्लोच्या अभ्यासानुसार सूक्ष्म अर्थशास्त्रीय दृष्टिकोन विकासाच्या समस्याचे विविध पैलू समजण्यास मदत करतो. यासंदर्भातील बॅनर्जी आणि डूफ्लो यांचा संशोधन निबंध Growth Theory Lens of Development हा 2005 मध्ये प्रसिद्ध झाला. यामध्ये त्यांनी विकासाच्या वादप्रश्नाचा (Issue) दुवा सूक्ष्म अर्थशास्त्राशी जोडला आहे. ज्याचा प्रत्यक्ष संबंध विकसनशील देशामधील न्यून प्रति व्यक्ती उत्पन्नाशी आहे. न्यून आणि मध्यम उत्पन्न गटातील देशांमध्ये परताव्याचा दर (Rate of Return) बहुजिनसी असतो. असेच बहुजिनसत्व उत्पादन घटकाच्या बाबतीत आहे. लाभदायक गुंतवणुकीच्या संधीमध्ये तफावत असून त्यामध्ये शोषण घडून येते. यामुळे अयोग्य आंवटनाचा (Misallocation) विस्तार घडून येतो. एकूणच न्यून आणि उच्च उत्पन्न गटातील देशांमध्ये उत्पादन घटकाच्या उत्पादकतेत तफावत निर्माण होते. हे संबंध संशोधन अनुभवनिष्ठ वृद्धीवर प्रकाश टाकणारे आहे. जर पर्याप्त प्रमाणात संशोधनाचे वितरण करण्यात आले तर अर्थव्यवस्था उत्पादन संभाव्यतेच्या अंतिम मर्यादेपर्यंत हाताळता येते. जर संसाधनाचे अयोग्य आंवटन झाले तर अर्थव्यवस्था उत्पादन आणि उत्पादकतेच्या न्यूनतम पातळीवर हाताळावी लागते. बॅनर्जी आणि डूफ्लोच्या नुसार बाजार आणि शासन दोघेही अपूर्ण आहे. वित्त उपलब्धता, विमा बाह्यता, कौटुंबिक गतिशीलता आणि वर्तणुकीच्या वादप्रश्नावरून ही अपूर्णता स्पष्टपणे दिसून येते. हे सर्व वादप्रश्न अयोग्य आंवटनामुळे उपस्थित होतात. काही देश गरीब का आहेत? याला अनुभवनिष्ठतेच्या पातळीवर स्रोताची अकार्यक्षमता आणि धोरणे जबाबदार आहे. यासंदर्भातील सविस्तर विश्लेषण बॅनर्जी आणि डूफ्लो यांनी 'Poor Economics - A Radical Rethinking of the way to fight global poverty (2011) या ग्रंथामध्ये प्रस्तुत केलेले आहे. दारिद्र्याच्या संदर्भात

बॅनर्जी आणि डूफ्लो यांनी सूक्ष्म अर्थशास्त्रीय दृष्टिकोन वापरून उत्पन्न, आरोग्य आणि शिक्षण या पैलूमध्ये सुधारणा केल्या आहे.

तृतीय, नवीन अनुभवनिष्ठ संशोधनाची रचना तयार करताना प्रमुख आव्हान म्हणजे बाह्य वैधतेचे (External validity) आहे. बाह्य वैधता म्हणजे एका देशात घेतलेल्या क्षेत्रीय चाचणीचे निष्कर्ष दुसऱ्या देशामध्ये तंतोतंत लागू पडतात का? जर लागू पडत असेल तर बाह्य वैधता आहे. याउलट लागू पडत नसेल तर बाह्य वैधता नाही. ही बाह्य वैधता नसण्याचे आव्हान मोठ्या प्रमाणात आहे. म्हणून यादृच्छक नमुना चाचणीद्वारे (Randomised Controlled Trial - RCT) काढलेल्या निष्कर्षाचा प्रत्यक्ष धोरणात वापर व्हावा. याकरिता The Abdul Latif Jammel Poverty Action Lab मध्ये परीक्षण करून काढलेले निष्कर्ष धोरणामध्ये लागू होण्याला प्रोत्साहन दिले जाते.

जागतिक पातळीवर दारिद्र्याशी लढा देत असताना दारिद्र्य कपातीची कृती अधिक परिणामकारक असण्यावर भर दिलेला आहे. दारिद्र्याच्या समस्येवर मात कशी करता येईल यावरच प्रामुख्याने लक्ष केंद्रीत करण्यात आलेले आहे. संशोधकानी क्षेत्रीय अनुभवनिष्ठ चाचण्याच्याद्वारे विकासाच्या अर्थशास्त्रातील संशोधनाला पुनर्आकार दिलेला आहे.

**सिद्धांत आणि चाचण्या :**

सुयोग्य रचनावर आधारित चाचण्या घेणे आधिक्याने विश्वसनीय असतात. त्यांना अंतर्गत वैधता असते. एखाद्या देशामध्ये एका प्रदेशात घेतलेले चाचणीचे निष्कर्ष तंतोतंतपणे दुसऱ्या प्रदेशात लागू होणे म्हणजे अंतर्गत वैधता होय. परंपरेने अशा चाचण्या घेण्याचा वापर औषधीशास्त्रामध्ये केला जातो. एखादे नवीन औषधे निर्माण केले गेले असेल तर तिच्या चाचण्या घेतल्या जातात. याकरिता सहभागी लोकांची विशेष भरती केली जाते. अर्थशास्त्रामध्ये अशा चाचण्याबाबत प्रश्न निर्माण होतो. चाचण्याद्वारे काढलेले निष्कर्ष सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वाचे असले तरी उपायाबाबत कोणत्याही परिस्थितीत परिणाम घडवू शकतात का? कारण अर्थशास्त्र हे सामाजिकशास्त्र आहे. सामाजिकशास्त्राच्या मर्यादा चाचण्याच्या यशस्वीतेवर परिणाम करणाऱ्या आहेत.

या वर्षीच्या नोबेल पारितोषिक विजेत्यांनी चाचण्याची रचना तयार करताना दोन भिन्नत्वदर्शक निकषाचा वापर केला आहे. यामध्ये मध्यस्थ गट आणि नियंत्रित गट आहे. याचा अर्थ चाचण्यावरून जे निष्कर्ष काढले जातात त्यामध्ये हे दोन निकष महत्त्वाचे ठरतात. अशा निकषाचा प्रत्यक्षात वापर करता येतो. पारितोषिक विजेत्यांनी धोरणात्मक परिणामाचे अंतरंग उलगडून दाखविले आहे. उदा. शैक्षणिक परिणाम. वैयक्तिक निर्णयाचे प्रतिबिंब विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यावर पडत असते. लोक कशा प्रकारे निर्णय घेतात हे शाश्वत सुधारणांकरिता समजवून घेणे आवश्यक आहे. बॅनर्जी, डूफ्लो आणि क्रेमेर यांनी केवळ चाचण्याच घेतल्या नाही तर धोरणामध्ये कोणत्या प्रकारच्या सुधारणा केल्या जाऊ शकतात आणि या सुधारणा का कराव्या लागतात यावर प्रामुख्याने भर दिला आहे. अशा प्रकारचे अध्ययन संशोधनाला उत्तेजन देणारे आहे. तसेच संशोधनाच्या मर्यादा आणि माहितीला प्रेरणा देणारे आहे. चाचण्याचे विश्लेषण करण्याकरिता पारितोषिक विजेत्यांनी करार सिद्धांत आणि वर्तणूक अर्थशास्त्राचा उपयोग केला आहे. करार सिद्धांताला २०१६ मध्ये तर; वर्तणूक अर्थशास्त्राला २०१७ मध्ये नोबेल पारितोषिक प्राप्त झाले होते.

**निष्कर्षाचे सामान्यीकरण :**

पारितोषिक विजेत्यांच्या संशोधनाबाबत असा आक्षेप घेतला जातो की, चाचण्यावरून काढलेल्या अनुभवनिष्ठ निष्कर्षांना बाह्य वैधता आहे का? चाचण्याच्या निष्कर्षाचे सामान्यीकरण करताना ज्या चाचण्या केनियामधील शाळांमध्ये घेण्यात आल्या त्याबाबतचे निष्कर्ष जसेच्या तसे भारतामधील शाळांना लागू होतात का? जर यामध्ये भिन्नता दिसत असेल तर गैरशासकीय संघटना (NGO) आणि सार्वजनिक प्रशासनाने मध्यस्थी करून रचनांमध्ये दुरुस्ती करावी का? वैयक्तिक पातळीवर लहान गटामध्ये अधिक लोकांना सहभागी करून अनुभवनिष्ठ मध्यस्थीचे मापन करता येईल का? केलेली मध्यस्थी परिणामकारक ठरेल का? याचा परिणाम इतर ठिकाणी काय राहील? कारण गर्दीपासून दूर (Crowded-out) घेऊन जाणारी अपुरी संसाधने आणि उच्चत्तम किमतीचा सामना करावा लागू शकतो.

पारितोषिक विजेत्यांनी संशोधनामध्ये आघाडी घेतली असून बाह्य वैधता आणि नवीन पद्धती विकसित केल्या आहे. ज्याचा संबंध गर्दीपासून दूर जाणाऱ्या परिणामाशी (Crowding out effect) आहे. तसाच काही बाबतीत सांडवण परिणाम (Spillover effect) घडून येतो. यामधील दुवा आर्थिक सिद्धांताच्या अनुभवनिष्ठतेशी संबंधित आहे. निष्कर्षाद्वारे संधी वाढवून सामान्यीकरण केलेले आहे. वर्तणुकीच्या मूलभूत आकृतीबंधाचा विचार विस्तृत स्वरूपात केला आहे.

**निष्कर्षाचे उपयोजन :**

पारितोषिक विजेत्यांनी अनुभवनिष्ठ चाचण्या घेऊन निष्कर्ष काढलेले आहे. हे निष्कर्ष प्रत्यक्षात कसे लागू होईल यावरच मुख्यत्वे प्रकाश टाकलेला आहे.

**शिक्षण :**

समस्याचे परीक्षण करून समस्या सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. शिक्षणाची समस्या जाणून घेताना किमान खर्चामध्ये शिक्षण घेण्याचा परिणाम वाढला का? न्यून उत्पन्न देशांमध्ये पाठ्यपुस्तकांचा तुटवडा आहे का? विद्यार्थ्यांच्या निकालामध्ये सुधारणा करायच्या असेल तर विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके दिल्यामुळे निकालामध्ये सुधारणा होईल का? बरेचदा मुले शाळेत उपाशी जातात का? शाळेमध्ये मोफत जेवण दिल्यामुळे विद्यार्थ्यांच्या निकालात सुधारणा होईल का? या प्रश्नाचा शोध मायकल क्रेमेर यांनी अनेक अनुभवनिष्ठ चाचण्याद्वारे ग्रामीण केनियामध्ये घेतला आहे. या चाचण्या घेण्यामध्ये त्यांच्यासोबत अशासकीय (NGO) संघटनांचा समावेश होता.

क्षेत्रीय चाचण्याद्वारे परीक्षण केले असता विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके दिल्यामुळे त्याचा शिक्षणावर आणि शिकण्यावर काय परिणाम झाला? शाळांची तुलना विविध बाबतीत करीत असताना पाठ्यपुस्तके हा वर्धिष्णू दृष्टिकोन असू शकतो का? शाळांमध्ये अनेक प्रकारच्या भिन्नता आहे. जसे संपन्न कुटुंबे त्यांच्या मुलांना पाठ्यपुस्तके विकत घेऊन देतात. त्यामुळे त्यांना सामान्यपणे चांगला वर्ग (Grade) प्राप्त होतो. तर काही विद्यार्थी गरीब कुटुंबामधील असतात. त्यांच्याकडे पाठ्यपुस्तके विकत घेण्याची क्षमता नसेल तर त्याचा परिणाम शिकण्यावर आणि शिक्षणावर होतो. अशा समस्या शिक्षणाच्या बाबतीत आढळून येतात. शाळांची तुलना करताना सरासरीने समान वैशिष्ट्ये असणाऱ्या शाळांचा गट तयार करून गटामध्ये तुलना करावी लागते. अशा प्रकारच्या क्षेत्रीय चाचण्या घेण्याची पद्धती नैसर्गिक शास्त्रे आणि औषधीशास्त्रामध्ये पूर्वीपासून आहे.

क्रेमेर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विविध गटामध्ये

यादृच्छिक पद्धतीने शाळांची विभागणी करून त्यांच्या गरजेनुसार त्यांना साहाय्य केले आहे. याकरिता त्यांना पुरेशी संसाधने दिली होती. एका अध्ययनानुसार एका गटामधील शाळांना मोफत पाठ्यपुस्तके दिली तर दुसऱ्या गटातील शाळांना मोफत भोजन दिले होते. कारण कोणत्या गटांना काय संधी दिली ते महत्त्वाचे होते. दोन्ही गटामध्ये सरासरीने फारसा फरक आढळून आला नाही. चाचणी घेतल्यानंतर संशोधकांनी यामध्ये विश्वसनीय दुवा जोडला. याद्वारे पुढे विविध प्रकारच्या रचना तयार करून साहाय्य देण्यात आले. त्याचा मुलांच्या शिकण्यावर काय परिणाम झाला याचा वेध घेण्यात आला होता. केवळ मोफत पाठ्यपुस्तके किंवा केवळ मोफत भोजन दिल्यामुळे शिकण्यावर फारसा परिणाम घडून आला नाही. तर मोफत पाठ्यपुस्तके देण्याचा सकारात्मक परिणाम गरीब पण फार हुशार मुलांवर घडून आल्याचे दिसून आले होते.

पारितोषिक विजेत्यांनी घेतलेल्या क्षेत्रीय चाचण्या असे दर्शवितात की, प्राथमिक स्वरूपाच्या समस्या अनेक न्यून विकसित देशांमध्ये आहेत. केवळ संसाधनाच्या उणिवांमुळे समस्या निर्माण होत नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार शिकवण्याच्या पद्धतीचा पुरेसा स्वीकार झाला नाही म्हणून देखील शिक्षणाच्या समस्या निर्माण होतात. याकरिता सर्वात प्रथम चाचणी बॅनर्जी आणि डूफ्लो यांनी घेतली. याकरिता शिकवणीच्या उपायाचा (Remedial Tutoring Programme) कार्यक्रम भारतामधील दोन महानगरांमध्ये राबविण्यात आला. मुंबई आणि वडोदराच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन कायम शिक्षकासोबत विद्यार्थ्यांच्या शिकण्यातील गरजा पूर्ण करण्यासाठी सहाय्यक शिक्षक देण्यात आले. या शाळांचे यादृच्छिक व कल्पकतेने विविध गट तयार करण्यात आले. सहाय्यक शिक्षकाचा शिकण्यावर काय परिणाम घडून आला याकरिता विश्वसनीय मापके वापरण्यात आली. सहाय्यक शिक्षकाची मदत झालेला लक्ष गट हा शिकण्यांमध्ये दुर्बल होता. पण सहाय्यक शिक्षकाची मदत मिळाल्यानंतर या लक्ष गटावर अल्प आणि मध्यम कालावधीत प्रभावशाली सकारात्मक परिणाम घडून आला. अनेक गरीब देशांमध्ये शाळांच्या समस्या आहेत. शिक्षण आणि शिकवणे यामधील सहसंबंध विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार नाही. अशा शिक्षण पद्धतीमध्ये शैक्षणिक संस्था दुर्बल आहे; तर शिक्षक शाळांमध्ये गैरहजर आहे.

बॅनर्जी आणि डूफ्लो यांच्या अध्ययनानुसार, लक्ष ठरविलेल्या दुर्बल विद्यार्थ्यांना साहाय्य केले तर त्याचा सबळ सकारात्मक परिणाम घडून येतो. हे अध्ययन आंतरकृती प्रक्रियेतून (Interactive Process) घडून आले आहे. अशा प्रकारच्या नव संशोधनवरून काढलेल्या निष्कर्षाच्या सहाय्याने धोरणात्मक कार्यक्रम राबवून विद्यार्थ्यांना साहाय्य केले जाऊ शकते. सहाय्यक शिक्षकाचा कार्यक्रम भारतामधील १,००,००० शाळांमध्ये पोहोचला आहे.

अनुभवनिष्ठ चाचण्याच्या आधारे स्पष्ट करण्यात आले की, शिक्षकांच्या प्रोत्साहन आणि मापनीयतेमध्ये उणिवा आहेत. त्याचे प्रतिबिंब म्हणजे शिक्षकांची उच्चतम पातळीवर गैरहजरी आहे. यावर उपाय असा सुचविला जातो की, तो शिक्षकांना धक्का देणारा आहे. शिक्षकांच्या नियुक्त्या अल्पकाळाकरिता करार तत्त्वावर करण्यात याव्या. त्यानंतर त्यांच्या शाळेचा (वर्गाचा) निकाल उत्तम असेल तर त्यांना कायम करण्यात यावे. डूफ्लो आणि क्रेमेर यांनी कायमस्वरूपी शिक्षकांच्या शाळेची तुलना शाळेच्या निकालाच्या अटी अंतर्गत केलेली आहे. विद्यार्थी-शिक्षक प्रमाण लक्षात घेऊन काही कायम शिक्षकांच्या नियुक्त्या करण्याचे त्यांनी

सुचविले आहे. त्यांनी शोधून काढले की, जे विद्यार्थी करार तत्त्वावर असलेल्या शिक्षकांकडे होते त्यांच्या शाळांचा निकाल अधिक चांगला होता; तर जे विद्यार्थी कायमस्वरूपी शिक्षकांकडे होते त्यांच्या शाळांचा निकाल फारसा चांगला नव्हता.

नवीन अनुभवनिष्ठ संशोधन शिक्षणाच्याबाबत न्यून उत्पन्न देशांमध्ये लागू केले आहे. या संशोधनावरून स्पष्ट झाले आहे की, आधिक्याने संसाधने पुरविण्याला मर्यादित मूल्य आहे. शैक्षणिक सुधारणा घडवून आणताना विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार शिकवण्यामध्ये सुधारणा घडवून आणल्या पाहिजे तरच शिक्षणामध्ये महान मूल्य निर्माण होतात. शिक्षकाकडून गरजेनुसार जबाबदारी स्वीकारणे आणि शाळांच्या शासनामध्ये (Governance) सुधारणा होणे आवश्यक आहे. शिक्षकांकरिता हे केवळ काम नसून व्यय परिणामकारकतेचे (Cost- effective) मापक आहे.

**आरोग्य :**

दारिद्र्याच्या लढ्यातील महत्त्वाचा वादप्रश्न म्हणजे आरोग्य सुरक्षा व औषधी आहेत. पर्याप्त प्रमाणात आरोग्य सुरक्षा आणि औषधी देण्याकरिता किती खर्च येतो? याकरिता क्रेमेर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी क्षेत्रीय पातळीवर अनुभवनिष्ठ चाचण्या घेतल्या आहे. सामान्यपणे लहान मुलांना जंतांचा प्रार्दुभाव होतो. जंत हा परजीवी संसर्ग आहे. जंतांचा प्रार्दुभाव दूर करण्याकरिता जंतांच्या गोळ्यांची मागणी कशी आहे? कारण जंतांच्या गोळ्यांच्या मागणीला किमती प्रभावित करतात. याबाबतच्या अनुभवनिष्ठ चाचणीवरून असे आढळून आले की, जेव्हा जंताच्या गोळ्या मोफत दिल्या जातात तेव्हा ७५ प्रतिशत पालक त्यांच्या मुलांना ही औषधी देतात. कमी खर्चिक असतील तर केवळ १८ प्रतिशत पालक जंताच्या गोळ्या खरेदी करतात. याचाच अर्थ असा की, औषधांना अनुदान दिल्या जात नाही तोपर्यंत औषधी गरीब लोकांपर्यंत पोहचत नाही. अशा अनेक समांतर चाचण्या घेण्यात आल्या. या चाचण्यावरून दिसून आले की गरीब लोक अत्यंत किंमत संवेदनशील असतात. औषधाच्या किमतीचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर विशेषत: लहान मुलांच्या आरोग्यावर होतो. म्हणून न्यून उत्पन्न देशातील शासनांनी आरोग्य सुरक्षा प्रतिबंधक उपायामध्ये गुंतवणूक वाढविण्याची आवश्यकता आहे.

कमी दर्जाच्या आरोग्य सेवा प्राप्त होणे हा आरोग्याचा आणखी महत्त्वाचा एक पैलू आहे. का बरं? गरीब कुटुंबे आरोग्याकरिता प्रतिबंधक उपायाचा वापर करीत नाही? एका चाचणीमध्ये असे आढळून आले की, आरोग्य केंद्रावरील कर्मचारी याकरिता जबाबदार आहेत. लस घेण्याकरिता जेव्हा गरीब कुटुंबे आरोग्य केंद्रावर जातात तेव्हा आरोग्य केंद्रावर नेमलेला कर्मचारी गैरहजर असतो. म्हणून बॅनर्जी आणि डूफ्लो यांनी उपाय शोधून काढला की, भ्रमंती लसीकरण चिकित्सालये (Mobile Vaccination Clinic) असावी. त्यामुळे यावर कार्यरत असलेल्या कर्मचारी वर्गाला नियमितपणे त्या क्षेत्रामध्ये जावे लागेल व त्या क्षेत्रामधील लोकांची काळजी घ्यावी लागेल. नाहीतर आरोग्याची समस्या तशीच राहील. खेडेगावामध्ये लसीकरणाचा दर तिप्पट आहे. त्यामुळे गरीब लोकांचा चिकित्सालयामध्ये प्रवेश वाढवून लसीकरणाचा दर वाढविण्याची आवश्यकता आहे. लहान मुलांच्या लसीकरणासोबत मसुराच्या डाळीची पिशवी देणे आवश्यक आहे. कारण भ्रमंती लसीकरण चिकित्सालयाचा स्थिर व्यय फार जास्त आहे. लसीकरणासोबत गरीब कुटुंबांना मसुराची डाळ दिली तर लसीकरणावरचा खर्च अर्ध्यावर येईल. कारण मसुरामध्ये भरपूर पोषणतत्त्वे असून मसूर आरोग्यवर्धक

आहे.

लसीकरणाचे अध्ययन करीत असताना चांगल्या आरोग्य सेवाची उपलब्धता आणि प्रोत्साहने मिळणे आवश्यक आहे. वरील सर्व प्रकारचे उपाय केले म्हणजे ही समस्या पूर्णपणे सुटते असे नाही. एवढे करूनही ६१ प्रतिशत मुलांना अंशत: लसीकरण झालेले आहे. अनेक गरीब देशांमध्ये लसीकरणाचा दर न्यून आहे. त्याची अनेक कारणे आहे. त्यामधील एक महत्त्वाचे कारण म्हणजे लोक विवेकी वर्तणूक करीत नाहीत. विवेकी वर्तणुकीचे स्पष्टीकरण म्हणजे या समस्येचा गाभा आहे. हे अनेक चाचण्यावरून सिद्ध झाले आहे.

**सूक्ष्म वित्त** (Micro Credit)

दारिद्र्यामध्ये कपात घडून येण्याकरिता प्रति व्यक्ती उत्पन्नामध्ये वाढ होणे आवश्यक आहे. याकरिता गरीब कुटुंबांना व्यवसाय सुरू करण्याकरिता सहजतेने सूक्ष्म वित्त उपलब्ध होते का? याला अनुसरून सूक्ष्म वित्त कार्यक्रमावर आधारित अनेक क्षेत्रीय चाचण्या घेण्यात आल्या. बॅनर्जी आणि डूफ्लो यांनी या चाचण्या भारत, बोस्निया, इथोओपिया, मोरोक्को, मेक्सिको आणि मंगोलियामध्ये घेतल्या होत्या. या सर्व देशातील चाचण्याबाबत समांतर निष्कर्ष आढळून आले.

पत प्रतिबंधाचे परिणाम आणि कारणे याची पाहणी भारतातील हैद्राबाद शहरामध्ये केली आहे. सूक्ष्म वित्त कार्यक्रमातंर्गत (२०१४) परीक्षण केले असता असे आढळून आले की, लक्ष पेढ्यांना कर्जाचे वाटप त्यांना प्राप्त होणाऱ्या नफ्याच्या दृष्टिकोनातून केले जात होते. कर्जपुरवठा केवळ मोठ्याच पेढ्यांना केला जातो. या मोठ्या पेढ्या अनियंत्रित आहे. त्यामुळे लक्ष गरीब कुटुंबांना कर्ज प्राप्ती व्यवसायाकरिता करून द्यायची असेल तर कर्ज देण्याचा कार्यक्रम वित्त रोखासंग्रहाकडे (Financial Portfolios) द्यावा. सूक्ष्म वित्ताचा कार्यक्रम मोहंमद युनुस यांनी बांग्लादेशमध्ये यशस्वीरित्या पार पाडला होता. याबद्दल त्यांना २००६ चे नोबेल शांती पारितोषिक प्राप्त झाले होते. सूक्ष्म वित्ताचा कार्यक्रम जोपर्यंत गरीब व गरजू लोकांपर्यंत पोहोचत नाही तो पर्यंत विकासावर त्याचा सकारात्मक परिणाम घडून येत नाही.

बॅनर्जी आणि डूफ्लो यांनी प्रमाण गट सूक्ष्म वित्त प्रारूप (A Standard Group Lending Micro Credit Model) अंतर्गत यादृच्छिक पद्धतीने मूल्यांकन हैद्राबाद शहरातील सूक्ष्म वित्ताचे केले आहे. उद्योजक महिला आणि उद्योजक नसणाऱ्या महिला यांचे सूक्ष्मवित्त कार्यक्रमातंर्गत मूल्यांकन करण्यात आले. सूक्ष्मवित्ताच्या बाबत असे दिसून आले की एकूणच उचल कमी आहे. केवळ पात्र कुटुंबांनाच कर्जपुरवठा होतो. अनौपचारिक कर्ज पर्याप्त प्रमाणात दिले जाते. मात्र त्यामध्ये घसरण झालेली आहे. एकूणच गरीब कुटुंबांना कर्ज प्राप्त होण्याची स्थिती समाधानकारक नाही. प्रत्यक्ष पुराव्यावरून सिद्ध झाले आहे की, सूक्ष्म वित्ताची मागणी प्रचंड आहे. पण ही मागणी इतर कारणांकरिता आहे. उद्योजक म्हणून सूक्ष्म वित्ताची मागणी फारशी नाही. सूक्ष्म वित्ताची मदत अशाच उद्योग किंवा व्यवसायांना होते ज्याचा नफ्याचा दर ५ ते ९५ प्रतिशत आहे. अर्थात नफा प्राप्त उद्योग किंवा व्यवसायांना सूक्ष्म वित्त प्राप्त झाले आहे.

एका क्षेत्रीय चाचणीनुसार नियंत्रित गटामध्ये ज्याला लाभ प्राप्त होतो त्यांनाच सूक्ष्म वित्त प्राप्त झाले आहे. मात्र लक्ष कुटुंबे कर्ज प्राप्तीसाठी दीर्घकाळापासून प्रयत्न करीत आहे. मात्र त्यांना कर्ज प्राप्तीमध्ये अडथळ्याचा सामना करावा लागते आहे. सूक्ष्म वित्ताची सेवा ही वृद्धी किंवा विकासाचे प्राथमिक इंजिन आहे. म्हणून गरजू, गरीब कुटुंबाची व्यावसायिक पोहोच सूक्ष्म वित्तामध्ये वाढविण्याची आवश्यकता आहे.

**मर्यादित विवेकवाद :**

सामान्यपणे असे आढळून येते की, नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार लोक सहज करीत नाहीत. याबाबतच्या चाचण्या डूफ्लो आणि क्रेमेर यांनी घेतल्या आहे. विशेषत: लहान व्यावसायिक नवीन तंत्रज्ञानाचा सहज स्वीकार करीत नाहीत. उदा. सब सहारा आफ्रिकेमध्ये साधे नवप्रर्वतन देखील स्वीकारायला लोक तयार नसतात. जसे कृत्रिम पद्धतीने खत तयार केले जाते. कृत्रिम खताचा शेतीला फायदा होतो. पण हा बदल करायला ते तयार नसतात. लोकांच्या जागरुकतेबाबत चाचणी घेतली असता लोक निर्णय घेण्यास फार उशीर लावतात. त्यामुळे त्यांना येणाऱ्या उदयाचा अगदी आजच्याप्रमाणे सामना करावा लागतो. उदा. गुंतवणूक करताना निवडीला फार महत्त्व आहे. मात्र ही निवड करण्यास लोक फार उशीर लावतात. परिणामत: यातून दृष्टचक्र निर्माण होते. व्यक्तिगत पातळीवर पुरेशी गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला नाही तर भविष्यात पुरेसे व्याजदर प्राप्त होणार नाही.

समूहाच्या पातळीवर, काही नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करतात तर काही कालबाह्य तंत्रज्ञानाचा उपयोग करीत असतात. कालबाह्य तंत्रज्ञानामुळे न्यून उत्पादकता राहते. सरासरी उत्पादकतेमधील तफावत, ऋण प्राप्तीमधील उणिवा आणि दुर्बळ धोरणाची रचना अशा स्थितीत विवेकी गुंतवणूक केली जाते का? नोबेल पारितोषिक विजेत्यांच्या नुसार, जशी प्रश्नाची रचना असते तशी धोरणाची रचना तयार करावी लागते. धोरणाच्या रचनेसाठी मर्यादित विवेकवादाचा अन्वयार्थ लक्षात घ्यावा लागतो.

**धोरणात्मक परिणाम :**

नोबेल पारितोषिक विजेत्यांचे संशोधनकार्य धोरणांवर परिणाम करणारे आहे. हा धोरणांवर घडून येणारा परिणाम प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष स्वरूपाचा आहे. विविध देशांमध्ये त्यांच्या संशोधनांनी धोरणांना कसा आकार प्राप्त करून दिला तो महत्त्वाचा आहे. पण अगदी तंतोतंतपणे त्यांच्या संशोधनाच्या अनुषंगाने धोरणाचे मापन करतो म्हटले तर ते जसेच्या तसे लागू होणे शक्य नाही. याबाबत अधिक ठळकपणे असे म्हणून शकतो की, त्यांच्या संशोधनांनी धोरणांना सामर्थ्य प्राप्त करून दिले आहे.

त्यांच्या संशोधनाचा प्रत्यक्ष परिणाम धोरणांवर झालेला आहे. सहाय्यक शिक्षकाच्या शिकवणीचे (Remedial Tutoring) अध्ययन करीत असताना त्यावर प्रत्यक्षात विचार विमर्श घडून आला. त्यानंतर हा कार्यक्रम लागू होऊन त्याला अर्थसहाय्य देण्यात आले आहे. त्यामुळे आता हा कार्यक्रम भारतामध्ये ५ दशलक्ष मुलांपर्यंत पोहोचला आहे. जंताच्या प्रादुर्भावाचे अध्ययन करीत असताना त्याचा लाभ शाळेतील मुलांना मिळाला आहे. गरीब कुटुंबे फार किंमत संवेदनशील असतात. त्यामुळे यासंदर्भात निष्कर्ष काढून जागतिक आरोग्य संघटनेला (W.H.O.) अशी शिफारस केली आहे की, जंताच्या प्रादुर्भावाची औषधे वितरित करताना असा निकष लावावा की, ज्या भागामध्ये २० प्रतिशतपेक्षा जास्त मुलांना जंताचा प्रार्दुभाव झालेला आहे अशा क्षेत्रामध्ये औषधे मोफत द्यावी. त्यामुळे याचा लाभ जागतिक पातळीवर ८०० दशलक्ष शाळकरी मुलांना प्राप्त झाला आहे.

संशोधकांनी क्षेत्रीय चाचण्या घेऊन निष्कर्ष काढले आहे. या निष्कर्षाचे धोरणात रूपांतरण होऊन लोक प्रभावित झालेले आहे. ग्लोबल रिसर्च नेटवर्कनुसार (Global Research Network) बॅनर्जी आणि डूफ्लो यांनी The Abdul Jameel Poverty Action Lab (J-PAL) ची स्थापना केली आहे. या संशोधन संस्थेद्वारे जे कार्यक्रम राबविले जातात त्याचे मूल्यांकन ग्लोबल रिसर्च नेटवर्कने केलेले आहे. J-PAL द्वारे

राबविलेले कार्यक्रम ४०० दशलक्ष लोकांपर्यंत पोहोचलेले आहे. हा सर्व संशोधनात्मक प्रभाव आहे. विकासाच्या अर्थशास्त्राशी J-PAL चे अर्थशास्त्रज्ञ संलग्नित झालेले आहेत. त्यांचे संशोधन कार्य दारिद्र्याशी लढा देत आहे. त्यांचा संशोधनाचा संबंध हा केवळ पैशाच्या गुंतवणुकीशी नसून त्यामधील अपरिणामकारक मापकांशी (Ineffective Measure) आहे. शासन आणि संघटनांनी राबविण्यात येणारे धोरणात्मक कार्यक्रम अधिक प्रभावशाली होण्याकरिता महत्त्वपूर्ण संसाधने प्रस्तुत करावी. ज्यांचे मूल्यांकन करून विश्वसनीय पद्धती स्वीकारण्यास मदत होईल व त्यामधील अपरिणामकारकता दर्शविली जाईल.

**समारोप :**

पारितोषिक विजेत्यांचे संशोधन प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम घडविणारे असल्यामुळे सार्वजनिक मंडळे आणि खाजगी संघटनांच्या कार्यामध्ये बदल होत आहे. धोरणे प्रभावी ठरण्याकरिता क्षेत्रीय चाचण्यामध्ये नवीन मापकांचा समावेश केल्या जात आहे. संशोधकांनी विकासाच्या अर्थशास्त्रातील संशोधनाला पुनर्आकार दिलेला आहे. दारिद्र्य हा विषय विकासाच्या अर्थशास्त्राच्या प्रवाहामधील प्रमुख आहे. अनुभवनिष्ठ चाचण्यामुळे गेल्या २० वर्षामध्ये हा विषय फार महत्त्वाचा ठरला आहे. जागतिक दारिद्र्यात कपात घडून येण्याकरिता हे नवीन अनुभवनिष्ठ संशोधन सहाय्यक ठरले आहे. यामुळे लोकांच्या अंतर्गत क्षमता वाढून जीविकेमध्ये सुधारणा होत आहे. परिणामत: लोकांच्या जीवनात समृद्धता निर्माण होत आहे.

नोबेल पारितोषिक विजेत्यांनी अर्थशास्त्रामध्ये अनुभवनिष्ठ पद्धतीचा (प्रयोग पद्धती) वापर करून अर्थशास्त्राला विज्ञान करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र अर्थशास्त्राचे बाह्य स्वरूप वैज्ञानिक वाटत असले तरी अंतर्गत स्वरूप सामाजिकशास्त्राचे आहे हे विसरून चालणार नाही. अर्थशास्त्र मानव व्यवहाराचे शास्त्र आहे. मानव सर्वज्ञानी नसतो आणि तर्कसंगत वागत नाही. त्यामुळे अर्थशास्त्र विज्ञान नसून विज्ञान ही त्याची अभ्यास पद्धती आहे. कारण अर्थशास्त्र कलात्मक आहे.

प्रतिमानाच्या साहाय्याने विचार करणे हे अर्थशास्त्र विश्लेषण पद्धतीचे वैशिष्ट्य आहे. मात्र प्रतिमानाची निवड वैज्ञानिक निकषावर अवलंबून नसते. यामुळे अर्थशास्त्र वैज्ञानिकशास्त्र होऊ शकत नाही असा निर्वाळा प्रो. नी.वी. सोवनी यांनी केला आहे. त्यामुळे अर्थशास्त्रज्ञांनी अर्थशास्त्राला फार विज्ञानाच्या कोंदणात बसविण्यापेक्षा त्याचे मूलभूत स्वरूप प्रकट करावे. अर्थशास्त्राचे मूलभूत स्वरूप कलात्मकतेचे असून ते अधिक प्रखरपणे प्रकट करण्याची आवश्यकता आहे असे मला यानिमित्ताने वाटते.

**संदर्भसूची:**


1) Banerjee Abhijit, Duflo Esther (2019) : Good Economicis for Hard Time, Juggernaud Book, New Delhi.
2) Banerjee Abhijit, Duflo Esther (2011) : Poor Economics - A Radical rethinking of the way to fight global poverty.
3) Banerjee, Duflo (2005) : Growth Theory Through the lens of Development Economics In Handbook of Economic growth, Vol. -1
4) Banerjee, Duflo (2007) : The Economic lives of the poor, Journal of Economic perspective.
5) Banerjee, Duflo (2009) : Experimental approach to Development Economics, Annual Review of Economics.
6) Banerjee, Duflo (2014) : Do firms want to Borrow more? Testing credit constraints using a directed lending programme, Review of Economic Studies.

7) Duflo Esther (2012) : Women Empowerment and Economic Development, Journal of Economic literature.
8) Kremer Michael (2013) : Randomized Evolution of Educational Programme in Developing countries : some lessons, Americal Economic Review.
9) Kremer Michael and Edward Migual (2007) : The Illusion of Sustainbility.
10) Kremer Michael, Rachel Glennerster (2013) : The challenges of Education and learning in Developing World, Science.
11) Kremer Michael, Rachel Glennerster (2011) : Improving Health in developing countries. In Hand Book Health Economics, Vol.-2.
12) The Royal Swedish Academy of Science (2019) : Understanding Development and Poverty allivation, 14th Oct.
13) The Royal Swedish Academy of Science (2019) : Research to help the world's poor, 14th Oct.

◆

## 'अर्थसंवाद'च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (२३३५) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२ **शोधनिबंधाची प्रत अथवा सीडी पोद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क

३. **एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाइल व त्याचीच PDF केलेली फाइल) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल अॅड्रेसवर पाठवावी.** पेपरबरोबर संपादकांना शोधनिबंध पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. शोधनिबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. शोधनिबंधात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत जयळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. सदर्भ सूची देताना पूढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुबन महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, (२०१०) (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

# राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे तत्कालीन इंदूर राज्याच्या विकासातील योगदान

**जे.एस.इंगळे** †

**प्रास्ताविक :**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म दिनांक ३१ मे, १७२५ रोजी आजच्या महाराष्ट्र राज्यातील नगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील चोंडी या गावातील एका धार्मिक, सुसंस्कृत, प्रतिष्ठित, वतनदार-पाटील असलेल्या आणि लढवय्या अशा धनगर कुटुंबात झाला. त्या मानकोजी शिंदे आणि सुशिलाबाई शिंदे या दाम्पत्याच्या कन्या व तत्कालीन मराठा साम्राज्याचे आधारस्तंभ सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या स्नुषा होत. मल्हारराव होळकर आणि त्यांच्या साथीदारांनी मोठा पराक्रम करून आज मध्य प्रदेशात असणारा माळवा प्रांत दिल्लीच्या मोगल सत्तेचा अंमल असलेल्या गिरीधर बहादूर याच्याबरोबर युद्ध करून जिंकून घेतला. पुण्याच्या पेशव्यांनी म्हणजे थोरल्या बाजीराव पेशव्यांनी मल्हारराव होळकरांना सुभेदारीची वस्त्रे दिली आणि अशा प्रकारे होळकरांचे इंदूर राज्य स्थापन झाले. मल्हाररावांनी अहिल्यादेवी यांच्यावर या राज्याचा कारभार सोपवला आणि अहिल्यादेवींनी सुमारे तीस वर्षे इंदूर राज्याचा कारभार अत्यंत समर्थपणे व प्रामाणिकपणे केला.

अहिल्यादेवी यांचा विवाह दिनांक २० मे १७३३ रोजी सरदार मल्हारराव होळकर यांचा एकुलता एक मुलगा खंडेराव यांच्याशी झाला. लग्नाच्या वेळी अहिल्यादेवी यांचे वय अवघे ८ वर्षांचे होते. तर खंडेराव हे १२ वर्षांचे होते. लग्न झाल्यापासून म्हणजे वयाच्या नवव्या वर्षापासून अखेरपर्यंत सुमारे ६२ वर्षे त्यांचे वास्तव्य माळवा प्रांतातील इंदूर आणि महेश्वर या ठिकाणी होते. अहिल्यादेवी यांचे वडील मानकोजी शिंदे हे शूर लढवय्ये आणि राजकीय क्षेत्रात काम करणारे होते. ते गावचे वतनदार पाटील होते. तो युद्धाचा काळ असल्याने त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना व मुलगी अहिल्यादेवी यांना आवश्यक ते सैनिकी शिक्षण दिले होते. यामध्ये घोड्यावर बसणे, तलवार चालवणे, भाला फेकणे इत्यादी शिक्षणाचा प्रामुख्याने समावेश होता. अहिल्यादेवींचे वडील मानकोजी शिंदे यांनी दिलेल्या या सैनिकी शिक्षणाचा अहिल्यादेवींना पुढे आयुष्यभर मोठा उपयोग झाला. अहिल्यादेवी यांचे सासरे सुभेदार मल्हारराव होळकर यांनी अहिल्यादेवींना त्यांच्या विवाहानंतर राज्यकारभार चालविण्यास उपयोगी पडेल असे शिक्षण दिले.

† सहयोगी प्राध्यापक आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख (पदवी व पदव्युत्तर), बळवंत कॉलेज, विटा ता. खानापूर जि.सांगली. आजीव सदस्य क्रमांक -४२, भ्रमणध्वनी- ९७६७५२०४८२, ई-मेल - jayavantingale@gmail.com

त्यासाठी अत्यंत चांगल्या आणि विद्वान शिक्षकांची नेमणूक केली. भाषा, भूगोल, राजनीती, अर्थकारण, महसूल, शासन, प्रशासन इत्यादी विषयांची माहिती त्यांना दिली. शिक्षकांकरवी त्यांना लिहायला, वाचायला शिकवले. मोडी, हिंदी, संस्कृत इत्यादी भाषा त्यांना शिकवल्या. त्यामुळे त्यांना या भाषा बोलता येत असत आणि लिहिता सुद्धा येत असत. दिनांक १७ मार्च १७५४ रोजी एका लढाईत अहिल्यादेवी यांचे पती खंडेराव यांचा मृत्यू झाला. त्यावेळी खंडेराव यांच्या चार बायका सती गेल्या. अहिल्यादेवी यांची सुद्धा सती जाण्याची इच्छा होती. परंतु अहिल्यादेवी या हुशार, बुद्धिमान असल्याने त्याच आपले इंदूर राज्य समर्थपणे सांभाळू शकतील याची सासरे मल्हारराव होळकर यांना खात्री होती. म्हणून त्यांनी अहिल्यादेवींना सती जाऊ दिले नाही. पती खंडेराव यांचा मृत्यू झाला त्यावेळी अहिल्यादेवी या २९ वर्षांच्या होत्या. अहिल्यादेवी यांच्या सासू व मार्गदर्शक आणि मल्हारराव होळकर यांच्या पत्नी गौतमाबाई यांचा दिनांक २९-९-१७६१ रोजी मृत्यू झाला. दिनांक २० मे १७६६ रोजी वृद्धापकाळाने आणि लढाईच्या दगदगीने अहिल्यादेवींचे सासरे सुभेदार मल्हारराव होळकर यांचा मृत्यू झाला. त्यामुळे इंदूर राज्याच्या कारभाराची संपूर्ण जबाबदारी एकट्या अहिल्यादेवी यांच्यावर येऊन पडली. एकट्या अहिल्यादेवींनी इंदूर राज्याचा प्रशासकीय कारभार आयुष्याच्या अखेरपर्यंत केला. मल्हारराव हयात होते तेव्हापासूनच अहिल्यादेवी राज्याचा कारभार पाहू लागल्या होत्या. कारण युद्धाच्या व राजकारणाच्या निमित्ताने मल्हाररावांचा मुक्काम इंदूर राज्याच्या बाहेरच असे. बऱ्याच वेळा ते राज्यापासून शेकडो किलोमीटर दूर अंतरावर असत. मल्हारराव यांच्या मार्गदर्शनानुसार अहिल्यादेवीच राज्याचे प्रशासन चालवत असत. पती खंडेराव आणि सासरे सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या एकट्यावर राज्याच्या प्रशासनाची जबाबदारी येऊन पडली. ती जबाबदारी त्यांनी व्यवस्थित पेलली. त्यांनी संपूर्ण हयातभर राज्य अत्यंत चांगले चालवले म्हणून त्यांना पुण्यश्लोक असे म्हणतात. अहिल्यादेवींनी आपल्या कारकिर्दीत केवळ धार्मिक कार्येच केली असे नाही तर त्यांनी राज्याचा आर्थिक, सामाजिक विकासही घडवून आणला. अहिल्यादेवींनी आपल्या हयातीत शेकडो, हजारो मंदिरे बांधली, घाट बांधले. अन्नछत्रे, पाणपोया उघडल्या. त्यांच्या या धार्मिक कार्याने त्या संपूर्ण भारतभर प्रसिद्ध आहेत. धार्मिक कार्याबरोबरच त्यांनी इंदूर प्रांतातील कृषी, उद्योग, व्यापार इत्यादी क्षेत्रांच्या विकासासाठी, वाढीसाठी विशेष प्रयत्न केले. काही सामाजिक सुधारणा करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला. या बाबी बहुतेकांना माहीत नाहीत. म्हणून या लेखात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी तत्कालीन इंदूर राज्याच्या सर्वांगीण विकासात दिलेल्या योगदानावर पुरेसा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**कृषी विकासातील योगदान :**

अहिल्यादेवींना शेती करणारा शेतकरी आणि शेती व्यवसाय या दोहोंबद्दल मोठी आस्था होती. राज्याच्या अर्थव्यवस्थेतील शेतीचे आणि शेतकऱ्यांचे महत्त्व त्यांनी ओळखले होते. 'शेतकरी सुखी तर राज्य सुखी' या वचनावर अहिल्यादेवींचा विश्वास होता. म्हणून त्यांनी राज्याच्या प्रमुख प्रशासक या नात्याने शेतीच्या विकासासाठी अनेक निर्णय घेतले व ते अंमलातही आणले.

**१. जमिनीची मोजणी :**

अहिल्यादेवींनी शेतीची माहिती असणाऱ्या अधिकाऱ्यामार्फत राज्यातील प्रत्येक गावातील

जमिनीची मोजणी करून घेतली आणि त्या जमिनी गावातील लोकांना कसण्यासाठी दिल्या.[१] जमिनीची मोजणी केल्यामुळे राज्यातील शेतजमिनीचे एकूण क्षेत्र समजण्यास मदत झाली.

**२. पडीक जमिनींचे वाटप :**

अहिल्यादेवींचे राज्य मोठे होते तरी त्यांना राज्यातील सर्व प्रकारच्या जमिनींची चांगली माहिती होती. राज्यातील पडीक जमिनी त्यांनी राज्यातील शेतकऱ्यांना व भूमिहीनांना कसण्यासाठी वाटून दिल्या. त्यामुळे त्यांच्या राज्यातील लागवडीखालील जमिनीच्या क्षेत्रात आणि कृषी उत्पादनात वाढ घडून येण्यास मदत झाली.

**३. कृषी आदानांचा पुरवठा :**

शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी हुरूप यावा म्हणून अहिल्यादेवींनी शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते, कर्ज, अवजारे अशी सर्व प्रकारची मदत केली.[२] अहिल्यादेवींचे सरकार शेतकऱ्यांना दरसाल दरशेकडा १२% व्याजदराने कर्जपुरवठा करीत होते.

**४. बंधारे, विहिरी यांची सुविधा :**

अहिल्यादेवींनी राज्यातील शेतीच्या विकासासाठी आणखी एक पाऊल उचलले आणि ते म्हणजे शेतीला पाण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. जास्तीत जास्त कोरडवाहू शेती ओलिताखाली आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांनी आपल्या राज्यात नदीवर ठिकठिकाणी बंधारे बांधले. तसेच सरकारी खर्चाने विहिरी खोदल्या. त्यामुळे कोरडवाहू शेती बागाईत होण्यास आणि कृषी उत्पादन वाढण्यास मदत झाली.

**५. कृषी पूरक व्यवसायांना प्रोत्साहन :**

खेड्यातील शेतकरी आणि शेतमजूर यांना अधिक उत्पन्न मिळावे यासाठी अहिल्यादेवींनी त्यांना शेतीवर आधारित व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले.[३] कारण शेती हा बेभरवशाचा व्यवसाय आहे, हे त्यांना माहीत होते. म्हणून त्यांनी शेळी पालन, मेंढी पालन, म्हैस पालन इत्यादी व्यवसाय करण्यासाठी लोकांना सरकार मार्फत मदत उपलब्ध करून दिली. त्यामुळे शेतकरी व शेतमजुरांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत झाली.

**६. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई :**

शेती आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी अहिल्यादेवींनी आणखी एक गोष्ट केली ती म्हणजे युद्धामुळे किंवा सैनिकांच्या बेजबाबदारपणामुळे शेतातील पिकांचे नुकसान झाले तर ते नुकसान सरकारकडून शेतकऱ्यांना भरून देण्याची तरतूद केली.[४] त्यामुळे त्यांच्या राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यास मदत झाली.

**७. शेतसारा कमी :**

अहिल्यादेवींनी शेती किफायतशीर व्हावी आणि शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी शेतसारा कमी करण्याचा निर्णय घेतला व त्याची अंमलबजावणीही त्वरित केली. इतर राज्यांपेक्षा त्यांच्या राज्यात करांचे दर कमी होते. त्यामुळे शेती करणे शेतकऱ्यांना परवडत होते. शेतकऱ्यांकडून त्या एक बिघा जमिनीवर एक रुपया कर घेत होत्या. हा कर वसूल करून सरकारी खजिन्यात भरण्यासाठी स्वतंत्र अधिकारी नेमलेले होते. या अधिकाऱ्यांना कमाविसदार असे म्हणत असत.[५]

**८. शेतीचे नुकसान करणारे निर्णय रद्द :**

शेतकऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही याची काळजी अहिल्यादेवी घेत असत. एकदा त्यांच्या राज्याचे सेनापती तुकोजीराव होळकर यांनी राजमाता अहिल्यादेवी यांना न विचारता शेतकऱ्यावर एक रुपयाची करवाढ लादली. अहिल्यादेवींना हे समजताच त्यांनी ताबडतोब तुकोजीरावांना करवाढ रद्द करण्याचा आदेश दिला. त्या त्यांना म्हणाल्या, 'एवढीशी वाढ सुद्धा शेतकऱ्यांना डोईजड होईल. ही वाढ करू नये.

शेतकऱ्यांशी चांगले संबंध ठेवावेत.'[६] करवाढ शेतकऱ्यांना पेलणार नाही, करवाढीने शेतकऱ्यांचे नुकसान होईल असे त्यांनी तुकोजीरावांना सांगून शेतकऱ्यांचे, प्रजेचे अहित होईल असे कोणतेही निर्णय घेऊ नयेत असा आदेश दिला.

**९. शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी व्यवस्था :**

अहिल्यादेवींनी आपल्या कार्यकाळात शेतकऱ्यांच्या अडीअडचणी त्वरित सोडविण्यासाठी आपल्या अधिकाऱ्यांना आदेश आणि अधिकार देऊन ठेवले होते.[७] त्यामुळे सरकारी अधिकाऱ्यांकडून आणि सामान्य नोकरांकडून सुद्धा शेतकऱ्यांची नाडवणूक होत नव्हती. तर उलट त्यांचे अधिकारी शेतकऱ्यांना मदतच करत होते.

**१०. दुष्काळाच्या काळात सारामाफी :**

अहिल्यादेवींनी आपल्या कारकिर्दीत आपल्या राज्यातील शेतीच्या आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी आणखी एक चांगला निर्णय घेतला होता आणि तो म्हणजे त्या दुष्काळात शेतकऱ्यांकडून शेतसारा वसूल करत नसत. दुष्काळात जर पीक कमी आले तर शेतसारा माफ केला जाई.[८]

**११. शेतकऱ्यांवरील करांची संख्या मर्यादित :**

अहिल्यादेवींनी आपल्या राज्यातील शेतकऱ्यांना फारसे कर द्यावे लागणार नाहीत अशी व्यवस्था केली होती. शेतकऱ्यांकडून शेतसारा या कराव्यतिरिक्त इतर कोणताही कर घेतला जात नव्हता.[९] त्यामुळे इतर राज्यातील/संस्थानातील शेतकऱ्यांपेक्षा अहिल्या-देवींच्या राज्यातील शेतकरी आनंदी होते.

**१२. शेतीच्या प्रतवारीनुसार पिकांची लागवड :**

अहिल्यादेवींनी सरकारी खर्चाने शेतजमिनींचा विकास करून जमिनीचे पट्टे तयार केले होते व हे पट्टे कसण्यासाठी शेतकऱ्यांना दिले होते. या शेतजमिनींची प्रतवारी करण्यात आली होती व प्रतवारीनुसार पिकांची लागवड केली जात असे.[१०] त्यांच्या राज्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात पिके घेत व इतर राज्यांत शेतमाल विकून भरपूर पैसे मिळवत.[११]

अशा प्रकारे अहिल्यादेवींनी शेती आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी पडीक जमिनींचे वाटप करणे, कृषी आदानांचा पुरवठा करणे, ओलिताखालील क्षेत्रात वाढ करणे, शेतीपूरक व्यवसायासाठी शेतकऱ्यांना मदत करणे, शेतकऱ्यांकडून कमीत कमी कर वसूल करणे इत्यादी उपयुक्त निर्णय घेऊन ते अंमलात आणले. अहिल्यादेवींनी आपल्या काळात शेतकऱ्यांना शेती विकासासाठी मुबलक सोयी-सुविधा व प्रोत्साहन दिल्यामुळे अन्नधान्य व इतर कृषी उत्पादन मोठ्या प्रमाणात निर्माण होत होते. त्यामुळे त्यांच्या राज्यात अन्नधान्याची टंचाई नव्हती. अहिल्यादेवींनी शेती व शेतकरी यांच्याकडे विशेष लक्ष दिल्याने इतर राज्यापेक्षा त्यांच्या राज्यातील शेतीची आणि शेतकऱ्यांची परिस्थिती चांगली होती.

**उद्योग क्षेत्राचा/कुटीर उद्योगांचा विकास :**

अहिल्यादेवी कृषी क्षेत्राप्रमाणे उद्योग क्षेत्राचे महत्त्वही जाणून होत्या. म्हणून त्यांनी आपल्या अधिपत्याखालील माळवा प्रांताच्या उद्योग व्यवसायांच्या भरभराटीकडे विशेष लक्ष दिले. त्यांनी आपल्या राज्यात कापसापासून कापड तयार करण्याचा उद्योग, मेंढ्यांच्या लोकरीपासून लोकरी कापड तयार करण्याचा उद्योग, रेशमापासून रेशीम कापड तयार करण्याचा उद्योग, गूळ तयार करण्याचा उद्योग, कागद तयार करण्याचा उद्योग, धातू आणि दगडापासून मूर्ती बनविण्याचा उद्योग, लाकडावर नक्षीकाम व कोरीव काम करण्याचा उद्योग, शस्त्रे आणि शेतीची अवजारे तयार करण्याचा उद्योग, दागिने तयार करण्याचा उद्योग असे अनेक उद्योग भरभराटीस आणले. त्यांनी आपल्या

राज्यातील सर्व प्रांतातील उद्योग-व्यवसायांची माहिती करून घेतली होती. त्यांचे सासरे कै. मल्हारराव होळकर यांची माळवा प्रांतावर राजवट येण्यापूर्वी जे उद्योग, व्यवसाय राज्यात अस्तित्वात होते ते उद्योग, व्यवसाय त्यांनी बंद पडू दिले नाहीत. त्यांनी पूर्वीच्या उद्योग, व्यवसायांच्या विकासाकडे लक्ष तर दिलेच. पण त्याचबरोबर हे उद्योग राज्याच्या विविध प्रांतांत मोठ्या संख्येने सुरू होतील हे सुद्धा पाहिले. अहिल्यादेवींनी मदत केल्यामुळे भरभराटीस आलेल्या काही प्रमुख उद्योगांची माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

**१. कापड उद्योग :**

अहिल्यादेवींच्या राज्यात सारंगपूर, चंदेरी, सिरोज इत्यादी विविध ठिकाणी कापड तयार करण्याचे व्यवसाय चालत होते. या ठिकाणी मलमलचे कापड, विणलेले सुबक कापड तयार होत असे. काही ठिकाणी सैनिकांच्या तंबूसाठी लागणारे जाड कापडही तयार होत असे. महेश्वर या ठिकाणी सुद्धा कापड विणकामाचा उद्योग अत्यंत तेजीत होता. येथे सुद्धा अत्यंत सुबक आणि चांगले कापड तयार केले जात असे. महेश्वर या ठिकाणी कापड विणकाम उद्योग उभा राहावा यासाठी अहिल्यादेवींनी विशेष प्रयत्न केले होते. त्यांनी इतर ठिकाणच्या कापड विणकाम कारागिराबरोबरच महेश्वर येथील कारागिरांना, विणकरांना विशेष सवलती दिल्या होत्या. महेश्वर येथे विणकर कारागिरांच्या वसाहती स्थापन करण्यास त्यांनी मदत केली. त्यांनी कापड विणकर कारागिरांना विशेष सवलती दिल्यामुळे देशभरातील अनेक ठिकाणचे विणकर, कारागीर हे महेश्वर व इतर ठिकाणी येऊन स्थायिक झाले. अहिल्यादेवींच्या प्रोत्साहनामुळे व सवलतीमुळे महेश्वर या ठिकाणी कापड विणकाम उद्योगाचा मोठा विकास झाला. हजारो विणकर, कारागीर महेश्वर या ठिकाणी घरे बांधून राहू लागले. महेश्वर येथे इतर कापडाबरोबरच अत्यंत सुंदर अशा साड्या तयार होत असत. या साड्यांना महेश्वर साडी असे नाव होते. या साड्या संपूर्ण देशभर प्रसिद्ध होत्या.[१२] अहिल्यादेवींनी महेश्वर येथे कापड विणकाम उद्योगाच्या विकासासाठी विशेष लक्ष पुरविल्यामुळे महेश्वर हे कापड उद्योगाची बाजारपेठ म्हणून उदयास व नावारूपास आले. यापूर्वी महेश्वर हे नर्मदा नदीकाठचे एक खेडेगाव होते. त्या ठिकाणी अहिल्यादेवींनी इंदूरहून आपली राजधानी हलविल्याने आणि कापड विणकाम उद्योग तेथे विकसित केल्यामुळे खेडेगाव असणारे महेश्वर हे एक चांगले शहर किंवा नगर म्हणून उदयास आले. अशा प्रकारे चंदेरी, सिरोज, सारंगपूर, महेश्वर या ठिकाणच्या कापड विणकाम उद्योगाला अहिल्यादेवींनी मदत केल्यामुळे येथील विविध प्रकारचे कापड माळवा प्रांताबरोबरच देशाच्या इतर भागात सुद्धा मोठ्या प्रमाणात खपू लागले.

अहिल्यादेवींनी कापसापासून कापड तयार करण्याच्या उद्योगाबरोबरच रेशीम कापड तयार करण्याचा उद्योग आणि लोकरीचे कापड तयार करण्याचा उद्योगही भरभराटीस आणला. देशभरातून कच्चे रेशीम आयात करून त्यापासून चांगल्या दर्जाचे रेशीम कापड तयार केले जात असे. या रेशीम कापडाला माळवा प्रांतातून तसेच देशाच्या इतर भागातून मोठी मागणी होती. रेशमाचे कापड आकर्षक असल्याने परदेशात सुद्धा खपत असे. अहिल्यादेवींच्या राज्यात रेशीम कापड उद्योगाबरोबरच लोकर कापड उद्योग सुद्धा चांगला तेजीत होता. माळवा प्रांतात तयार होणाऱ्या लोकरीच्या कापडाला देशात जशी मागणी होती तशीच परदेशात सुद्धा मागणी होती. माळवा प्रांतातील मेंढ्यांच्या लोकरीबरोबरच गुजरात राज्यातूनही मेंढ्यांची लोकर आयात करून त्यापासून आकर्षक असे लोकरीचे कापड तयार केले जात असे.

अहिल्यादेवींनी कापसापासून कापड तयार करण्याच्या उद्योगाबरोबरच रेशीम कापड उद्योग आणि लोकर कापड उद्योगासही विविध सवलती दिल्या. त्यामुळे इतर राज्यातील रेशीम आणि लोकरीचे कापड तयार करणारे अनेक कारागीर अहिल्यादेवींच्या राज्यात कायमचे स्थायिक होण्यासाठी आले. त्यांना अहिल्यादेवींनी सर्व ती मदत केली. त्यामुळे इंदूर राज्यात रेशीम आणि लोकर कापड उद्योगाचाही विकास झाला.

**२. शस्त्रास्त्र निर्मिती उद्योग :**

अहिल्यादेवींचा युद्धाला विरोध होता. परंतु राज्य टिकविण्यासाठी आणि इतर राज्यांनी आक्रमण करू नये यासाठी त्यांना सतत शस्त्रसज्ज राहावे लागत असे. तसेच त्यांच्या सैन्याला पेशव्यांच्या आदेशानुसार सतत युद्धासाठी बाहेर पडावे लागत असे. त्यामुळे शस्त्रास्त्र निर्मिती आवश्यक असे. म्हणून तलवारी, तोफा, भाले, दारूगोळा इत्यादी शस्त्रास्त्र निर्मितीकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. त्यासाठी लागणारे कच्चे लोखंड काही प्रमाणात माळवा प्रांतात मिळत असे. त्याचा वापर करून शस्त्रास्त्र निर्मिती केली जात असे.

**३. शेतीची अवजारे :**

माळवा प्रांतात पुरेशा प्रमाणात कच्चे लोखंड सापडत असल्याने लोखंडापासून शेतीची अवजारे आणि इतर वस्तू तयार करण्याचा उद्योगही चांगला चालत होता. या उद्योगांच्या विकासाकडे सुद्धा अहिल्यादेवींनी विशेष लक्ष दिले. कारण शेती हा त्यांच्या राज्यातील लोकांचा प्रमुख व्यवसाय होता. त्यामुळे शेतीची अवजारे तयार करणाऱ्या उद्योगालाही अहिल्यादेवींनी मदत केली.

**४. इतर उद्योग :**

वरील उद्योगाबरोबरच अहिल्यादेवींनी आपल्या राज्यात इतरही उद्योगांच्या वाढीसाठी सुद्धा लक्ष दिले. या इतर उद्योगांमध्ये नौका तयार करण्याचा उद्योग, गूळ तयार करण्याचा उद्योग, कागद उद्योग, मूर्ती तयार करण्याचा उद्योग इत्यादी विविध उद्योगांचा समावेश होता. कापड उद्योगाप्रमाणे या उद्योगात गुंतलेल्या कारागिरांची आणि कामगारांची निवास व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे हे उद्योगसुद्धा चांगले चालत होते. या इतर उद्योगांमध्ये मूर्ती तयार करणारा उद्योग जोरात चालू होता. कारण अहिल्यादेवी स्वतः धार्मिक होत्या. त्यांचा देवावर, धर्मावर विश्वास होता. तसेच आजूबाजूच्या राज्यातील संस्थानिकांचा, राजे व महाराजे, आणि सामान्य प्रजेचाही देवाधर्मावर विश्वास होता. त्यामुळे श्रीकृष्ण, विष्णू, महादेव, गणपती इत्यादी देवतांच्या मूर्तींना मोठी मागणी होती. स्वतः अहिल्यादेवींनी राज्यात व राज्याच्या बाहेर शेकडो मंदिरे बांधली होती. तसेच इतर संस्थानांत सुद्धा तेथील राजे लोक, श्रीमंत लोक सतत मंदिरे बांधत असत. त्या मंदिरात बसविण्यासाठी देवतांच्या मूर्तीची आवश्यकता होती. म्हणून त्यांनी त्यांच्या राज्याची राजधानी महेश्वर या ठिकाणी मूर्ती बनविणाऱ्या कारागिरांना आश्रय दिला. अहिल्यादेवींच्या राज्यात मूर्तींना मोठी मागणी असल्याने महेश्वर आणि अन्य ठिकाणी सुद्धा मूर्ती तयार करण्याचा उद्योग चांगलाच फोफावला. येथील कारागीर लोक दगड (पाषाण) आणि धातूपासून अत्यंत सुंदर मूर्ती बनवत असत. मूर्ती बनविणाऱ्या कारागिरांना अहिल्यादेवींच्या राज्यात मानसन्मानही होता आणि मोबदलाही चांगला मिळत होता.[१३] त्यामुळे देशाच्या अनेक भागातील मूर्ती बनविणारे कारागीर अहिल्यादेवींच्या राज्यात कायमचे वास्तव्यास आले. त्यामुळे देव देवतांच्या मूर्ती तयार करण्याचा उद्योग अल्पावधीतच भरभराटीस आला.

लाकडावर कोरीव काम करून विविध प्रकारच्या

नक्षी तयार करणाऱ्या कारागिरांना अहिल्यादेवींनी पुरेशा सवलती दिल्या होत्या. नक्षीकाम केलेल्या लाकडांचा उपयोग मंदिरासाठी केला जात असे. तसेच श्रीमंत लोकांच्या हवेल्या, वाडे यांच्यासाठी सुद्धा केला जात असे. त्यामुळे हा उद्योग सुद्धा चांगलाच फोफावला होता.

अशा प्रकारे राज्यातील सर्व उद्योगांना मदत करण्याचे, प्रोत्साहन देण्याचे अहिल्यादेवींचे धोरण होते. त्यामुळे त्यांच्या काळात वरील सर्व उद्योगांचा विकास घडून आला. कारागीर, कामगार यांना त्यांनी चांगल्या सोयी-सुविधा दिल्यामुळे त्यांच्या राज्यातील कारागीर व इतर कुशल, अकुशल मजूर दुसऱ्या राज्यात तर गेले नाहीतच शिवाय इतर राज्यातील कारागीर, कामगार त्यांच्या राज्यात कायमचे वास्तव्याला आले. अहिल्यादेवींच्या राज्यात चांगले उत्पन्न मिळते तसेच चांगला मानसन्मान व बक्षीसी मिळते हे ऐकून इतर राज्यातील कारागीर, कामगार त्यांच्या राज्यात येऊन राहू लागले. त्यामुळे विविध उद्योग, व्यवसायांचा विकास घडून येण्यास मदत झाली.

**अहिल्यादेवींची इतर क्षेत्रातील कामगिरी :**

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी इंदूर राज्याच्या विकासासाठी केवळ कृषी आणि उद्योग क्षेत्राच्या विकासावरच भर दिला नाही तर त्यांनी इतरही विविध क्षेत्रांत सुद्धा विशेष कामगिरी केली. त्याची माहिती थोडक्यात खालीलप्रमाणे दिली आहे.

**१. व्यापार वाढीसाठी मदत :**

अहिल्यादेवींनी कृषी व उद्योग या क्षेत्राबरोबरच व्यापार क्षेत्राच्या विकासाकडेही लक्ष दिले. त्यांनी व्यापाऱ्यांना विविध सवलती दिल्या. त्यांच्यावर कमीत कमी कर बसवला. व्यापारी व प्रवाशांची लूट होऊ नये म्हणून अवघड वाटेवर चौक्या बसवून सशस्त्र सैनिकांचे संरक्षण केले.[१४] त्यामुळे लुटारूंपासून व्यापाऱ्यांना संरक्षण मिळाले. व्यापाऱ्यांच्या मुक्कामाच्या वाटेवर रात्रीच्या विसाव्यासाठी इमारती बांधल्या. रस्ते दुरुस्तीस प्राधान्य दिले, त्यामुळे व्यापार वाढला. त्यांनी राज्यातील व्यापाऱ्यांना सवलती व संरक्षण दिल्याने अंतर्गत व्यापाराबरोबरच परकीय व्यापारातही वाढ झाली. त्यांच्या राज्यात तयार होणाऱ्या अनेक वस्तू इतरही राज्यांत विकल्या जात होत्या. अहिल्यादेवींनी आपल्या राज्यातील वस्त्रोद्योगाला खास संरक्षण दिले होते. त्यामुळे या उद्योगातील वस्तूंची खरेदी-विक्री खूपच वाढलेली होती.

**२. शहरांची निर्मिती व विकास :**

अहिल्यादेवींनी इंदूर आणि महेश्वर या दोन खेड्यांचा विकास करून त्यांचे चांगल्या व सुंदर शहरात रूपांतर केले. महेश्वर सारख्या खेड्यात त्यांनी उद्योग, व्यवसाय आणल्याने कुशल आणि अकुशल कामगारांना राहण्यासाठी जागा दिल्याने त्या खेड्यांचे शहरात रूपांतर होऊ शकले. मुलगा मालेराव यांच्या मृत्यूनंतर अहिल्यादेवींना इंदूर शहर सोडावेसे वाटले. म्हणून त्यांनी नर्मदा नदीच्या काठावर असलेल्या महेश्वर येथे आपली राजधानी हलवली. येथे त्यांनी किल्ल्यावर आपले निवासस्थान बांधले. लोकांना घरे बांधून दिली. बाजारपेठा, रुंद रस्ते, प्रार्थनास्थळे, स्वच्छतागृहे, धर्मस्थळे अशा सुविधा त्यांनी या खेड्यात उपलब्ध करून दिल्या.[१५] त्यामुळे महेश्वर या खेड्याचे शहरात रूपांतर होऊ शकले. अहिल्यादेवींनी निर्माण केलेली इंदूर आणि महेश्वर ही शहरे गर्दीने ओसंडलेली व बकाल स्वरूपाची नव्हती तर ही शहरे शांत व निसर्गरम्य होती. या शहरात अहिल्यादेवी सन १७६६ पासून मृत्यूपर्यंत म्हणजे सुमारे ३० वर्षे राहिल्या होत्या. त्यामुळे या शहरात त्यांनी विविध सोयी, सुविधा निर्माण केल्या होत्या. त्यावेळचे शाहीर अनंत फंदी यांनी महेश्वरला भेट देऊन महेश्वरचे सुंदर वर्णन

केले आहे. ते म्हणतात, 'नर्मदेच्या काठी बांधण्यात आलेल्या असंख्य उंच उंच मंदिरामुळे व सुंदर घाटामुळे महेश्वर तीर्थक्षेत्र कैलासासारखे मनोहर वाटते. महेश्वरमध्ये गडगंज संपत्ती आहे. शहर मोठे, छानदार आहे. मोठमोठे बाजार आहेत. टोलेजंग दुकाने व लक्षाधीश सावकार आहेत. दुकानात सर्व तऱ्हेचा माल खच्चून भरला आहे. सर्वच वस्तू अगदी स्वस्त आहेत. कोणत्याही गोष्टीची टंचाई नाही.'[१६] अहिल्यादेवींनी महेश्वर या खेड्यात अनेक धार्मिक, ऐतिहासिक अशी प्रेक्षणीय स्थळे उभारून महेश्वरची शोभा वाढवली. अहिल्यादेवींनी आणि त्यांच्या वारसांनी उभ्या केलेल्या इमारती, देवळे, घाट आजही महेश्वर येथे पाहावयास मिळतात.

**३. दुष्काळ प्रतिबंधक उपाय :**

आजच्याप्रमाणे अहिल्यादेवींच्या काळात सुद्धा दुष्काळाची समस्या होतीच. परंतु अहिल्यादेवींनी दुष्काळाचे चटके जनतेला फारसे बसू दिले नाहीत. कारण त्या दुष्काळात विशेष दुष्काळी कामे काढत असत. दुष्काळ जाणवू नये म्हणून त्यांनी राज्यात ठिकठिकाणी तलाव, विहिरी इत्यादींचे बांधकाम केले होते. दुष्काळात त्या शेतकऱ्यांकडून शेतसारा वसूल करीत नसत. अशा प्रकारे दुष्काळ ही अपरिहार्य व नैसर्गिक आपत्ती असली तरी त्याकडे अहिल्यादेवी दुर्लक्ष करीत नसत. त्यांच्या राज्यातील जांब या गावी पाण्याची तीव्र टंचाई असे. त्या गावाला फक्त पावसाळ्यातच पाणी मिळत असे. म्हणून त्यांनी तेथील चोल नदीवर धरण बांधून कृत्रिम सरोवर निर्माण केले.[१७] अशा प्रकारे दुष्काळ पडल्यानंतर त्या दुष्काळाची झळ जनतेला बसू नये; यासाठी अहिल्यादेवी जसे कार्य करत होत्या त्याप्रमाणे दुष्काळ उद्‌भवू नये, यासाठी सुद्धा काही उपाय योजत होत्या. त्यामुळे इतर राज्यांना दुष्काळाची जेवढी झळ बसत होती तेवढी झळ त्यांच्या राज्यातील जनतेला बसत नव्हती.

**४. विकासासाठी वृक्षारोपण :**

अहिल्यादेवींना राज्याच्या विकासातील वृक्षांचे महत्त्व माहीत होते. म्हणून त्यांनी आपल्या कारकिर्दीत वृक्षारोपण कार्यक्रमालाही महत्त्व दिले होते. त्यांनी संपूर्ण राज्यांत विविध वृक्षांची रोपे लावून ती जतन केली. रस्त्याच्या दोन्ही बाजूला त्यांनी झाडे लावली होती. शेतकऱ्यांना व इतर जनतेला वृक्षारोपण करण्यास त्या प्रोत्साहन देत असत. वृक्षतोडीस त्यांचा विरोध होता. झाडे तोडणाऱ्यांना दंड करण्याची तरतूद त्यांनी केली होती. शेतकऱ्यांनी आपल्या बांधावर व अवतीभवती वड, चिंच, पिंपळ, कडूलिंब इत्यादी दीर्घायुषी बलदंड वृक्ष लावावेत व त्यापैकी ११ झाडांचे उत्पन्न सरकारला व बाकीच्या झाडांचे उत्पन्न शेतकऱ्यांच्या मालकीचे राहील, असा नियम केला होता.[१८] अशा प्रकारे अहिल्यादेवींनी स्वतः सरकारमार्फत वृक्षारोपण कार्यक्रम राबविलाच शिवाय जनतेला वृक्षरोप लागवडीस प्रोत्साहन दिले. त्यामुळे वास्तू बांधण्यासाठी त्यांच्या राज्यात लाकडाची टंचाई भासत नसे.

**५. गरिबी निर्मूलनासाठी रोजगार :**

अहिल्यादेवींना आपल्या राज्यात कोणीही गरीब किंवा उपाशी राहू नये असे वाटत असे. लहान-लहान कुटीर उद्योगांना मदत करून आणि खाजगी व सरकारी नोकऱ्या देऊन गरिबी नष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. निराधार पशुपक्ष्यांना चारापाणी देण्यासाठी, मुंग्या व माशांना अन्न देण्यासाठी त्यांनी मोठा नोकरवर्ग नेमला होता.[१९] अशा प्रकारे आज किरकोळ वाटणाऱ्या कामासाठी सुद्धा नोकर ठेवून कामे करवून घेण्याच्या अहिल्यादेवींच्या धोरणामुळे राज्यातील गरिबांना सहज रोजगार मिळत होता. गरिबी निर्मूलनासाठी अहिल्यादेवींनी केलेले आणखी एक

बहुमोल कार्य म्हणजे त्यांनी राज्यातील पडीक परंतु शेती उपयोगी जमीन कसण्यासाठी भूमिहीन लोकांना दिली.[२०] त्यामुळे त्यांना जगण्याचे हक्काचे साधन मिळाले.

**६. पायाभूत सुविधांचा विकास :**

अहिल्यादेवींनी आपल्या राज्यात अनेक ठिकाणी चांगले रस्ते बांधले. दिल्ली ते कलकत्ता आणि बनारस ते कलकत्ता या रस्त्यांची दुरुस्ती त्यांनी केली.[२१] विहिरी, घाट, तलाव, किल्ले यांची सुद्धा त्यांनी बांधकामे केली. राज्याच्या विकासाच्या दृष्टीने या सुविधा महत्त्वाच्या होत्या. अहिल्यादेवींनी टपाल, दळणवळण व्यवस्था सुद्धा जलद व कार्यक्षम बजावली. रस्ते दुरुस्ती, तलावांचे बांधकाम याकडे पुरेसे लक्ष दिल्याने राज्यातील शेती, उद्योग, व्यापार या क्षेत्रांच्या विकासास मदत झाली.

**७. करविषयक सुधारणा :**

अहिल्यादेवींनी केलेली आणखी एक बहुमोल कामगिरी म्हणजे राज्याचा कारभार हाती येताच त्यांनी काही करविषयक सुधारणा केल्या. त्यांनी करांची निश्चिती अगोदरच केली. त्यामुळे आपणास किती कर भरावा लागणार आहे हे कर भरणाऱ्यांना समजत असे. त्यांनी करांचे दर कमी केले. शेतकरी, व्यापारी, कारागीर, उद्योजक यांना परवडतील असे करांचे दर निश्चित केले. कर वसुलीसाठी नियम साधे, सोपे बनवले.[२२] अनेक अन्यायकारक कर त्यांनी रद्द केले. इतर राज्यांपेक्षा त्यांच्या राज्यात करांचे दर कमी असल्याने त्यांच्या राज्यातील शेती, उद्योग, व्यापार या क्षेत्रांची प्रगती घडून आली. कर सुटसुटीत असल्याने आणि करांचे दर परवडणारे असल्याने लोक कर बुडवत नसत. लोक स्वतःहून सरकारी खजिन्यात कर भरून येत.[२३] करांचे दर कमी असूनसुद्धा राज्याला महसूल चांगला मिळत होता. एकदा त्यांच्या अधिकाऱ्यांनी त्यांना सल्ला दिला की, 'काही वस्तूंवर शेजारच्या राज्यात आपल्यापेक्षा जास्त कर घेतला जातो म्हणून आपणही करात वाढ करावी', हा सल्ला ऐकून अहिल्यादेवींनी करात वाढ केली नाहीच. उलट करात कपात केली. त्या म्हणाल्या, 'नाही, हा कर आणखी कमी करावा. प्रजेच्या उपयोगाच्या वस्तूवर जास्त कर लावणे कदापि योग्य नव्हे.'[२४] प्रजेला झेपेल एवढाच कर घ्यावा, असे त्यांचे मत होते. एकदा त्यांच्या सेनापतीने त्यांना न विचारता एक रुपयांची करवाढ केली. अहिल्यादेवींनी तात्काळ ही करवाढ रद्द केली आणि अशा प्रकारे करवाढ करून प्रजेला त्रास देण्याचे उद्योग न करण्याची ताकीद त्यांनी सेनापतीला दिली. अधिकाऱ्यांनी जादा कर वसूल केल्यास अहिल्यादेवी त्या अधिकाऱ्यावर कारवाई करत आणि लोकांकडून जेवढा जादा कर वसूल केला असेल तेवढा कर त्या लोकांना परत करत. अहिल्यादेवी या राज्याच्या प्रमुख प्रशासक असल्याने त्यांना विचारल्याशिवाय कोणत्याही अधिकाऱ्याला करांच्या दरात बदल करता येत नसे अथवा कोणताही नवीन कर बसवता येत नसे.

**८. कायद्यात सुधारणा :**

अहिल्यादेवींनी आपल्या कारकिर्दीत जनतेला त्रासदायक ठरणारे कायदे रद्द केले. काही जुन्या कायद्यात बदल केले. काही नवीन कायदे सुद्धा त्यांनी केले. शेती, व्यापार, कुटीर उद्योगांच्या विकासासाठी काही नियम केले. सरदार, जहागीरदार व अधिकारी यांना त्या वेळोवेळी जे तोंडी व लेखी आदेश देत असत त्या आदेशांना कायद्याएवढेच महत्त्व होते. त्या आदेशांनाच पुढे कायद्याचे स्वरूप प्राप्त होत असे. त्यांनी केलेल्या विविध कायद्यामुळे व जुन्या कायद्यात केलेल्या दुरुस्त्यांमुळे राज्याची भरभराट होण्यास मदत झाली.

**९. स्त्रियांच्या विकासाकडे लक्ष :**

अहिल्यादेवींना स्वत:ला लिहा-वाचायला येत असे. आपल्या राज्यातील स्त्रियांनी सुद्धा लिहा-वाचायला शिकावे, स्वत:ची प्रगती करावी, स्वत:च्या पायावर उभे राहावे असे त्यांना वाटत असे. त्यांनी स्त्रियांच्या विकासासाठी काही कायदे केले. तसेच काही सुधारणा केल्या. त्यामुळे स्त्रियांचा विकास घडून येण्यास मदत झाली. अहिल्यादेवींनी राज्याच्या प्रमुख प्रशासक या नात्याने हुंडाबंदी कायदा करून त्याची कडकपणे अंमलबजावणी केली. हुंडा देणाऱ्यांना आणि घेणाऱ्यांना त्यांनी आर्थिक दंडाची तरतूद केली.[२५] त्यामुळे गरीब कुटुंबातील मुलींची लग्ने योग्य वयात होऊ लागली. नवऱ्याच्या मृत्यूनंतर स्त्रियांनी सती जावे यासाठी त्यांच्यावर दबाव आणता येणार नाही असा कायदा त्यांनी केला. त्यामुळे अनेक निष्पाप स्त्रियांचे प्राण वाचू शकले. अहिल्यादेवींनी स्वत: कधी चेहऱ्यावर पडदा किंवा बुरखा वापरला नाही. तसेच राज्यातील स्त्रियांवरसुद्धा बुरखा वापरण्याची सक्ती केली नाही. अहिल्यादेवी यांच्या काळात सुद्धा निराधार व विधवा स्त्रियांना काही समस्यांना तोंड द्यावे लागत असे. छळामुळे काही स्त्रिया स्वत:हून घराबाहेर पडत असत. तर काही स्त्रियांना घराबाहेर काढले जात असे. अशा निराधार आणि विधवा स्त्रियांचे जीवन सुसह्य करावे यासाठी अहिल्यादेवींनी महिलाश्रम आणि अनाथाश्रम काढले.[२६] विधवा, निराधार स्त्रियांना अहिल्यादेवींचा मोठा आधार वाटत असे. त्यांनी अशा स्त्रियांचे स्वार्थी नातेवाईक आणि समाजातील फसवणूक करणाऱ्या इतर लोकांपासून संरक्षण केले. त्यांनी अपत्यहीन विधवा स्त्रियांना मुले दत्तक घेण्याचा अधिकार दिला. तसा कायदा केला. मूलबाळ नसलेल्या विधवा स्त्रियांची संपत्ती सरकार जप्त करत असे.[२७] त्यांनी हा अन्यायकारक कायदा रद्द करून टाकला. त्यामुळे विधवा स्त्रियांना अहिल्यादेवीकडून कायदेशीर संरक्षण मिळाले. त्यांची मालमत्ता आणि पैसे सुरक्षित राहिले. राज्यातील काही अपत्यहीन विधवा स्त्रिया अहिल्यादेवींची भेट घेऊन आपली सर्व संपत्ती अहिल्यादेवींनी घ्यावी अशी विनंती करत असत. परंतु अहिल्यादेवींनी त्यांची एक पै सुद्धा घेतली नाही. दत्तक घेऊन, 'तुम्ही तुमची मालमत्ता सांभाळा', असा सल्ला त्या विधवा स्त्रियांना देत असत. 'जर दत्तक घेणार नसाल तर आपली संपत्ती समाजाच्या कल्याणासाठी खर्च करा', असे त्या विधवांना सुचवत असत. त्याप्रमाणे राज्यातील अनेक विधवा स्त्रियांनी अहिल्यादेवींच्या पावलावर पाऊल ठेवून आपला पैसा समाजाच्या कल्याणासाठी खर्च केला. या निपुत्रिक विधवा स्त्रियांनी पूल बांधले, घाट बांधले, रस्ते बांधले, विहिरी खोदल्या. यामुळे त्या विधवा स्त्रियांनाही समाधान मिळाले आणि जनतेलाही काही सोयीसुविधांचा लाभ मिळाला. अहिल्यादेवींनी आपल्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली स्त्रियांची स्वतंत्र फौज उभी केली होती.[२८] त्यांच्या फौजेत हजारो स्त्रिया होत्या. अशा प्रकारे अहिल्यादेवींनी स्त्रियांना सैन्यात भरती करून त्यांच्या कर्तृत्वाला वाव दिला होता. तसेच त्या माध्यमातून त्यांना नोकऱ्याही उपलब्ध करून दिल्या होत्या. तसेच गरीब महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहता यावे यासाठी कुटीर उद्योग, हस्तोद्योग सुद्धा त्यांनी सुरू करून दिले होते. [२९]

**१०. भिल्ल, गोंड इ. आदिवासींचे पुनर्वसन :**

डोंगरात, जंगलात राहणारे भिल्ल, गोंड इत्यादी विविध जमातीतील बहुसंख्य लोक चोरी हा आपला हक्क आणि वंशपरंपरागत धंदाच आहे असे समजत असत व त्याप्रमाणे व्यापारी, प्रवाशी, यात्रेकरू यांना अडवून त्यांना लुटत असत. तसेच लोकांच्या घरावर दरोडे टाकत असत. त्यामुळे व्यापारी व जनता त्रस्त

झाली होती. चोऱ्या, दरोडे यावर उपजीविका करणाऱ्या लोकांनी सन्मार्गावर यावे, त्यांनी वाईट धंदे सोडून द्यावेत असे अहिल्यादेवींना वाटत असे. म्हणून त्यांनी भिल्ल, गोंड इत्यादी आदिवासी जमातीतील गुन्हेगारी प्रवृत्ती कमी करण्याचा प्रयत्न केला. त्या स्वत: त्यांच्या वसतिस्थानात डोंगरात, जंगलात फिरल्या.[३०] त्यांची परिस्थिती जवळून बघितली. त्यांचे भयंकर दारिद्र्य पाहिले. त्यांच्या मुलाबाळांचे हाल पाहिले. अहिल्यादेवींनी चोर, दरोडेखोर यांच्या प्रमुखांची बैठक घेतली आणि त्यांना चोऱ्या करणे कसे चुकीचे आहे ते समजावून सांगितले. त्यांना पाप-पुण्याच्या गोष्टी सांगून त्यांचे प्रबोधन केले.[३१] परंतु पोटापाण्यासाठी चोऱ्या करणाऱ्या आदिवासी समाजातील गुन्हेगारांचे केवळ प्रबोधन करून चालणार नाही, याची अहिल्यादेवींना पूर्ण कल्पना होती. म्हणून त्यांनी अनेक गरीब, भिल्ल, गोंड इत्यादी लोकांना उपजीविकेसाठी नोकऱ्या दिल्या. चोऱ्या, वाटमारी करणाऱ्या भिल्लावर त्यांनी प्रवाशी, यात्रेकरू आणि व्यापारी यांच्या संरक्षणाची जबाबदारी सोपविली. याबद्दल त्यांना राज्याच्या तिजोरीतून पुरेसे वेतनही दिले. त्यांनी अनेक भिल्लांना आपल्या राज्यात कायम स्वरूपाच्या नोकऱ्या दिल्या. भटक्या, आदिवासी लोकांचे पुनर्वसन करून त्यांना सन्मानाने जीवन जगण्याची संधी त्यांनी दिली.[३२] ज्यांनी अहिल्यादेवींच्या प्रबोधनाकडे व पुनर्वसनाकडे दुर्लक्ष करून गुन्हेगारी चालूच ठेवली, त्या दरोडेखोरांच्या टोळीच्या प्रमुखांना तोफेच्या तोंडी देऊन गुन्हेगारांवर वचक बसविला.[३३] त्यामुळे राज्यातील चोर, दरोडेखोर यांचे प्रमाण खूपच कमी झाले. अहिल्यादेवींनी आपल्या राज्यातील गुन्हेगारी कमी करण्यासाठी पोलीस आणि लष्करी ताकद कमीत कमी वापरली. गुन्हेगारांचे प्रबोधन करणे आणि त्यांना रोजगार देणे याच बाबींना त्यांनी विशेष महत्त्व दिले. गावाची राखण करण्यासारख्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या त्यांच्यावर देऊन त्यांना चांगले नागरिक बनवले. समाजात प्रतिष्ठा मिळवून दिली. जंगलात, डोंगरात भटकणाऱ्या व एकवेळच्या अन्नाला महाग असणाऱ्या आदिवासी लोकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न अहिल्यादेवींनी आपल्या कारकिर्दीत केले.

**११. हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती :**

अहिल्यादेवींनी आपल्या राज्यात विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सुद्धा सोय केली होती. त्या स्वतः सुशिक्षित होत्या. माहेरी व सासरीही त्यांचे शिक्षण झाले होते. त्यामुळे त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटले होते. हुशार विद्यार्थ्यांना त्या शिष्यवृत्ती देत असत.[३४] स्त्रियांनी सुद्धा शिक्षण घ्यावे असे त्यांना वाटत असे. त्यांनी लष्करी विद्यालयाची सुद्धा स्थापना केली होती. अशा प्रकारे अहिल्यादेवी या स्वतः सुशिक्षित असल्याने त्या प्रजेच्या व राज्याच्या शैक्षणिक विकासाकडे सुद्धा लक्ष देऊ शकल्या.

**१२. ग्रंथालयाची निर्मिती :**

अहिल्यादेवी साक्षर होत्या. त्यांना लिहिता-वाचता येत असे. त्यांना धार्मिक ग्रंथांची आवड होती. मानसिक स्वास्थ्यासाठी आणि आचरण शुद्ध राहावे यासाठी त्या अशा प्रकारच्या ग्रंथांचे नियमित वाचन करीत असत. त्यांना असणाऱ्या ग्रंथ वाचनाच्या आवडीतून आणि वर्तमान व पुढील पिढ्यांना उपयोगी पडावे म्हणून त्यांनी महेश्वर येथे ग्रंथालयाची उभारणी केली होती. त्यांच्या ग्रंथालयात धार्मिक ग्रंथाबरोबरच ऐतिहासिक कागदपत्रे, महत्त्वाचा पत्रव्यवहार यांचेही जतन करण्यात आले होते. ग्रंथ, कागदपत्रे यांच्या जतनासाठी त्यांनी खास कर्मचारी नेमले होते. त्यांनी इंदूरला असल्यापासूनच सर्व पत्रव्यवहार व महत्त्वाची कागदपत्रे जतन करण्यासाठी विशेष रेकॉर्ड रूम व रेकॉर्ड किपरची नेमणूक केली होती.[३५] काही दुर्मिळ

ग्रंथ जुने व जीर्ण झालेले होते. ते ग्रंथ त्यांनी नव्याने लिहून घेतले. चांगले हस्ताक्षर असणाऱ्या लोकांना आर्थिक मोबदला देऊन त्यांच्याकडून त्यांनी जुने ग्रंथ नव्याने लिहून घेतले. त्यांनी आपल्या ग्रंथालयात शेकडो दुर्मिळ ग्रंथ साठवले होते. पेशवे आणि छत्रपती यांच्याकडे सुद्धा नसलेले काही दुर्मिळ ग्रंथ अहिल्यादेवींच्या ज्ञानभांडारात होते.[३६] त्या कधी कधी सामुदायिक ग्रंथ वाचनाचा कार्यक्रम सुद्धा ठेवत असत. या कार्यक्रमालाही त्या स्वतः आणि सामान्य लोक सुद्धा हजर राहत असत. महेश्वर येथे अनेक नामवंत लोकांना निमंत्रण देऊन विविध विषयांवर त्या चर्चासत्रांचे आयोजन करीत व या निमंत्रित लोकांच्या अभ्यासाची, निवासाची व भोजनाची व्यवस्था त्या करीत.

**१३. दवाखान्याची सुविधा :**

अहिल्यादेवींनी आपल्या राज्यातील गोरगरिबांसाठी ज्या विविध सोयीसुविधा केल्या त्यामध्ये औषधे व दवाखाने यांची सुविधा ही एक महत्त्वाची सुविधा होती. जनतेची प्रकृती चांगली राहावी यासाठी त्या मोफत औषधे देत असत.[३७] अशा प्रकारे औषधासारखी महत्त्वाची सोय विनामूल्य पुरवून अहिल्यादेवींनी लोकांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष दिले होते हे लक्षात येते. औषधे व दवाखान्यांच्या सुविधेमुळे लोकांचे जगणे सुसह्य झाले होते. त्यांचे हे कार्य त्यांच्या काळाच्या दृष्टीने खूपच महत्त्वाचे होते. कारण औषधांचा खर्च व वैद्याचा खर्च श्रीमंतांनाच परवडणारा असतो. परंतु गरीब जनतेला या सोयी मोफत पुरवून अहिल्यादेवींनी गरिबांची खूपच चांगली काळजी घेतली.

**१४. आदर्श न्यायव्यवस्थेची उभारणी :**

अहिल्यादेवी यांनी आपल्या राज्यातील लोकांच्या कल्याणासाठी केलेले आणखी एक बहुमोल कार्य म्हणजे त्यांनी आपल्या राज्यात आदर्श आणि निष्पक्षपाती न्यायव्यवस्था उभी केली. लोकांना त्यांच्या गावातच न्याय मिळाला पाहिजे, असे त्यांचे मत होते. न्यायासाठी लोकांना पायपीट करावी लागू नये व त्यांचा वेळ खर्च होऊ नये यासाठी त्यांनी प्रत्येक गावात न्यायपंचायतीची स्थापना केली. या पंचायतीत हुशार आणि अनुभवी लोक पंच म्हणून नियुक्त केले. या पंचायतीच्या कारभारावर अहिल्यादेवींचे लक्ष असे. त्या न्यायदान करणाऱ्या पंचांना, न्यायाधिशांना मार्गदर्शन करत असत, त्यांना उपयुक्त सल्ला देत असत. अहिल्यादेवींच्या राज्यात त्वरित आणि मोफत न्याय मिळत होता. न्याय मिळविण्यासाठी किंवा तक्रार दाखल करण्यासाठी लोकांना खर्च करावा लागत नव्हता. गावातील पंचांनी दिलेला निर्णय एखाद्याला अमान्य असेल, न्यायनिवाड्याबाबत शंका वाटत असेल तर त्याला अहिल्यादेवींच्या दरबारात अपील करण्याची परवानगी होती.[३८] प्रत्येक खटल्याला बारकाईने अभ्यास करून तक्रारदारांचे आणि आरोपींचे म्हणणे पूर्ण ऐकून, दरबारातील अधिकारी आणि वकील यांचा सल्ला घेऊन त्या न्यायदान करीत असत. न्यायासाठी त्यांच्या दरबारात गरीब, श्रीमंत यांना मुक्त प्रवेश होता. दिवाणी, फौजदारी तंट्याबरोबरच घरगुती/वैयक्तिक प्रश्न सुद्धा अहिल्यादेवी सोडवत असत. गरीब लोकांना त्यांच्या राजवाड्याचे दार सदैव खुले होते. घरगुती प्रश्न घेऊन आलेल्या गरीब लोकांना त्या चांगला सल्ला देत व सुखाने संसार करण्यास सांगत. राजमाता अहिल्यादेवी यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून कधीही, कोणावरही अन्याय केला नाही. तसेच आपल्या अधिकाऱ्यांनाही कोणावर अन्याय करू दिला नाही. न्यायदान करताना त्या गुन्हेगाराची जात, धर्म, नातेगोते, अधिकारपद पाहत नसत. कुटुंबातील, नात्यातील ज्या-ज्या व्यक्ती दोषी आढळल्या त्यांनासुद्धा त्यांनी शिक्षा केल्या. त्यांच्या

न्यायदानाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्या किरकोळ गुन्हे केलेल्या गुन्हेगारांना सुधारण्याची एक संधी देत असत. परंतु एखादा गुन्हेगार सतत गुन्हा करत असेल किंवा एखाद्याने पहिलाच गंभीर स्वरूपाचा गुन्हा केला असेल तर त्याला अत्यंत कडक शिक्षा देत असत.

**१५. मंदिरांची उभारणी व जीर्णोद्धार :**

अहिल्यादेवींनी आपल्या राज्यात आणि राज्याच्या बाहेर शेकडो मंदिरे बांधली. काही जुन्या मंदिरांचा जीर्णोद्धार केला. भ्रष्ट व नष्ट केलेली मंदिरे त्यांनी नवीन बांधली. हिंदुस्थानातील बारा ज्योतिर्लिंगापैकी पाच ज्योतिर्लिंगांचा जीर्णोद्धार अहिल्यादेवींनी केला.[३९] काही मंदिरात पूजाअर्चेची सोय केली. मंदिराबरोबर त्यांनी काही इमारतीही बांधून दिल्या. तसेच जमिनीही दान दिल्या. या इमारतींच्या भाड्यातून आणि जमिनीच्या उत्पन्नातून मंदिरातील धार्मिक कार्यक्रमांचा खर्च भागत असे. त्यामुळे धार्मिक कार्यासाठी मंदिर व्यवस्थापकांना सरकारवर अवलंबून राहावे लागत नसे. लोकांनी आदर्श जीवन जगावे, व्यभिचार करू नये, व्यसने करू नयेत, चोऱ्यामाऱ्या करू नयेत यासाठी त्यांनी राज्यात ठिकठिकाणी मंदिरे बांधून लोकांना परमेश्वराची गोडी लावली. अशा प्रकारे मंदिरे बांधण्याचे त्यांचे उद्देश अत्यंत चांगले आणि प्रजेच्या हिताचेच होते. त्यामुळे कुशल, अकुशल मजुरांना रोजगारही मिळत होता.

**१६. विद्वानांना दानधर्म व राजाश्रय :**

अहिल्यादेवींनी ब्राह्मणांना दानधर्म केला अशी त्यांच्यावर टीका केली जाते. परंतु ही टीका खरी नाही. त्याकाळात विद्वान लोक ब्राह्मण जातीत मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे अहिल्यादेवींनी जो दानधर्म केला तो ब्राह्मण म्हणून नव्हे तर विद्वान म्हणून केला. विद्वानांना दानधर्म करणे हे त्या महत्त्वाचे व पुण्याईचे कार्य समजत होत्या. धार्मिक कार्याची माहिती असणारे, ग्रंथ लिहिणारे व वाचणारे, कीर्तन व प्रवचन करणारे, संस्कृतसारख्या विविध भाषा जाणणारे व ज्यांची विद्या राज्याच्या उपयोगाची आहे अशा विद्वान लोकांना अहिल्यादेवींनी जमिनी, घरे, गावे इत्यादी दान करून वंशपरंपरेने ती त्यांच्याकडे राहतील अशी व्यवस्था केली.[४०] अनंत फंदी, मोरोपंत, शाहीर प्रभाकर इत्यादीं सारख्या नामवंत विद्वानांना त्यांनी मदत केली. त्यांच्या बुद्धिमत्तेचे कौतुक केले. ते ब्राह्मण होते म्हणून नाही तर ते विद्वान होते म्हणून त्यांना राजाश्रय दिला.

**१७. पशुपक्ष्यांची काळजी :**

अहिल्यादेवींनी अनाथ, अपंग, यात्रेकरू, गरीब लोक यांची जशी काळजी घेतली तशीच पशुपक्ष्यांची सुद्धा काळजी घेतली. त्यांनी काही शेते/कुरणे पशुपक्ष्यांसाठी राखीव ठेवली होती.[४१] त्या शेतातील धान्य केवळ पक्ष्यांसाठी राखून ठेवले जात असे. पक्ष्यांना, जनावरांना पिण्यासाठी पाण्याचे तलाव त्यांनी बांधले होते. अनाथ जनावरांना पाणी पाजण्यासाठी व चारा देण्यासाठी त्यांनी नोकर नेमले होते. अहिल्यादेवींनी अशा प्रकारे राज्यातील जनता उपाशी राहणार नाही याकडे जसे लक्ष दिले तसेच पशुपक्षी सुद्धा उपाशी व तहानलेले राहणार नाहीत याची काळजी घेतली.

**१८.अंतर्गत सुरक्षिततेकडे लक्ष :**

अहिल्यादेवींनी राज्यांतर्गत सुरक्षितता व सुव्यवस्थेला सुद्धा प्राधान्य दिले होते. चोर, दरोडेखोर यांच्यापासून राज्यातील लोकांना संरक्षण मिळण्यासाठी अहिल्यादेवींनी पोलीस व सैनिकांच्या नेमणुका केल्या होत्या. राज्यात बंडाळी माजून राज्यातील शांतता भंग पावणार नाही याची काळजी त्या सतत घेत असत. त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन काही बंडे मोडून काढली होती. बंड करू पाहणाऱ्या भिल्लांना पत्र

पाठवून त्या त्यांचे मन वळवत असत. त्यांच्या समस्या सोडवून बंडापासून त्यांना परावृत्त करत असत. त्यामुळे इतर राज्यापेक्षा अहिल्यादेवींच्या राज्यात पुरेशी शांतता व सुरक्षितता होती.

**१९.पंचायत राज्यव्यवस्थेचा पुरस्कार :**

अहिल्यादेवींनी आपल्या राज्याचे जिल्हा, तालुका असे भाग पाडून ग्रामपंचायती स्थापन केल्या.[४२] गावपातळीवरील कारभार व्यवस्थित चालावा यासाठी अहिल्यादेवींनी ग्रामपंचायत योजनेचा पुरस्कार केला होता. त्यांनी ग्रामपंचायतींची स्थापना करून गावातील कारभार गावातील लोकांच्याच हातात राहील याची काळजी घेतली होती.

**२०. सरदार, जहागीरदार यांच्या कामावर लक्ष ठेवणे :**

अहिल्यादेवींनी आपल्या राज्यातील सरदार, जहागीरदार यांना काही हक्क व अधिकार दिले होते. प्रत्येक सरदाराकडे पायदळ व घोडदळ होते. या सैन्याचा खर्च भागावा यासाठी अहिल्यादेवींनी प्रत्येक सरदाराला विशिष्ट रकमेचे महसूल क्षेत्र दिले होते. या सरदार व जहागीरदारांच्या कामावर लक्ष ठेवणे, त्यांच्याकडून लोकांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे, सरदारांच्या अडचणी सोडवणे इत्यादी कामे अहिल्यादेवी करत असत.[४३]

**२१. समाजहितासाठी कलावंतांचे प्रबोधन :**

लावण्या, तमाशा इत्यादी सारख्या कला प्रकारामुळे लोक बिघडतात, या गोष्टीवर वारेमाप पैसा लोक खर्च करतात, व्यसनाधिन होतात व त्यांचे संसाराकडे दुर्लक्ष होते. म्हणून लोकांनी तमाशा व लावण्या याऐवजी कीर्तने, भजने, भक्तिगीते ऐकावीत व म्हणावीत असे त्यांना वाटत असे. म्हणून त्यांनी अनंत फंदीसारख्या शाहिरांना तमाशा व लावण्या याऐवजी परमेश्वराची भजने रचण्याचा व लोकांसमोर सादर करण्याचा सल्ला दिला.[४४] त्यांचा हा सल्ला अनंत फंदीसारख्या अनेक कलावंतांनी मानला. यामुळे अनेक लोक भक्तिमार्गाला लागले, त्यांचे संसार चांगले झाले. व्यसनाधिनता कमी झाली.

**२२. घाट, धर्मशाळा, पाणपोया, अन्नछत्रे यांची उभारणी :**

अहिल्यादेवींनी हयातभर धार्मिक स्थळांच्या विकासाकडे लक्ष दिले. धार्मिक स्थळांना भेटी देणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये, हा त्यामागचा उद्देश होता. नदीच्या पुरामुळे नुकसान होऊ नये आणि घाट नसल्याने भाविक पाण्यातून वाहून जाऊ नयेत, अस्वच्छतेमुळे रोगराई पसरू नये यासाठी त्यांनी गंगा, यमुना, नर्मदा, गोदावरी, क्षिप्रा इत्यादी ठिकाणी सुंदर घाट बांधले.[४५] हे घाट आजही पाहावयास मिळतात. घाटांच्या उभारणीबरोबर अहिल्यादेवींनी राज्यात व राज्याच्या बाहेर अनेक ठिकाणी धर्मशाळांची स्थापना केली. निराधार, वृद्ध, प्रवासी यांना धर्मशाळेत राहण्याची व जेवणाची मोफत सोय करण्यात आली होती. अहिल्यादेवींच्या नावाचा दबदबा व लौकिक देशभर असल्याने त्यांच्या धर्मशाळा सुरक्षित होत्या. अहिल्यादेवींनी आपल्या राज्यात ठिकठिकाणी पाणपोया उघडून गरीब, निराधार, प्रवासी, यात्रेकरू यांची मोठी सोय केली होती. अशा पाणपोयांची त्या काळात खूपच गरज होती. अहिल्यादेवींनी राज्यात व इतरत्र अनेक ठिकाणी अन्नछत्रे सुद्धा उघडली होती. या अन्नछत्रात वयोवृद्ध, निराधार, अपंग, अंध आणि गरीब लोकांना मोफत भोजन मिळत असे. बद्रिकेदार, रामेश्वर, जगन्नाथपुरी, द्वारका, अमरकंटक, पैठण, महेश्वर, वृंदावन, सलपेश्वर, हंडिया, उज्जैन, पुष्कर, चिंचवड, चिखलदरा इत्यादी अनेक ठिकाणी त्यांनी अन्नछत्रे उघडली होती.

**२३. राज्याचे हिशेब/जमाखर्च तपासणे :**

सासरे सुभेदार मल्हारराव होळकर हयात होते

तेव्हापासून अहिल्यादेवी या राज्याचे हिशेब/जमाखर्च पाहत असत. त्यांना जमाखर्चाचे चांगले ज्ञान होते. लग्नानंतर मल्हारराव होळकर यांनी सून अहिल्यादेवींना राज्यकारभाराचे आवश्यक शिक्षण विशेष शिक्षकामार्फत दिले होते.[४६] त्या स्वतः सरकारी हिशेबाच्या वह्या तपासत असत.

**२४. आजूबाजूच्या संस्थानांना मदत व सल्ला देणे:**

अहिल्यादेवी यांचे जसे इंदूर संस्थान/राज्य होते तसे त्यांच्या काळात त्यांच्या आजूबाजूला काही लहान-मोठी संस्थाने सुद्धा होती. सीतामऊ, देवास, बडवानी, झाबुआ ही संस्थाने व इतरही काही राज्ये होती. त्यापैकी लहान संस्थानांना त्या अधूनमधून आर्थिक मदत देत असत.[४७] एवढेच नव्हे; तर आपल्या पदरी असलेल्या हुशार अधिकाऱ्यांकडून त्यांच्या संस्थानांची त्या उत्तम व्यवस्था लावून देत असत. तसेच ही लहान-मोठी संस्थाने आपापसातील वाद मिटविण्यासाठी नेहमी अहिल्यादेवींच्याकडे येत. अहिल्यादेवी त्यांचे वाद मिटवत असत व त्यांना चांगला सल्ला देत असत. संस्थानिकांच्यामधील आपापसातील भांडणाचा त्यांनी कधीही लाभ उठविला नाही.

**२६. वकील, गुमास्ते आणि गुप्तहेरांच्या नेमणुका करणे :**

राज्यात आणि राज्याबाहेरच्या संस्थानांमध्ये/राज्यामध्ये वकिलांच्या नेमणुका करण्याचे काम सुद्धा अहिल्यादेवी करत असत.[४८] त्यांनी आपल्या इंदूरच्या दरबारात आणि आजूबाजूच्या राज्यात हुशार वकील नेमलेले होते. दरबारातील वकिलांच्या सल्ल्याने त्या न्यायनिवाडा करत. अहिल्यादेवींना काही लहान संस्थानांच्या राजे, महाराजांकडून खंडणी मिळत असे. त्या बदल्यात अहिल्यादेवींना त्यांच्या संस्थानाचे रक्षण करावे लागे. त्यावर खर्चही करावा लागे. त्यासाठी खंडणी गोळा करावी लागे. अशी खंडणी गोळा करणाऱ्या अधिकाऱ्यांना गुमास्ते म्हणत. हे गुमास्ते लहान-लहान संस्थानांच्या राजे, महाराजे यांच्या कचेरीत नेमले जात. त्यांच्या नेमणुका करण्याचे काम सुद्धा अहिल्यादेवी करीत.[४९] अहिल्यादेवी यांची गुप्तचर यंत्रणा अत्यंत प्रभावी आणि कार्यक्षम होती. त्या स्वतः गुप्तहेरांच्या नेमणुका करत असत. त्यांचे गुप्तहेर संपूर्ण देशभर पसरलेले होते. संपूर्ण देशभर पसरलेले त्यांचे गुप्तहेर वेगवेगळे वेष धारण करून अचूक माहिती काढत आणि अहिल्यादेवींच्यापर्यंत ती पोहचवत. अशा गुप्तहेरांच्या नेमणुका करण्याचे काम सुद्धा अहिल्यादेवी करत असत.

**समारोप :**

पतीच्या मृत्यूनंतर अहिल्यादेवींना त्यांचे सासरे मल्हारराव होळकर यांनी सती जाऊ दिले नाही. म्हणून 'मला मिळालेले आयुष्य हे माझ्यासाठी किंवा माझ्या सुखासमाधानासाठी नसून प्रजेच्या कल्याणासाठी आहे', असे त्या म्हणत असत. दिनांक १३/८/१७९५ रोजी इंदूर राज्याची राजधानी महेश्वर येथे वार्धक्याने, सततच्या दगदगीने, तापाच्या आजाराने त्यांचा मृत्यू झाला. मृत्यूसमयी त्या ७० वर्षांच्या होत्या. अंथरुणावर आजारी अवस्थेत पडलेल्या असतानाही त्या अधिकाऱ्यांना सल्ला व मार्गदर्शन देत असत. वयाच्या २९ व्या वर्षी त्या विधवा झाल्या. विधवा झाल्यानंतर मरेपर्यंत त्या अगदी साधे जीवन जगल्या. त्या पूर्ण शाकाहारी होत्या. त्या सात्विक आणि धार्मिक होत्या. त्यांचा परमेश्वरावर दृढ विश्वास होता. त्या अभ्यासू व कडक प्रशासक होत्या. सर्व अधिकारी, नोकरवर्ग आणि लष्करावर त्यांचे पूर्ण नियंत्रण होते. त्यांना आपल्या राज्याची पूर्ण माहिती होती. त्या घोड्यावरून आणि पालखीतून राज्यभर फिरत असत आणि लोकांच्या अडचणी जाणून घेत

असत. त्या एका मोठ्या राज्याच्या प्रमुख प्रशासक होत्या, महाराणी होत्या, तरी त्यांनी कधीही मोठेपणा मिरवला नाही. त्यांना सामान्य माणूसही सहज भेटत असे. वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी त्यांचा विवाह झाला होता. विवाहानंतर अखेरपर्यंत म्हणजे सुमारे ६२ वर्षे त्या सासरी इंदूर राज्यात राहिल्या आणि सुमारे ३० वर्षे त्यांनी इंदूर राज्याचा कारभार अत्यंत यशस्वीपणे केला. त्यांचे सासरे सुभेदार मल्हारराव होळकर यांचे राज्य त्यांनी आदर्श राज्य कारभार करून टिकवले. राज्याला देशभरात नावलौकिक मिळवून दिला. अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी प्रजेची काळजी घेतली. थोर प्रजावत्सल राज्यकर्त्या म्हणून त्यांचे नाव त्या काळात आदराने घेतले जात होते. तसे ते आजही घेतले जाते. आणि पुढेही घेतले जाईल. यातच त्यांचे मोठेपण सामावले आहे.

**संदर्भ सूचीः**


१. खेडेकर पुरुषोत्तम, 'लोकमाता अहिल्यादेवी होळकर', जिजाई प्रकाशन, पुणे, २०१२, पृ.क्र.१९.
२. तत्रैव, पृ.१९.
३. भट विठ्ठलराय, 'राजयोगिनी अहिल्याबाई होळकर', मनोविकास प्रकाशन, पुणे, २०१३, पृ.७५.
४. शर्मा हिरालाल, 'अहिल्याबाई', नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, जून १९६९, पृ.८१.
५. भट विठ्ठलराय, 'राजयोगिनी अहिल्याबाई होळकर', मनोविकास प्रकाशन, पुणे, २०१३, पृ.७५.
६. मोडक प्रमिला, 'अहिल्यादेवी होळकर', वसुंधरा प्रकाशन, अहमदनगर, जानेवारी २००५, पृ.८०,८१.
७. शर्मा हिरालाल, 'अहिल्याबाई', नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, जून १९६९, पृ.८१.
८. तत्रैव, पृ.८१.
९. तत्रैव, पृ.८२.
१०. खेडेकर पुरुषोत्तम, 'लोकमाता अहिल्यादेवी होळकर', जिजाई प्रकाशन, पुणे, २०१२, पृ.क्र.१९.
११. भट विठ्ठलराय, 'राजयोगिनी अहिल्याबाई होळकर', मनोविकास प्रकाशन, पुणे, २०१३, पृ.७५.
१२. तत्रैव, पृ.३७.
१३. शर्मा हिरालाल, 'अहिल्याबाई', नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, जून १९६९, पृ.६१.
१४. खेडेकर पुरुषोत्तम, 'लोकमाता अहिल्यादेवी होळकर', जिजाई प्रकाशन, पुणे, २०१२, पृ.क्र.३०.
१५. तत्रैव, पृ.२७.
१६. शर्मा हिरालाल, 'अहिल्याबाई', नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, जून १९६९, पृ.८५.
१७. लेले सुमती, 'होळकर अहिल्याराणी', लोकवाङ्मय गृह, जून २००४, पृ.२१.
१८. तत्रैव, पृ.२०
१९. शर्मा हिरालाल, 'अहिल्याबाई', नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, जून १९६९, पृ.९५
२०. खेडेकर पुरुषोत्तम, 'लोकमाता अहिल्यादेवी होळकर', जिजाई प्रकाशन, पुणे, २०१२, पृ.क्र.१९.
२१. तत्रैव, पृ.३०.
२२. शर्मा हिरालाल, 'अहिल्याबाई', नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, जून १९६९, पृ.८२.
२३. तत्रैव, पृ.८३.
२४. तत्रैव, पृ.८३.
२५. मोडक प्रमिला, 'अहिल्यादेवी होळकर', वसुंधरा प्रकाशन, अहमदनगर, जानेवारी २००५, पृ.७९.
२६. तत्रैव, पृ.५२.
२७. शर्मा हिरालाल, 'अहिल्याबाई', नॅशनल बुक

ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, जून १९६९, पृ.६७.

२८. खेडेकर पुरुषोत्तम, 'लोकमाता अहिल्यादेवी होळकर', जिजाई प्रकाशन, पुणे, २०१२, पृ.क्र.१७.

२९. तत्रैव, पृ.२२.

३०. तत्रैव, पृ.७१.

३१. तत्रैव, पृ.१७.

३२. तत्रैव, पृ.१७.

३३. भट विठ्ठलराय, 'राजयोगिनी अहिल्याबाई होळकर', मनोविकास प्रकाशन, पुणे, २०१३, पृ.७१.

३४. खेडेकर पुरुषोत्तम, 'लोकमाता अहिल्यादेवी होळकर', जिजाई प्रकाशन, पुणे, २०१२, पृ.क्र.२९.

३५. तत्रैव, पृ.२६.

३६. तत्रैव, पृ.२६.

३७. मोडक प्रमिला, 'अहिल्यादेवी होळकर', वसुंधरा प्रकाशन, अहमदनगर, जानेवारी २००५, पृ.६६.

३८. शर्मा हिरालाल, 'अहिल्याबाई', नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, जून १९६९, पृ.७९.

३९. भट विठ्ठलराय, 'राजयोगिनी अहिल्याबाई होळकर',मनोविकास प्रकाशन, पुणे, २०१३, पृ.७८.

४०. शर्मा हिरालाल, 'अहिल्याबाई', नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, जून १९६९, पृ.७९, पृ.९२.

४१. तत्रैव, पृ.९४.

४२. नजन ओमप्रकाश वसंत, 'अहिल्याबाई होळकर', साकेत प्रकाशन, औरंगाबाद,२०१७, पृ.४४.

४३. शर्मा हिरालाल, 'अहिल्याबाई', नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, जून १९६९, पृ.८५.

४४. भट विठ्ठलराय, 'राजयोगिनी अहिल्याबाई होळकर', मनोविकास प्रकाशन, पुणे, २०१३, पृ.८२.

४५. खेडेकर पुरुषोत्तम, 'लोकमाता अहिल्यादेवी होळकर', जिजाई प्रकाशन, पुणे, २०१२, पृ.क्र.२५.

४६. तत्रैव, पृ.९.

४७. भट विठ्ठलराय, 'राजयोगिनी अहिल्याबाई होळकर', मनोविकास प्रकाशन, पुणे, २०१३, पृ.६६.

४८. शर्मा हिरालाल, 'अहिल्याबाई', नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, जून १९६९, पृ.९०.

४९. भट विठ्ठलराय, 'राजयोगिनी अहिल्याबाई होळकर', मनोविकास प्रकाशन, पुणे, २०१३, पृ.६६.

**संदर्भ ग्रंथ :**


१. खेडेकर पुरुषोत्तम, 'लोकमाता अहिल्यादेवी होळकर', जिजाई प्रकाशन, पुणे, २०१२, पृ.क्र.१९.

२. भट विठ्ठलराय, 'राजयोगिनी अहिल्याबाई होळकर', मनोविकास प्रकाशन, पुणे, २०१३, पृ.७५.

३. शर्मा हिरालाल, 'अहिल्याबाई', नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, जून १९६९, पृ.८१.

४. मोडक प्रमिला, 'अहिल्यादेवी होळकर', वसुंधरा प्रकाशन, अहमदनगर, जानेवारी २००५, पृ.८०, ८१.

५. लेले सुमती, 'होळकर अहिल्याराणी', लोकवाङ्मय गृह, जून २००४, पृ.२१.

६. नजन ओमप्रकाश वसंत, 'अहिल्याबाई होळकर', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१७, पृ.४४.


◆

# सामाजिक समावेशक शिक्षण आणि विकास कृतिशील धोरणकर्ता : छ. शाहू महाराज

**पी. एस. कांबळे** †

**प्रास्ताविक :**

भारत देशाला अनेक चांगल्या परंपरा आहेत. त्यातील एक महत्त्वाची बाब म्हणजे आपल्या देशात स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही काही काळ अनेक राजे आणि त्यांची राज्ये होऊन गेली. त्या काळी राजे आणि त्यांची राज्ये एक प्रकारची स्वतंत्र शासन यंत्रणाच होती. राजेच त्या राज्याचे सरकार म्हणून धोरण निश्‍चित करत होते आणि त्याची कार्यवाही करून अपेक्षित विकासास प्रयत्न करून विकास साध्य करीत होती. विकासाच्या दृष्टिकोनातून यशस्वी राजे आणि राज्ये कमीच दिसून येतात. यात छ. शिवाजी, बडोद्याचे गायकवाड आणि कोल्हापूरचे छ. शाहू महाराज यांचा अग्रक्रमाने उल्लेख करता येईल. आपल्या अधिपत्याखालील लोकांचा आणि अर्थव्यवस्थेचा जलद व सर्वांगीण विकास साध्य करण्यात यशस्वी झालेल्या राजांमध्ये छ. शाहू महाराजांचा अग्रक्रमाने उल्लेख करावा लागतो. कारण त्यांनी त्यांच्या कोल्हापूर संस्थांनाचा खऱ्या अर्थाने जलद आणि सर्वांगीण विकास केला होता. अर्थात कोणत्याही अर्थव्यवस्थेचा आपसूक आणि आपोआप विकास होत नाही, हे वास्तव सत्य आपणास नाकारता येणार नाही. त्यासाठी खास, प्रामाणिक, योजनाबद्ध आणि योग्य प्रयत्नांची गरज असते. यासाठी योग्य धोरण आखण्याची आणि त्याबरोबरच ते प्रामाणिकपणे राबविण्याची ही गरज असते. हे आपणास छ. शाहू महाराजांच्या बाबतीत बघावयास मिळते आणि तंतोतंत अनुभवास येते. कारण त्यांचे कोल्हापूर संस्थान त्या वेळचे एक प्रगत राज्य होते. छ. शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने राजे कमी आणि धोरणकर्ते अधिक होते. ते शिक्षित तर होतेच, मात्र त्याबरोबरच त्यांचे शिक्षण परदेशातही झाले होते. त्यामुळेच त्यांच्या राज्याचा विकास आणि शैक्षणिक प्रगती झाली. छ. शाहू महाराज एक यशस्वी धोरणकर्ते आणि सामाजिक समावेशक, व्यावहारिक आणि कृतिशील शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांच्या सामाजिक समावेशक कृतिशील शिक्षणतज्ज्ञ स्थितीचे विवेचन आणि विश्लेषण करणे आवश्यक आणि महत्त्वाचे ठरते. याबरोबरच छ. शाहू महाराजांच्या सामाजिक समावेशक विकास धोरणाचे विवेचन आणि विश्लेषण करणे गरजेचे आहे. या वरील सर्व पार्श्वभूमीवर, प्रस्तुत निबंधात छ. शाहू

† प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
आजीव सभासद क्र. ४८७, भ्रमणध्वनी : ९४२३०३३१७९, ई-मेल : pskamble2006@gmail.com

महाराज यांच्या सामाजिक समावेशक शिक्षण आणि विकास धोरणाचा सखोल आणि व्यापक विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. याबरोबरच त्याची भारतात आणि महाराष्ट्रात वर्तमानकालीन उपयुक्तता काय आहे ते ही स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**सामाजिक समावेशक शिक्षणविषयक विचार, धोरण आणि कृती :**

छ. शाहू महाराजांनी कोल्हापूरचा राजा म्हणून अधिभार स्वीकारण्यापूर्वी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक आणि उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध होती. मात्र ती अपुरी आणि विशेष म्हणजे सामाजिक विषम आणि वंचित होती. लोकसंख्या ९ लाखांपेक्षा अधिक होती. प्राथमिक शाळांची संख्या २२४ आणि विद्यार्थी जवळपास १५००० होते. १८८१ मध्ये साक्षरता सामाजिक गट निहाय ७९.१%, ब्राह्मण, ८.६% मराठा, १.५% कुणबी, ७.५% मुस्लीम, १०.६०% जैन आणि लिंगायत अशी होती. याच वर्षात राजाराम हायस्कूलमध्ये एकूण ४४१ विद्यार्थ्यांपैकी ३६८ ब्राह्मण आणि राजाराम महाविद्यालयात एकूण ६१ पैकी ५५ ब्राह्मण विद्यार्थी होते. २ एप्रिल, १८९४ रोजी त्यांनी कोल्हापूर संस्थानाचा राजा म्हणून अधिभार स्वीकारला. त्यावेळेला संस्थानाचा शिक्षणावरील खर्च फक्त एकूण उत्पन्नाच्या ३.७५% होता की जो अत्यल्प होता. त्यामुळे शिक्षणाच्या जलद आणि सर्वांगीण विकासाठी छ. शाहू महाराजांनी असे सांगितले की शिक्षणावरील खर्च राज्याच्या एकूण उत्पन्नाच्या किमान ६% पाहिजे, आणि तसा आदेश ही त्यांनी २९ मार्च, १९१८ ला काढला. छ. शाहूराजा शिक्षणाला अधिक महत्त्व देत होते. राज्यात शैक्षणिक विकासासाठी शिक्षण अधिकारी असे अतिउच्च पद निर्माण केले आणि प्रथम शिक्षण अधिकारी म्हणून व्ही. के. कीर्तीकर यांची आणि नंतर अण्णासाहेब लठ्ठे यांची नेमणूक केली. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे छ.शाहू महाराजांनी २० मे १९११ रोजी असा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला की, एकूण विद्यार्थ्यांपैकी १५% विद्यार्थ्यांची शाळा फी माफ केली आणि त्यात ५०% मागास समाजातील असावेत असे सांगितले. २० जानेवारी, १९१३ रोजी त्यांनी एक आदेश काढला की, खेड्यातील शाळेत शेतीविषयक शिक्षण सक्तीचे असावे. त्यांनी शिक्षकांना ६ महिन्यांचे प्रशिक्षण सक्तीचे केले. शिक्षणाच्या आणि प्रामुख्याने प्राथमिक शिक्षणाच्या जलद प्रगतीसाठी आणि सामाजिक समावेशक विकासासाठी २५ जुलै, १९१७ रोजी मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण करण्याचा निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी सुरू केली, त्याला २०१७ मध्ये १०० वर्षे पूर्ण झाली. जे विद्यार्थी गैरहजर राहतील त्यांना दर महिन्याला १ रुपया दंडाची तरतूद केली. मात्र शेती कामासाठी मदत करणाऱ्या विद्यार्थ्यांना १५ दिवसांची सवलत दिली जाईल असे सांगण्यात आले. मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा प्रयोग छ. शाहू महाराजांनी आपल्या चिखली पेठ्यात प्रथम राबविला. त्याचा अनुकूल परिणाम म्हणून प्राथमिक शाळांची संख्या २७ आणि १२९६ विद्यार्थी वरून ती ४२० शाळा आणि २२००० विद्यार्थीपर्यंत वेगाने वाढली. मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी महाराजांनी घरपट्टी १ रुपयांनी वाढविली, २०,००० रुपये देवालय निधीतून दिले, ८०,००० रुपये आपल्या तिजोरीतून दिले. त्यांनी मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षण विकासासाठी स्वतंत्र खाते निर्माण करून प्रा.आर. एन. आपटे यांच्याकडे संचालकपदाची जबाबदारी सोपविली. छ. शाहू महाराजांनी शिक्षणातील गुणवत्ता राखण्यासाठी १५ मार्च, १९१८ मध्ये सार्वजनिक सेवा परीक्षा उत्तीर्ण होण्याची सक्ती केली. १९०१ ते १९२१ या २० वर्षात एकूण २३

विद्यार्थी वसतिगृहे जैन, लिंगायत, ब्राह्मण, वैश्य, मागास, मुस्लीम अशा विभिन्न जाती-धर्माच्या विद्यार्थ्यांसाठी निर्माण केली. मोफत राहण्याची आणि जेवणाची सोय त्यांनी विद्यार्थ्यांसाठी करण्यासाठी प्रिन्स शिवाजी मराठा वसतीगृहाची स्थापना केली. इतर वसतिगृहांत आर्थिकदृष्ट्या न परवडणाऱ्या विद्यार्थ्यांची ही सोय प्रिन्स शिवाजी मराठा वसतीगृहात केली. शिक्षण विकासासाठी त्यांनी देवालय उत्पन्नातून निधी द्यावा आणि इमारत ही उपलब्ध करून द्यावी असा नियम ९ जुलै, १९१७ मध्ये केला. छ. शाहू महाराजांनी मुलींच्या शिक्षणाचाही विकास करण्यासाठी अनेक प्रयत्न केले. यात गारगोटी, भुदरगड, गडहिंग्लज आणि डोंगराळ भागात मुलींच्या शाळा काढण्यास परवानगी दिली. १ सप्टेंबर, १८९५ रोजी राधाबाई केळवकर यांची स्त्री-शिक्षण अधीक्षकपदी नेमणूक केली. मुली आणि स्त्रियांना शिकवणाऱ्या शिक्षकांना ५१२ रुपयांचे बक्षीस २४ मे, १९१७ रोजी मंजूर केले. त्यांनी हिंगणे स्त्री आश्रमास ५०० रुपयाची देणगी दिली. त्यांनी कृष्णाबाई केळवकर यांना इंग्लंडमध्ये आरोग्य शिक्षण घेण्यासाठी आर्थिक मदत देण्याबरोबरच शिष्यवृत्ती मिळवून देण्यासाठी ही मदत केली. एवढेच नव्हे तर त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांची सरकारी दवाखान्यात कोल्हापूर येथे डॉक्टर म्हणून नेमणूक केली. त्यांनी ३ सप्टेंबर, १९१८ रोजी विद्यापीठ हायस्कूलची स्थापना केली. १८५१ मध्ये स्थापन केलेल्या इंग्रजी हायस्कूलचे रूपांतर १८८० मध्ये शाहू महाराजांनी राजाराम महाविद्यालयात केले. त्यांनी महात्मा जोतिराव फुल्यांप्रमाणे प्राथमिक शिक्षणाला अधिक महत्त्व दिले असले तरी उच्च शिक्षणाच्या विकासालाही प्रयत्न केला होता ते विसरता येणार नाही. आर्थिक ओढाताणीमुळे राजाराम महाविद्यालय बंद करण्याचा घेतलेला निर्णय नंतर त्यांनी बदलला. शाहू महाराजांनी आर्थिक मदत देऊन आणि खर्च करून ही शिक्षण विकासास हातभार लावला आहे. ते ५००० रुपयाची तरतूद अंदाज पत्रकात करत असत. जिंगर मार्तंड, वासुदेव भिडे, नारायण चव्हाण, रामचंद्र शेळके, सीताराम तावडे, रमाकांत कांबळे, माधवराव बागल यांसारख्या अनेक लोकांना शिष्यवृत्ती, आर्थिक मदत, कर्जे या स्वरूपात त्यांनी खूप मोठ्या प्रमाणावर मदत केली आहे. वरील सर्व माहिती आणि विश्लेषण आपणास हे स्पष्ट करते आणि सिद्ध करते की, छ. शाहू महाराज हे सामाजिक समावेशक कृतिशील शिक्षणतज्ज्ञ होते.

**छ. शाहू महाराजांचे सामाजिक समावेशक विकासविषयक विचार, धोरण आणि कृती :**

छ. शाहू महाराज स्वतःला शेतकरी समजत असल्याने शेती विकासाशिवाय शेतकऱ्यांचा आणि ग्रामीण भागाचा विकास नाही असे त्यांचे मत होते. त्यामुळे शाहू महाराजांनी शेती विकासासाठी खूप मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले आहेत. त्यांनी धान्य व नगदी पिकांच्या आणि चहा, कॉफी, कापूस यांच्या सुधारित जातीची लागवड करण्याचा हेतुपूर्वक प्रयत्न आपल्या संस्थानात केला. त्यासाठी त्यांनी वनाधिकाऱ्याला म्हैसूरला सर्वेक्षणासाठी पाठविले. चहाची सुधारित जात ११९१ रुपये खर्च करून धर्मशाळा (हिमाचल प्रदेश) येथून आणून घेतल्या आणि त्याची लागवड पन्हाळा, भुदरगड पेट्यात करून त्यास पन्हाळा चहा क्रमांक ४ असे नाव दिले. तसेच कॉफीची लागवडसुद्धा पन्हाळा, भुदरगड पेट्यात १५ एकर जमिनीवर केली. याबरोबरच वेलची या नगदी पिकाची ही लागवड त्यांनी पन्हाळा आणि भुदरगड पेट्यात करून घेतली आणि त्याचे उत्पादन १९०२-०३ मध्ये १० पौंड किमतीचे झाले होते, ते १९०५-०६ मध्ये २३ पौंडपर्यंत वाढले. तसेच शाहू

महाराजांनी वेलची, चहा आणि कॉफी यांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी या पिकांच्या उत्पादनाचे नमुने त्यांनी प्रदर्शनासाठी बॉम्बे शहरात पाठवले होते. त्यांना हे माहीत होते की नुसत्या पावसावर आधारित शेती विकसित होऊ शकत नाही. तिला जलसिंचन सुविधा निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी शाहू महाराजांनी राधानगरी धरण बांधले आणि पाण्याचा वापर शेतीला, पिण्यास, उद्योगांना पाणी देण्यास आणि विशेष म्हणजे जलऊर्जाही निर्माण करण्यासाठी केला. छ. शाहू महाराज शिक्षण आणि इतर कारणानिमित्ताने जगातल्या अनेक देशांत फिरत होते. त्यामुळे त्यांचे असे मत झाले होते की, जलद आणि सर्वांगीण विकासासाठी औद्योगिक विकास साध्य करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आपल्या संस्थानात औद्योगिक विकास गतिमान करण्यासाठी सर्व प्रथम त्यांनी सर्वेक्षण करून घेतले. त्यांनी प्रामुख्याने तेल, मधमाशा पालन, लाकूड ऊर्ध्वपातन, सुतीकापड उद्योग विकसित करण्याचा प्रयत्न केला. त्याबरोबरच त्यांनी शिरोळजवळ आणि कोल्हापूर येथे दोन सुती कापड गिरण्या स्थापन केल्या. याबरोबरच प्रामुख्याने शिवाजी उद्यमनगर येथे शेतीसाठी लागणारी अवजारे, पंप, ट्रॅक्टर आणि इतर साधने निर्माण करणारे उद्योग आणि फौंड्री उद्योग विकसित करण्याचाही प्रयत्न त्यांनी केला आहे. छ. शाहू महाराज व्यावहारिक धोरणकर्ते असल्याने त्यांना हे माहीत होते की, निर्माण केलेल्या शेती आणि उद्योग उत्पादनाला बाजारपेठ आणि इतर मूलभूत सुविधाही आवश्यक आहेत. त्यासाठी महाराजांनी शाहूपुरी, मार्केट यार्ड, जयसिंगपूर आणि इतर ठिकाणी बाजारपेठा निर्माण केल्या. विशेष म्हणजे वजन मापे आणि वजन काटे प्रमाणित केले. व्यापाऱ्यांना कर्जे उपलब्ध करून दिली. याबरोबरच कोल्हापूर संस्थानातील रस्ते आणि वाहतूक व्यवस्था सुधारण्याचा प्रयत्न केला. त्यांनी कोल्हापूर-रायबाग रेल्वेमार्ग प्रस्तावित केला होता, मात्र काही अडचणींमुळे तो प्रत्यक्षात साकार झाला नाही. छ. शाहू महाराज फक्त आर्थिक विकासाकडे लक्ष देणार नव्हते, तर ते सामाजिक विकासाकडेही तेवढेच लक्ष देणारे होते. म्हणजेच शाहू महाराज हे सामाजिक समावेशक विकासनीतीचे होते आणि ते साध्य करण्यासाठी त्यांनी आपल्या हयातीत अविरत प्रयत्न केले. त्यांनी शिक्षणाला खूपच महत्त्व दिले आणि प्राथमिक आणि उच्च शिक्षण विकसित करण्याचा ही त्यांनी खूपच प्रयत्न केला. त्यांनी असे सांगितले की, शिक्षणावर एकूण उत्पन्नाच्या किमान ६% तरी खर्च करायला पाहिजे तसा आदेशही त्यांनी २९ मार्च, १९१८ ला काढला.

छ. शाहू महाराज आरक्षण धोरणाचे भारतातील जनक आहेत. त्यांच्या हे लक्षात आले की, सर्व समाजातील लोक सारख्या ताकदीचे नाहीत. काही लोक अत्यंत प्रबळ आहेत तर काही अत्यंत दुर्बल आहेत. ते अत्यंत हुशार आणि परदेशात शिकलेले असल्याने त्यांचे ज्ञान आणि निरीक्षण अत्यंत सखोल, व्यापक आणि व्यावहारिक होते. त्यांनी घोड्यांच्या तबेल्यात प्रबळ घोडी दुर्बल घोड्यांना खाद्य खाऊ देत नव्हते. त्यातून त्यांच्या हे लक्षात आले की, दुर्बलांच्या विकासासाठी आपण स्वतंत्र आणि विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे तरच त्यांची प्रगती होऊ शकते. त्यातूनच त्यांना आरक्षण धोरण सुचले, त्यालाच विधायक भेद (Positive Discrimination) असे म्हणतात. त्यांनी सर्वात प्रथम २६ जुलै १९०२ मध्ये आदेश काढून सरकारी नोकऱ्यांत ५०% आरक्षण दलित, आदिवासी अशा मागास समाजातील लोकांना दिले. त्यांनी कुलकर्णी वतने रद्द केली. तसेच पुरोहित प्राबल्यही संपवून टाकले. विशेष म्हणजे आरोग्य,

पिण्याचे पाणी, वसतीगृहे, सार्वजनिक बांधकामे, तलाव आणि इतर आवश्यक मूलभूत आणि सामाजिक सेवा आपल्या नागरिकांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी धर्म, जात, स्त्री-पुरुष भेद नष्ट करण्याचा प्रयत्न करून सामाजिक समावेशक समाज निर्माण करण्याचा अत्यंत महत्त्वाचा आणि गौरवपूर्ण प्रयत्न भारतात सर्वप्रथम केला. त्यातून त्यांनी सामाजिक भेद आणि वर्जन कमी करून सामाजिक स्थैर्य आणि सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न अत्यंत हेतुपुरस्सर केला. त्याचाच भाग म्हणून गंगाराम कांबळे याला शाहू महाराजांनी हॉटेल काढून दिले. समाजातील लोक सहजासहजी या हॉटेलमध्ये जाणार नाहीत आणि त्याचा व्यवसाय होणार नाही म्हणून ते स्वतः त्यात जात आणि त्या हॉटेलमधील चहा आणि इतर पदार्थ खात असत. हा विचार आणि कृती संपूर्ण देशात आणि समाजात पसरावा म्हणून आणि लोकांचा सनातन आणि बुरसटलेला विचार नष्ट व्हावा यासाठी अनेक निर्णय आणि धोरणेही आखून राबविण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. याचाच भाग म्हणून छ. शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना 'तुम्हीच या देशातील दलितांचे पुढारी आहात' असे जाहीर केले. याच्यापुढे जाऊन 'तुम्ही संपूर्ण देशाचे पुढारी व्हाल', असेही सांगितले आणि ते राज्यघटना आणि इतर अनेक क्षेत्रांत खरेही ठरले आहे. त्यामुळेच त्यांनी अस्पृश्यांची पहिली परिषद २० मे, १८१८ मध्ये कोल्हापूर जवळील माणगाव येथे भरविली आणि असे जाहीर केले की, 'तुम्हाला तुमचा पुढारी मिळाला असून तोच तुमचा उद्धार करेल.' त्यानंतर सामाजिक, मागास लोकांचे प्रश्न जागतिक आणि राष्ट्रीय पातळीवर पोहचविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'मूकनायक' हे पत्रक चालविण्यासाठी छ. शाहू महाराजांनी आर्थिक मदत केली. एवढेच नव्हे, तरनागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नियोजित केलेल्या अस्पृश्य परिषदेसाठी त्यांच्या आग्रहापोटी ते आपली मुलगी आजारी असतानाही हजर राहिले. असा वागणारा राजा आणि धोरणकर्ता अपवादानेच या जगाच्या पाठीवर आढळतो. वरील सर्व विश्लेषण हे आवश्यकतेपेक्षा पुरेसे असून ते सिद्ध करते की, छ. शाहू महाराज सर्वश्रेष्ठ तर होतेच आणि विशेष म्हणजे ते कृतिशील सामाजिक समावेशक विकास धोरणकर्ते होते.

**सामाजिक समावेशक शिक्षणविषयक विचार आणि धोरणाची वर्तमानकालीन उपयुक्तता :**

छ. शाहू महाराज यांचे शिक्षणविषयक विचार आणि कृती त्यांच्या काळात जेवढी महत्त्वाची होती त्यापेक्षा ही अधिक महत्त्वाची आज आहे. शाहू महाराज शिक्षणाकडे सामाजिक सेवा म्हणून बघत होते तर आज सरकार शिक्षण ही विक्री करण्याची वस्तू किंवा विपणनीय आहे, असे पाहत आहे. याचबरोबरच फार मोठ्या प्रमाणावर सर्वच प्रकारच्या शिक्षणाचे खाजगीकरण करून त्यात ही अभियांत्रिकी आणि आरोग्य शिक्षणावर अधिक भर देऊन शिक्षण सामाजिक वंचितता वाढविली जात आहे. छ. शाहू महाराजांनी १०० वर्षांपूर्वी शिक्षणावरील खर्च एकूण उत्पन्नाच्या किमान ६% तरी करावा असे सुचवले होते, मात्र ते आपणास आजही शक्य झालेले नाही. आपल्या देशातील केंद्र आणि राज्य सरकारांचा मिळून एकत्रित शिक्षणावरील खर्च २०१८-१९ मध्ये स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या फक्त ३% होता. आपण १०० वर्षांनी मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले, मात्र ते अपुरेच! कारण त्यात आपण ६ ते १४ वर्षे वयाचाच विचार केला. याच्यापुढे जाऊन जिल्हा परिषद आणि महानगर आणि नगरपालिका शाळा बंद करून कॉर्पोरेट आणि कंपनी शाळांना परवानगी

देत आहोत. शिक्षक भरती बंद करून कंत्राटी आणि तासिका तत्त्वावर घेऊन त्यांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक, सामाजिक, आणि नैतिक खच्चीकरण करत आहोत. आपली उच्च शिक्षणातील प्रगती फारशी समाधानकारक नाही. उच्च शिक्षणातील पटसंख्या आपल्या देशात २०१८-१९ मध्ये फक्त २६% होती. ती प्रगत आणि विकसित देशात ७५% पेक्षा अधिक आहे. त्यात ही पदवीपर्यंतच आपला सहभाग अधिक म्हणजे ७२% असून पदव्युत्तर फक्त १२% आणि संशोधनातील सहभाग अत्यल्प म्हणजे एक टक्क्यापेक्षा ही कमी असून स्त्री-पुरुष, ग्रामीण-शहरी आणि एस.सी., एस.टी., ओ.बी.सी., मुस्लीम अशी सामाजिक गटनिहाय शिक्षणातील सहभागात खूपच विषमता आहे. मुळातच सर्वच शिक्षण पातळीवर आपला सहभाग सर्वात कमी असून आपण जसजसे प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणाकडे जाऊ तसतसा सहभाग कमी कमी होत असून गळतीचे प्रमाण वाढतच असल्याचे दिसते. मुळातच आपल्या देशात सर्व प्रकारच्या शिक्षणातील सहभाग कमी असून क्षमतेपेक्षा तो खूपच कमी दिसतो. बसंत आणि सेन यांच्या मते, भारताची उच्च शिक्षणातील सहभागाची क्षमता ४०% असून प्रत्यक्ष सहभाग फक्त १०%च आहे. याचा सामाजिक गटनिहाय विचार केल्यास एस. सी.ची क्षमता ४३% असताना प्रत्यक्ष सहभाग फक्त ६% आहे. तर हेच प्रमाण एस.टी.मध्ये अनुक्रमे ३४% आणि ४% आहे. तर ओ. बी. सी. मध्ये ते फक्त ४०% आणि १०% आहे. या बरोबरच मुस्लीम समाजात ते फक्त ४३% आणि ६% च आहे. या सर्व विश्लेषणावरून हे सहज स्पष्ट होते की, छ.शाहू महाराजांचे सामाजिक समावेशक शिक्षणविषयक विचार आणि कृती किती दूरदृष्टीची आणि आजही खूप महत्त्वाची असून त्यांचा स्वीकार करून अंमलबजावणी करणेच त्यांना खऱ्या अर्थाने कृतिशील आणि विनम्र आदरांजली ठरेल.

**छ. शाहू महाराजांच्या सामाजिक समावेशक विकास धोरणाची वर्तमानकालीन उपयुक्तता :**

छ.शाहू महाराजांची आर्थिक सामाजिक विकासाची नीती त्यांच्या काळात जेवढी महत्त्वाची आणि उपयुक्त होती त्यापेक्षा तिला आज अधिक महत्त्व असून तिची आज खूपच गरज निर्माण झाली आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे शेतीची राज्यात आणि देशातही स्थिती फारशी चांगली नाही. ती आजही मान्सूनवरील जुगार असून तिचे एकूण विकासातील महत्त्व सातत्याने कमी कमी होत आहे. त्यासाठी छ. शाहूंचे शेती विकास धोरण आज खूपच महत्त्वाचे आहे. तसेच उद्योग विकासाची स्थितीही देशात आणि राज्यात समाधानकारक नाही. त्यासाठी छ. शाहू महाराजांनी जे प्रयोग उद्योग विकासासाठी केले त्यांची आज अत्यंत गरज आहे. शिक्षण आणि प्रामुख्याने उच्च शिक्षण राज्यात आणि देशात फारसे समाधानकारक नाही. शिक्षणावरील सरकारचा खर्च कमी असून तो जवळपास स्थिरच आहे. तसेच शिक्षणाच्या खाजगीकरणातून अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन सामाजिक सेवा असा न राहता खाजगी आणि विक्रीयोग्य वस्तू असा झाला आहे, त्यातून सामाजिक वंचित आणि वर्जन शिक्षण व्यवस्था निर्माण झाली आहे. एस. सी., एस. टी., इतर मागास आणि स्त्रियांमधील आणि ग्रामीण शहरी अशीही खूप विषमता निर्माण झाली आहे. तसेच देशात आर्थिक विषमता टोकाला पोहचली असून तिचे नियंत्रण करणे कठीण असताना तसा कोणताही प्रयत्न आज होत नसल्याचे दिसते. एका अहवालाप्रमाणे, २०१८ मध्ये भारतात १% लोकांकडे ७३% संपत्तीचे केंद्रीकरण झाले आहे. देशाचा जगात

आफ्रिकेनंतर विषमतेत दुसरा क्रमांक लागतो. तर महाराष्ट्र देशात आर्थिक विषमतेत पहिल्या क्रमांकावर आहे. आरोग्य सेवांची स्थिती फारशी समाधानकारक नाही. वैद्यकीय शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे ते शिक्षण घेणे कठीण होत असतानाच वैद्यकीय सेवाही अत्यंत महाग होत असून उपलब्ध करणे जिकिरीचे होत चालले आहे. आज जवळपास ५०% गरोदर स्त्रियांमध्ये कमी रक्ताची समस्या निर्माण झाली आहे. ४०% बाळंतपणे आजही घरातच होत असून ते अत्यंत धोक्याचे आहे. गरिबी, आर्थिक विषमता, बेकारी, भेदजन्य वागणूक आणि वर्जनता आजही आपणास आढळून येते. सामाजिक वंचितता, अन्याय, अत्याचार, आत्महत्या, अंधश्रद्धा वाढत असून धर्म आणि रूढी, परंपरांचे प्रमाण आणि प्राबल्य वाढत आहे. ही देशातील आणि राज्यातील सामाजिक आणि आर्थिक स्थिती पाहिल्यास आज छ. शाहू महाराजांचे सामाजिक समावेशक विचार आणि नीती व कृती अत्यंत आवश्यक आणि महत्त्वाची आहे असे वाटते. त्यांचा स्वीकार राज्य आणि केंद्र सरकारने आपल्या विकास धोरणात आज ताबडतोड अंतर्भाव करून त्याची प्रामाणिकपणे अंमलबजावणी करणे अत्यंत गरजेचे आहे असे वाटते. तसे केल्यास तीच खऱ्या अर्थाने छ. शाहू महाराजांना खरी आणि विनम्र आदरांजली ठरेल असे वाटते.

**समारोप:** ( Concluding Remarks)

आज भारतात आणि महाराष्ट्रात अनेक शिक्षण आणि विकासविषयक समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते. छ. शाहू महाराज यांनी अनेक सामाजिक समावेशक शिक्षण आणि विकासविषयक विचार, धोरण सांगितले असून त्यासाठी आवश्यक उपायांची कृतीही केली आहे. त्यांचे हे विचार आणि कृती जरी १०० वर्षांपूर्वीची असली तरी तो आजही तेवढीच किंबहुना त्यापेक्षा ही अधिक महत्त्वाची आज आहे. त्यामुळेच त्यांचे सामाजिक समावेशक शिक्षणविषयक आणि विकासविषयक विचार, धोरण आणि कृती समजावून घेऊन आपल्या देशाच्या आणि राज्याच्या विकासात धोरणात समाविष्ट करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय आपला समावेशक विकास होणेच शक्य नाही. म्हणूनच देशातील सरकार आणि धोरणकर्त्यांनी हा विचार आणि कृती समजावून घ्यावी आणि त्यांची ताबडतोड अंमलबजावणी करावी. तीच खऱ्या अर्थाने छ. शाहू महाराज यांना विनम्र आदरांजली ठरेल.

**संदर्भ सूची :**


1. Altbach, Philip G., Liz Reisberg and Laura E Rumbley(2009): Trends in Global Higher Education : Tracking an Academic Revolution, report preparedfor the UNESCO 2009 World Conferenceon Higher Education, Paris, available at http://www.uis.unesco.org/Library/Documents/trends global-higher-education-2009-world-conference-en.pdf.
2. Anjum and Tiwari (2012). An exploratory study of supply side issues in indian higher education, asia pacific journal of marketing and management review vol.1 issue 1, september 2012, issn 2319-2836, pp 15-24.
3. Basant and Sen (2014). Access to Higher Education in India: An Exploration of Its Antecedents, December 20, 2014 vol xlix no 38 51 , Economic Political Weekly, Mumbai, pp38-45.
4. Basu, Sambit (2012): Private Sector in Education:An Overview in IDFC Foundation (ed.), India Infrastructure Report 2012: Private Sector in Education (New Delhi: Routlege for IDFC Foundation), xxiii-xxxviii.

5. Bok, Derek (2003): Universities in the Market place:The Commercialization of Higher Education (Princeton: Princeton University Press).
6. Bok, Derek (2013): Higher Education in America (Princeton:Princeton University Press).
7. Bortolotti, Bernardo and Enrico Perotti (2007):From Government to Regulatory Governance:Privatization and the Residual Role of the State,World Bank Research Observer, 22(1): 53-66.
8. Gieger, Robert L (1987): Private Sectors in Higher Education (Ann Arbor: University of Michigan Press).
9. Goswami, Amlanjyoti (2012): Higher Education Law and Privately-Funded University Educationin India in IDFC Foundation (ed.), India Infrastructure Report 2012: Private Sector in Education (New Delhi: Routlege for IDFC Foundation), 185-98.
10. Government of India (2018) , Economic Survey of India, Ministry of Finance, New Delhi.
11. Government of Maharashtra (2017) , Economic Survey of India, Ministry of Finance, Mumbai.
12. Jadhav Ramesh (2002), Lokraja Shahu Chhatrapati, Suresh Agencies, Pune .
13. Jadhav Ramesh (2013), Lokraja Shahu Maharaj, National Book Trust, India, New Delhi.
14. Jadhav Ramesh (2016 ), Rajarshi Shahu Gourav Granth, Government of Maharashtra, Mumbai.
15. Kamerman, S and A Kahn, ed. (1989): Privatization and the Welfare State (Princeton, NJ: Princeton University Press).
16. Patel Sujata (2004). Higher Education at the Cross Roads, Economic Political Weekly (EPW), Special Articles, May 22, 2004, Mumbai, pp1-6.
17. Sangave Vilas (2012), Rajarshi Shahu Chhatrapati Papers, Volume III, Shivaji University, Kolhapur.
18. Tilak B. G. (2008). Education in 2008-09 Union Budget, Economic Political Weekly, EPW May 17, 2008, Mumbai, pp49-56.
19. Tilak B. G. (2010). A Weak Attempt to Curb Unfair Practices in Higher Education, Economic Political Weekly EPW Mumbai, September 18, 2010 vol xlv no, pp19-22.
20. Tilak B. G. (2011). Education for Profit, Economic Political Weekly EPW February 26, 2011 vol xlvi no 9, Mumbai, pp 18-19.
21. Tilak B. G. (2014). Private Higher Education in India, Economic Political Weekly October 4, 2014 Vol xlix 32 no 40, Mumbai, pp 32-38.
22. Upadhyay, Sugeeta (2007).Wastage in Indian Higher Education, Economic and Political Weekly January 13, 2007, Mumbai, pp161-68.
23. Ved,Prakash, (2007). Trends in Growth and Financing ofHigher Education in India, Economic and Political Weekly August 4, 2007 , Mumbai. pp3249-3258.

◆

# भारतातील बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची सुवर्ण महोत्सवी ५० वर्षे

**गजानन भा. पाटील †**

देशाच्या अर्थव्यवस्थेला कलाटणी देणाऱ्या बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या निर्णयाला १९ जुलै, २०१९ रोजी ५० वर्षे पूर्ण झाली. सध्याची तरुण पिढी, सेवानिवृत्त कर्मचारी यांचा अपवाद वगळता सुवर्ण महोत्सव किंवा वर्धापन दिन साजरा केल्याचे दिसत नाही. नवी पिढी तर राष्ट्रीयीकरण हा दिवस बँक राष्ट्रीयीकरण असल्याचा दिवस आहे, हे विसरल्याचे चित्र दिसत आहे. बँकिंग क्षेत्राच्या इतिहासात या घटनेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. राष्ट्रीयीकरणानंतर देशातील बँकिंग व्यवसायाचा चेहरामोहरा बदलला. बँकिंग सेवा सामान्यांच्या आवाक्यात येण्यासाठीही राष्ट्रीयीकरणाचा मोठा उपयोग झाला होता. पूर्णपणे देशहिताचा विचार नजरेसमोर ठेवून ५० वर्षांपूर्वी हा धाडसी निर्णय घेण्यात आला. या काळात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. आजच्या स्थितीला राष्ट्रीयीकृत बँकांना टीकेला सामोरे जावे लागत आहे, त्यांच्या व्यावसायिक क्षमतांविषयी संशय घेण्यात येत असून, या बँका सध्या आरोपीच्या पिंजऱ्यात आहेत. बँकिंग हा कर्ज देण्याचा व्यवसाय असल्यामुळे कर्जे थकीत होणे हा व्यवसायाचा भागच आहे. त्याचे प्रमाण किमान असावे, हा आदर्शवाद आहे. कोणाच्या तरी आदेशाचे कोणाला तरी उपयुक्त करण्यासाठी दिलेल्या कर्जामुळे या बँकांची अशी स्थिती झाली आहे.

स्वातंत्र्यानंतर बँकांनीही चांगली कामगिरी केली असली तरी राष्ट्रीय स्कंध विपणी (NSE) १.६७ % इतक्या बँकिंग सेवांमध्ये केवळ काही मोजक्या श्रीमंत आणि मध्यवर्गीय शहरी कुटुंबांना प्रवेश उपलब्ध होता. परंतु सरकारला असे वाटले की, बँकिंगचा प्रसार व्हावा आणि श्रीमंत आणि गरीब दोघांनाही यात प्रवेश मिळविला पाहिजे. विकासासाठी आणि सरकारी कार्यक्रमांची पोहोच वाढविण्यासाठी बँकिंग आवश्यक होते. म्हणूनच बँक राष्ट्रीयीकरण हा एकमेव पर्याय म्हणून पाहिले गेले. जेव्हा बँकेचे राष्ट्रीयीकरण सार्वजनिकपणे चर्चेत नव्हते. परंतु तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या अधिवेशनात या विषयावरील एका पेपरच्या सादरीकरणाद्वारे आपले हेतू स्पष्ट केले. बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा अध्यादेश काढण्याच्या अवघ्या एक आठवड्यापूर्वी इंदिरा गांधी यांनी १२ जुलै,

† प्राध्यापक व विभागप्रमुख, अर्थशास्त्र विभाग, मनोहरराव कामडी महाविद्यालय, महाल, नागपूर.
आजीव सभासद क्र. १७८८, भ्रमणध्वनी : ९८२३११४९९५, ई-मेल : gajananpatil1971@gmail.com

१९६९ रोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या बंगळुरू येथील अधिवेशनात आपल्या भाषणात जोरदारपणे बाजू मांडली. काही विचारविनिमयानंतर, सरकारने बँकिंग कंपन्या (अधिग्रहण व हस्तांतरण) अध्यादेश -१९६९ पारित केला, ज्यामुळे बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचे अधिकार दिले.

बँकांच्या राष्ट्रीयीकरणासाठी खालील कारणे जबाबदार होती-

(१) सामाजिक कल्याण. (२) खासगी मक्तेदारी नियंत्रित करणे. (३) ग्रामीण भागात बँकिंगचा विस्तार करणे. (४) शहरी-ग्रामीण विभाजन रोखण्यासाठी प्रादेशिक असंतुलन कमी करणे. (५) अग्रक्रम असलेल्या क्षेत्रांना कर्ज देणे. (६) बचतीची गतिशीलता वाढविणे.

इंदिरा गांधी यांच्या बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या प्रक्रियेत तीन लोकांचा सहभाग होता, त्यात पंतप्रधानांचे प्रधान सचिव, भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर आणि कनिष्ठ कर्मचारी. आरबीआयच्या गव्हर्नरला देखील यापासून अलिप्त ठेवण्यात आले होते. यावरून असा एक प्रश्न निर्माण होतो तो म्हणजे बँकेच्या राष्ट्रीयीकरणामागे काही राजकारण होते काय? किंवा इतर कारणे देखील होते. दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक बँका कोलमडून पडल्यात, कारण त्या सट्टेबाजीसाठी काम करीत होत्या. तेव्हा आरबीआयला जवळपास ३०० बँकांवर नियंत्रण आणि पर्यवेक्षण करणे कठीण जात होते. त्यातील बहुतेक बँका व्यापारास वित्तपुरवठा आणि उद्योग व शेती क्षेत्राला आधार देण्यास तयार नव्हत्या. १९६० मध्ये पलाई सेंट्रल बँक आणि लक्ष्मी कमर्शियल बँक बंद पडल्या. आरबीआयने अशा बँका बंद करून त्यांचे विलीनीकरण केले. त्यामुळे सरकारने १९६० मध्ये बँकांची संख्या ३२८ वरून १९६५ मध्ये ९४ वर आणली. राष्ट्रीयीकरणानंतर १९९३ मध्ये पंजाब नॅशनल बँकेबरोबर नवीन बँक ऑफ इंडियाचे एकदाच विलीनीकरण केले.

१९९० मध्ये नवीन खाजगी बँकांच्या पहिल्या गटासोबत सर्वप्रथम सरकारी मालकीच्या बँकांना प्रतिस्पर्ध्याचा सामना करावा लागला. खाजगी बँकांना जनतेकडून पैसे उभे करण्याची परवानगी देऊन सरकारने त्यांच्या मालकांना जबाबदारी दिली आणि त्यांना स्पर्धात्मक व तंत्रज्ञानाविषयी जाणकार बनविण्याचा प्रयत्न केला, हे एक नवीन पाऊल चांगले होते. परंतु दोन्हीमुळे गंभीर समस्या निर्माण झाल्या.

तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी 'गरिबी हटाव' या कार्यक्रमाचा भाग म्हणून १९ जुलै, १९६९च्या मध्यरात्रीपासून एक वटहुकूम काढून ज्या बँकेच्या ठेवी ५० कोटीच्या जवळपास आहे, अशा देशातील १४ सर्वात मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. राष्ट्रीयीकरण करणाऱ्या अध्यादेशाला न्यायालयात आव्हान देण्यात आले तर काही मुद्यांवर अंतरिम स्थगिती देण्यात आली. परंतु नंतर सर्वोच्च न्यायालयात ११ न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर सर्व रस्त्यांतील अडथळे मोकळी झाली. तेव्हा स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) आणि त्यांच्या सहकारी बँकांसह या बँकांच्या गटांचा त्यावेळी उद्योगांच्या ठेवींमध्ये ८५% वाटा होता. नंतर १९८० मध्ये बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची दुसरी फेरी ज्यामध्ये २०० कोटी रुपयांपेक्षा जास्त ठेवी असणाऱ्या आणखी ६ बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर बँकिंग उद्योगाच्या जवळपास ९०% बँकांवर सरकारचे नियंत्रण आहे.

आरबीआयचे माजी राज्यपाल सी.रंगराजन म्हणाले, ''१९६९ मध्ये बँकांचे राष्ट्रीयीकरण केवळ आर्थिक निर्णयच नव्हे तर त्यात राजकारणही होते.'' आज प्रश्न येतो की आम्हाला किती सरकारी बँका हव्या आहेत. प्रश्न असा आहे की सरकारची बँकांची

हिस्सेदारी ५१ टक्क्यांहून कमी असली पाहिजे. १९६० ची बँकांचे राष्ट्रीयीकरण ही सरकारची एक मोठी पायरी होती. ज्यामध्ये बँका विस्तारित झाल्या. १९९० मध्ये बँकिंग सुधारणेने प्रभावी बँकिंग प्रणाली तयार करण्यास मदत केली. बँकांचे राष्ट्रीयीकरण हे बँकांना ग्रामीण भागात आणि नवीन भागात पोहचविण्यात मदत करते. त्यामुळे १९९१ मध्ये बँकिंग सुधारणेने बँकाना स्थिरता दिली

पूर्वी १ जुलै, १९५५ रोजी देशातील सर्वात मोठी बँक, भारतीय वैधानिक बँका राष्ट्रीयकृत झाली होती. या व्यतिरिक्त अन्य बँक ज्यांची समस्त भांडवल भारतीय स्टेट बँकेजवळ होते, त्यांना भारतीय स्टेट बँकेच्या सहयोगी बँका मानण्यात आल्या. समस्त सहयोगी बँका व भारतीय महिला बँकेचे ३० एप्रिल, २०१७ ला भारतीय स्टेट बँकेत पूर्णपणे विलीनीकरण झाले आहे. देशात या सर्वात मोठ्या बँकिंग विलीनीकरणामुळे भारतीय स्टेट बँकेचा जगातील ५० मोठ्या बँकेच्या ओळीत समावेश झाला.

एसबीआय, देशातील सर्वात मोठे कर्ज वितरण करणारी सरकारच्या मालकीची बँक आहे. परंतु पत कायद्याच्या अंतर्गत २० खाजगी बँकांना पतपुरवठा वाढविण्याच्या दृष्टीने या कायद्यांतर्गत आणलेले नाही. १९६९ ला वाणिज्य बँकाची संख्या ७३ (प्रादेशिक ग्रामीण बँका सोडून) असून त्यांची संख्या अलीकडे ९१ झालेली आहे. बँकांच्या शाखांची संख्या ८२६२ वरून १४१७५६ पर्यंत वाढ झालेली आहे. अर्ध-शहरी शाखांचा वाटा ४० टक्क्यांवरून घसरून २७.५ टक्क्यांपर्यंत खाली आला (म्हणजे ३२२३ ते ९०६३) तर शहरी भागात १४४७ ते २५४०८ शाखा आणि महानगर शाखांमध्ये १६६१ ते २७११४ शाखांची संख्या आहे.

देशात सर्वांना बँकिंग सेवा उपलब्ध व्हावी. शेती-उद्योगांना वेळेवर कर्जे मिळावीत, आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे आणि बँकांतील निधीचा विकासासाठी वापर या उद्देशाने बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले होते. या निर्णयानंतर देशातील बँकिंग व्यवस्थेत मोठ्या स्वरूपाचे बदल झाले. राष्ट्रीयीकरणानंतर मोठ्या प्रमाणावर बँकाचा, शाखांचा विस्तार झाला. ठेवी-कर्जे इत्यादी व्यवहारात वाढ झाली. शेती, लघुउद्योग, व्यावसायिक, बलुतेदार अशा अग्रकम क्षेत्रांतील कर्जदारांना प्राधान्याने कर्जे मिळू लागली. खेड्यापाड्यातील शाखांमुळे घरात असलेली बचत बँकेत आली. सामान्यांना बँकिंग सेवा सहजपणे मिळू लागल्या. म्हणून राष्ट्रीयीकरणानंतर कालखंडाला 'क्लासेस टू मासेस' असे म्हटले जाते. शासकीय कर्ज योजना राष्ट्रीयीकृत बँकांमार्फत राबविल्या जाऊ लागल्या. जनतेला दारिद्र्यरेषेच्या वर आणण्यासाठी प्रयत्न बँकांच्या योजनामार्फत सुरू झाले. सामाजिक स्वरूपाचे म्हणता येईल, असा हा कारभार दोन दशके सुरू होता. देशात १९९० नंतर उदारीकरणाचे वारे वाहू लागले. बँकिंग क्षेत्र त्याला अपवाद नव्हते. १९९० च्या दशकापर्यंत भारतीय अर्थव्यवस्था सरासरी वाढीच्या दराने सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची (PSB) मालमत्ता जवळपास ४% ने वाढली. नरसिंहम समितीच्या शिफारसी स्वीकारल्यानंतर, बँकिंगचा चेहरामोहरा बदलला. या समितीच्या शिफारसीत प्रामुख्याने व्याजदरात स्वायत्तता, हिशेब पद्धतीत बदल आणि एनपीए (NPA) संकल्पनेचा जन्म, खाजगी बँकांचा मुक्तप्रवेश आणि त्यांच्या परिचालन कार्यक्षमतेसाठी व्यापक संगणकीकरण या मुद्यांचा समावेश होता. व्याजदरातील स्वायत्ततेमुळे बँकांना स्वतःचा व्याजदर हे कर्ज आणि ठेवींसाठी ठरविण्याचे स्वातंत्र्य मिळाले, यापूर्वी हा निर्णय रिझर्व्ह बँक घेत असे. वसूल झालेले व्याज आणि हप्ते फक्त हिशेबात

धरायचे, थकीत कर्जावर व्याजाची तरतूद करायची आणि कर्ज थकले तर त्यावर व्याज आकारावयाचे नाही. अशी नवीन हिशोब पद्धती अस्तित्वात आली. उत्पन्न वसूल झाले तरच मान्यता (Income Recognition), सर्व कर्ज व्यवहाराचे वर्गीकरण (Assets Classifiction) आणि तरतूद (Provision) अशा त्रिसूत्रीने एनपीएसाठी नियम आणले गेले. सुरुवातीला त्याचा त्रास झाला. अगदी बँका तोट्यात जाण्याची वेळ आली. त्यामुळे हळूहळू बँकांनी ही पद्धत आत्मसात केली. राष्ट्रीयीकृत बँकाही त्याला अपवाद नव्हत्या.

खाजगी बँकांना नव्याने मान्यता देण्यात आल्यामुळे, या नवीन पिढीच्या बँका नवे तंत्रज्ञान घेऊनच आल्या. ठेवी कर्जाच्या योजना ग्राहकाभिमुख झाल्या. घरपोच सेवा, झटपट कर्जे, परिणामी संगणकीय सेवांचे युग सुरू झाले. स्पर्धेमुळे राष्ट्रीयीकृत बँकांनीही स्वतःत बदल करावा लागला. संगणीकरणाला कामगार संघटनांचा विरोध होता. कारण कर्मचाऱ्यांची वये जास्त होती. या प्रतिकूलतेतून राष्ट्रीयीकृत बँकांना मार्ग काढावाच लागला, खासगी बँकांच्या स्पर्धेमुळे राष्ट्रीयीकृत बँकांना बदलावे लागले.

३ सप्टेंबर, २०१३ ते ३ सप्टेंबर, २०१६ या काळात रघुराम राजन हे रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी होते. राष्ट्रीयीकृत बँकांच्या थकीत कर्जाबाबत त्यांची तीव्र स्वरूपाची मते होती. मार्च २०१५ पर्यंत खरे एनपीए बँकांनी जाहीर करावेत, या त्यांच्या सूचनेनंतर एनपीएचे आकडे जाहीर झाले. पूर्वी न दाखविलेली एनपीए पटलावर आल्याने एनपीएच्या आकड्यांचा डोंगर उभा राहिला. सर्व देशात आर्थिक क्षेत्रात फक्त बँकांचा एनपीए या एकाच विषयावर चर्चा सुरू झाल्या. राष्ट्रीयीकृत बँकांनी दिलेली आणि थकलेली बहुतेक कर्जे कोणाच्या तरी आदेशावरून दिलेली होती, ज्या क्षेत्रात खाजगी बँका कर्ज देत नव्हत्या, अशा पॉवर प्रोजेक्टसाठी कर्ज देण्याच्या सूचना राष्ट्रीयीकृत बँकांना तत्कालीन सरकारकडूनच होत्या. मात्र कर्जे थकल्यावर त्याचे खापर बँकांवर फोडण्यात आले.

राष्ट्रीयीकृत बँकांच्या ग्रॉस आणि नेट एनपीएची आकडेवारीचा विचार केला तर २०१५ नंतर त्यात वाढ झालेली दिसते आहे, तथापि मार्च २०१९ पासून स्थिती सुधारत आहे. आयएफएससी कोड कायदा - २०१६, थकीत कर्जाचे वेळीच वर्गीकरण, रिझर्व्ह बँकेचे कडक नियंत्रण इत्यादीमुळे परिस्थितीत बदल होत आहे. पुढील काही वर्षात स्थिती निश्चितपणे आटोक्यात येईल. या काळातील कडवट अनुभवांनंतर बँकांनी आपल्या कर्ज धोरणात बदल केले आहेत. वसुलीचे प्रयत्न हे सुरुवातीपासूनच होतील, अशी रचना केली आहे. एनपीएच्या आकडेवारीवरून असा अंदाज घेण्यात आला की १२% कर्जे व्यवस्थित आहेत.

राष्ट्रीयीकृत बँकांचा देशभरातील शाखा विस्तार, त्यांची एटीएम यांची संख्या ही एकूण बँकिंग संख्येच्या साधारण ७०% आहे. व्यवसायाच्या बाबतीतही हीच स्थिती आहे. या बँकांवर जनतेचा प्रचंड विश्वास आहे. सरकारी बँकांवरील असे सामान्यांच्या माहितीनुसार असलेल्या राष्ट्रीयीकृत बँकांवरील विश्वास सातत्याने टिकून आहे. राष्ट्रीयीकृत बँकेच्या तुलनेत खाजगी बँकांशी तुलना केल्यास तांत्रिकदृष्ट्या या बँका उत्तम सेवा देत आहेत. खेड्यांमध्ये त्यांच्या शाखा, एटीएम देखील आहेत. या सर्वांचा एकत्रित विचार केल्यास देशातील बँकिंग व्यवसायात राष्ट्रीयीकृत बँकांचा वाटा मोठा असल्याचे दिसून येत आहे.

बँकिंग व्यवस्थेद्वारे सरकार आपल्या विकासाच्या मसुद्याची अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने सरकार अंशतः यशस्वी झाली असली तरी भारतातील अनेकजणांना राष्ट्रीय स्कंध विपणीकडून (National

Stock Exchange/NSE) ०.३६ % इतके देखील अर्थसहाय्य मिळत नाही. अनेक सरकारी बँकांनी तंत्रज्ञानामध्ये प्रतिस्पर्धी असणाऱ्या बँकांचा आढावा घेतला. कारण त्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानासह २५ वर्षांनंतर आलेल्या नवीन खाजगी बँकांशी स्पर्धा करावयाची आहे. उदारीकरणानंतर बँकांवरील सरकारचे नियंत्रण कमी झाले असले तरी सावकार बहुतेक अवैधरित्या कर्ज देऊन भांडवल गोळा करण्याच्या मागे लागले आहेत. सार्वजनिक बँकिंग व्यवस्था मजबूत करण्यासाठी सरकारचे समान मालकीत्व कमी करणे आणि भांडवली गुंतवणूक यावर विचार करणे सुरू केले आहे. बँकांचे राष्ट्रीयीकरणाचे मुख्य कारण म्हणजे मोठा व्यवसाय करण्यासाठी बँकांद्वारे 'क्लास बँकिंग' चे धोरण स्वीकारले गेले. राष्ट्रीयीकीकरणापूर्वी बँक केवळ श्रीमंताना कर्ज आणि अन्य बँकिंगच्या सुविधा प्रदान करत होत्या. सामान्य नागरिक सार्वजनिक बँकेत प्रवेश करण्याची हिंमत करीत नव्हता, त्यांच्यासाठी तर कर्ज व अग्रिम घेणे फार दूरचे स्वप्न होते. अलीकडे कृषी, लघु व मध्यम उद्योग, लहान व्यापाऱ्यांना सरळ अटींवर पतपुरवठ्याच्या सुविधा देणे आणि सार्वजनिक नागरिकांना बँकिंगच्या सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीयीकरण करण्यात आले. राष्ट्रीयीकरणानंतर 'क्लास बँकिंग' यांचे 'मास बँकिंग' मध्ये रूपांतरित करण्यात आले. ग्रामीण क्षेत्रात बँकेच्या शाखांचा अभूतपूर्व विस्तार करण्यात आला.

**राष्ट्रीयीकृत बँक आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँका यातील काय फरक आहे?**

राष्ट्रीयीकरण ही एक केंद्र सरकारच्या सार्वजनिक मालकीचा उपक्रम असून मालमत्ता गोळा करण्याचा एक कायदा आहे. राष्ट्रीयीकरणाचा अर्थ खाजगी मालमत्तेला सार्वजनिक क्षेत्राकडे हस्तांतरित केली जात आहे. ज्यांचा उपयोग राज्यांसाठी मदत म्हणून होऊ शकतो. म्हणूनच आपण असे म्हणू शकतो की राष्ट्रीयकृत बँक आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये कोणताही फरक नाही. खाजगीकरण, राष्ट्रीयीकरणाच्या उलट आहे. ज्या बँकांना पूर्वी खाजगी क्षेत्रात प्रथम राष्ट्रीयीकरणाच्या कार्यापासून सार्वजनिक क्षेत्रात स्थानांतरित केले होते. त्या पहिल्या खाजगी राष्ट्रीयकृत बँकेचे नाव 'इंपीरियल बँक ऑफ इंडिया' (१९५५ च्या एसबीआय ॲक्टअंतर्गत) असे होते.

**बँका सुधारण्यासाठी आणि बँकांना सामान्य लोकांपर्यंत आणण्यासाठी सरकारचे कार्य :**

दुसऱ्या विश्वयुद्धानंतर केंद्रीय बँकांना सरकारच्या अधीन करण्याची कल्पना सर्वप्रथम युरोपमध्ये सुरू झाली. दुसरीकडे १९४९ मध्ये बँक ऑफ इंग्लंडला राष्ट्रीयकृत करण्यात आले. भारतात भारतीय रिझर्व्ह बँकेच्या राष्ट्रीयीकरणाचा विचार सुरू झाला, जे १९४९ ला पूर्ण करण्यात आले. त्यानंतर १९५५ मध्ये इंपीरियल बँक ज्याला नंतर स्टेट बँक ऑफ इंडिया असे संबोधण्यात आले, ती बँक सरकारी बँक झाली आर्थिकदृष्ट्या सरकारला असे वाटले की, व्यावसायिक बँका सामाजिक प्रगत या प्रक्रियेसाठी मदत करीत नाहीत. यावेळी अशी माहिती होती की, १४ मोठ्या बँकेजवळ देशाचे जवळपास ८०% भांडवल होते. यातील जमा ठेवीची रक्कम त्याच क्षेत्रात गुंतवणूक केली जात होती, ज्याठिकाणी नफा मिळण्याची अधिक शक्यता होती. त्याचबरोबर शेती, लघु उद्योग आणि निर्यातीमध्ये गुंतवणूक करण्याचा सरकारचा हेतू होता.

दुसरीकडे भारतातील १९४७ ते १९५५ पर्यंतच्या एका अहवालानुसार ३६० लहान-मोठ्या बँका बुडाल्या होत्या. ज्यात लोकांच्या जमा ठेवीतील लाखो रुपये बुडाले होते. दुसरीकडे काही बँका काळ्या बाजारात तर होर्डिंग व्यवसायात पैसे गुंतवित होते. म्हणूनच सरकारने यांची कमान हातात घेण्याचा निर्णय घेतला

की जेणेकरून या पैशाचा उपयोग सामाजिक विकासाच्या कामात लावता येतील. १९६७ मध्ये जेव्हा इंदिरा गांधी पंतप्रधान बनल्या तेव्हा त्यांची पक्षावर पकड मजबूत नव्हती. तेव्हा लोक त्यांना काँग्रेस सिंडीकेटमधील 'गुंगी गुडिया' म्हणत होते. १९६७ ते १९७३ पर्यंत पी.एन हक्सर काँग्रेस सरकारमधील सर्वात शक्तिशाली व्यक्ती होते आणि यांच्या बाबतीत इंदिरा गांधींना परिपूर्ण माहिती होती.

१९६७ मध्ये इंदिरा गांधींनी काँग्रेस पक्षामध्ये दहा कलमी कार्यक्रम सादर केला. त्यात बँकांवर सरकारचे नियंत्रण, पूर्वीच्या राजे-महाराजांनी मिळविलेले आर्थिक लाभ आणि किमान वेतन निश्चित करण्याचा हा मुख्य मुद्दा होता. इंदिरा गांधींच्या प्रस्तावाला काँग्रेस पक्षाने कोणताही विशेष रस दर्शविला नाही. इंदिरा गांधी नाराज झाल्यात आणि आरपारची लढाई करण्याइतक्या चिडल्या. २४ एप्रिलपासून तर २८ एप्रिल, १९६९ पर्यंत काँग्रेसचे अधिवेशन फरिदाबादमध्ये झाले, ज्यात तत्कालीन काँग्रेसचे अध्यक्ष एस. निज्नलगाप्पा यांनी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा विरोध केला होता. कारण काँग्रेसला संसदेत बहुमत नव्हते आणि डाव्या पक्षाचा फायदा घेत त्याचा पाठिंबा इंदिरा गांधींसोबत बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यासाठी करारावर स्वाक्षरी केली, परिणामी डाव्या पक्षाचे बँकेच्या युनियन संघावर वर्चस्व राहिले.

राष्ट्रीयीकरणानंतर शहरी आणि ग्रामीण बँकांच्या शाखांमध्ये वाढ झाली. सरकारी बँकांना शहरांकडून ग्रामीण भागाकडे नेण्यात आले. बँकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने बँकांमध्ये मोठ्या प्रमाणात पैसा (ठेवी) जमा झाला. परिणामी याचा उपयोग कर्ज वाटण्यासाठी करण्यात आला. ज्यामुळे प्राथमिक क्षेत्र ज्यात लहान उद्योग, कृषी आणि लहान ट्रान्सपोर्ट ऑपरेटर्स यांचा समावेश होता, यांचा फायदा झाला. सरकारने राष्ट्रीय पतसंघाकडे असे दिशानिर्देश दिले की, आपल्या कर्जाच्या पोर्टफोलिओमध्ये ४०% शेतीसाठी कर्ज देण्यात यावे. तर दुसरीकडे त्याच्या लक्ष्य आणि वैयक्तिक नफ्यासाठी डोळे बंद करून पैसा वाटण्यात आला. ज्यामुळे बँकांचा एनपीए (Non-Performing Asset/NPAS) वाढला. आज २०१९ मध्ये सरकारी बँकामधील बुडणारा पैसा कर्ज वितरणाच्या १० टक्क्यांहून अधिक झाला आहे. यामध्ये सर्वात जास्त कर्ज घेणारे लाभार्थी मोठे भांडवलदारच होते.

सरकारने बँकामध्ये सुधारणा करून बँकांना आम जनतेपर्यंत पोहचविण्याचे उत्तम काम केले आहे.

जर एखाद्या सरकारने खरोखरच बँकांच्या सुधारणांचे काम केले असेल आणि जनतेपर्यंत पोहचविले असेल तर ते म्हणजे मोदी सरकारद्वारे झालेले प्रयत्न होय. ४५ वर्षांमध्ये ज्या बँका सामान्य लोकांपर्यंत पोहोचू शकल्या नाही, अशा बँकेत जवळपास ३५ कोटी जनधन खाते उघडून आम जनतेला बँकांशी जोडण्यात आले. शिवाय, नवीन बँकिंग धोरणात बँकांकडून कर्ज घेऊन वापस न करणाऱ्या लोकांवर नवीन आणि कठोर सखोल कायद्याच्या नियमानुसार कर्ज वसुलीची प्रकिया राबविण्यात येत आहे. परंतु अजूनही बऱ्याच बँकिंग व्यवस्थापन धोरणात सुधारणांची आवश्यकता आहे.

इंदिराजींच्या गरिबी हटाव कार्यक्रमापासून तर मोदीजींच्या मुद्रा लोनपर्यंतच्या सर्व योजनांची हाताळणी या बँकांनी उत्साहात केलेली आहे. सर्वात अभूतपूर्व कार्य म्हणजे नोटबंदीच्या ५४ दिवसांत या बँकांनी बँक कारभाराचे योग्य व्यवस्थापन करून दाखविलेले आहे. देशातील कोणत्याही सरकारी यंत्रणा (सेना वगळता) ३६ तासांच्या अधिसूचनेवर असे

काही करू शकत नाही. असे सरकारी क्षेत्रातील बँकांनी करून दाखविले आहे. आज पुन्हा सरकार एक नवीन प्रयोग करण्याचा विचार करीत आहे, ज्यामुळे स्टेट बँकेमधील ७ सहयोगी बँकांचे विलीनीकरण झाले आहे. बँक ऑफ बडोदामध्ये विजया बँक, देना बँकेचे विलीनीकरण झाले आहे आणि उर्वरित बँकांचे विलीनीकरण करण्याच्या तयारीत सरकार आहे. ५० वर्षानंतर सरकार या बँकासोबत नवनवीन प्रयोग करून खाजगीकरणाच्या (Privatisation) दिशेने तर वाटचाल करीत नाही?

इंदिरा गांधी यांची दूरदृष्टी अशी होती की, राष्ट्रातील पैशावर सरकारी नियंत्रण आवश्यक वाटल्याने बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. सरकारने बँकांमधील शेअर्स ५० टक्क्यांपर्यंत नेऊन बँका सरकारी नियंत्रणाखाली आणल्या. लोकांचा पैसा, विविध संस्था, यंत्रणा सर्वसामान्यांचे जीवनमानात मदत करणारा शेतकरी तसेच औद्योगातील जीवनमान उंचवणारा या उदात्त हेतूने राष्ट्रीयीकरण केले. गावा-गावातील शेतकरी मध्यमवर्ग व सर्व स्तरावरील लोकांना उपयोगी पडण्यासाठी वेगवेगळ्या बँकांना शाखा उघडण्यास प्रवृत्त केले.

राष्ट्रीयीकरणानंतर बँकांचे चित्र कसे होते? बँकांच्या शाखेमधील त्यावेळच्या ठेवी, कर्जे या राष्ट्रीयीकरणाच्या वेळी असलेली स्थिती व सध्याची स्थिती यात कितीतरी पटीने वाढ झालेली आहे. विशिष्ट नियमांचे, कायद्यातील पळवाटा, आत्मकेंद्रीत अधिकारी इत्यादींमुळे एनपीएमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. थकीत कर्जांचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणावर आहे. देशातील १२ ग्राहकांकडे कोट्यावधी रुपयांची कर्जे थकीत आहेत. तसेच इतर लोकांमध्ये विशेषतः औद्योगिक क्षेत्रातील लोकांकडून मोठ्या प्रमाणावर कर्जाची थकबाकी आहे. सध्या काही बँकांच्या विलीनीकरणाचा प्रस्ताव सरकारकडे विचाराधीन आहे. बँकांचे विलीनीकरण करण्यापूर्वी एनपीए संदर्भात बँकांनी कर्जे वसुलीसाठी कडक धोरणाचा स्वीकार करावा. वास्तविक पाहता थकीत कर्जाला अनेक कारणे आहेत. त्यामुळे अनेक राष्ट्रीयकृत बँकांचे नफ्यातून तोट्याकडे वर्गीकरण झाले आहे. त्यामुळे अशा बँकांना सुस्थितीत आणण्यासाठी सरकारने आर्थिक पुरवठा करावा. यापेक्षाही महत्त्वाची एक बाब म्हणजे बँकांकडे मागणी न केलेल्या करोडो रुपयांच्या ठेवी बँकेत पडून आहेत. अशा ठेवींच्या रक्कमेला कायद्याच्या चौकटीत बसवून ह्या ठेवी बँकांना कशा वापरता येईल? यासाठी प्रयत्न करावा.

सध्या यांत्रिकीकरणाने मनुष्यबळाचा वापर कमी होत चालला आहे, हे काही अंशी सत्य आहे. परंतु निवृत्ती, स्वेच्छा निवृत्तीमुळे बँकेच्या कार्यप्रणालीतील कर्मचारी कमी झालेत. त्यामुळे बँकांचे व्यवस्थित व्यवस्थापन होत नाही. त्याचा ग्राहक सेवेवर गंभीर परिणाम होत आहे. नवीन भरती करण्याऐवजी 'आऊट सोर्सिंग' यंत्रणेद्वारे काम करून घेण्यावर बँकांचा भर दिसतो. आज अनेक तरुण पिढी नोकरीपासून वंचित आहेत. त्यांना बँकिंगसेवेत समाविष्ट करता येईल का? याचा प्राधान्याने विचार करावा. त्यामुळे बेकारी कमी होण्यास मदत होईल. आऊट सोर्सिंगने किती पगार वाचतो? किंवा किती नफा वाढतो याचा विचार व्हावा. आऊट सोर्सिंगपासून होणारे धोके याकडेही व्यवस्थापनाने गंभीरपूर्वक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. कायमस्वरूपातील कर्मचारी आपली संस्था या नात्याने अधिक जोमाने आणि प्रामाणिकपणे काम करतील. पूर्वी शाखा स्तरावर जमा संग्रह, वसुली विभाग व जागरुकता, एनपीए यांमध्ये सर्वांचाच सहभाग असायचा. त्यामुळे नफ्याचे उद्दिष्ट्य पूर्ण होण्यास मदत व्हायची. म्हणून सरकारने अपवादात्मक

परिस्थिती सोडता आऊट सोर्सिंगला कमीत कमी प्राधान्य द्यावे.

केंद्रातील मोदी सरकारने खासगीकरण, विलीनीकरण न करता राष्ट्रीयकरणाच्या मूळ उद्देशाला चालना मिळेल व बँकिंग क्षेत्र सर्व स्तरावर लोकाभिमुख होईल असे निर्णय घ्यावेत.

आज बहुतेक बँकर्सची अशी सहमती आहे की, राष्ट्रीयीकरण हे बँकेला होणाऱ्या हानीपेक्षा चांगले झाले आहे, तरीही ते एक प्रासंगिक मॉडेल असू शकत नाही. एसबीआयचे माजी अध्यक्ष अरुंधती भट्टाचार्य म्हणाले, ''जर राष्ट्रीयीकरणाचा हेतू देशाच्या सर्वात दूरच्या भागातील नागरिकांपर्यंत पोहोचला तर ते यशस्वी झाले आहे.''

राष्ट्रीयीकृत बँकांवर टीका करण्यापूर्वी या बँकांचे योगदान विचारात घ्यावयास हवे. सरकारची मालकी, धोरणात्मक निर्णयावर सरकारचा परिणाम, दैनंदिन निर्णयावर सरकारचा पूर्वी होणारा हस्तक्षेप, कर्मचारी वर्गाची वये, विलीनीकरणामुळे झालेली स्वेच्छानिवृत्ती या सर्व प्रश्नांना सामोरे जात मागील अर्धशतकात राष्ट्रीयीकृत बँकांची स्थिती चढउताराची राहिली. विश्वासार्हता, सेवाभाव, शाखाविस्तार, स्पर्धा करण्याची जिद्द या सकारात्मक बाजूंचा विचार व्हावा, ५० वर्षे हा दीर्घकाळ असला तरी इतिहास शतकात मोजतात. त्याचा विचार केल्यास पुढील ५० वर्षात राष्ट्रीयीकृत बँका, बँकिंग इतिहासात स्वतःचा ठसा उमटवितात असा विश्वास आहे.

**सारांश :**

५० वर्षांपूर्वी भारतीय वित्तीय क्षेत्र हे एका रचनात्मक परिवर्तनातून गेले. तेव्हा इंदिरा गांधी सरकारने १९६९ मध्ये १४ सर्वात मोठ्या वाणिज्य बँकाचे राष्ट्रीयीकरण केले. अनेक अर्थशास्त्रज्ञाच्या मते, बँकांचे राष्ट्रीयीकरण हा १९४७ नंतर कोणत्याही सरकारद्वारा केलेला सर्वात महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णय होता. या निर्णयाचा प्रभाव काही लोकांद्वारा १९९१ च्या आर्थिक सुधारांपेक्षा अधिक महत्त्वपूर्ण मानण्यात आला होता. त्याकाळात बरेच आशियाई देश बाजाराधिष्ठित धोरणाकडे वळत होते. तर दुसरीकडे काही देशांनी समाजवादी धोरणांचा पाठिंबा दर्शविला होता.

सध्याच्या काळात बँकिंगच्या पेचप्रसंगाच्या संकटानंतर बँकांच्या खासगीकरणाबाबत वादविवाद उपस्थित झाले आहेत. यामुळे प्रथम बँकेचे राष्ट्रीयीकरण करणे योग्य पाऊल होते की नाही हा प्रश्न निर्माण होतो. १९५५ मध्ये विशेषतः ग्रामीण आणि शहरी भागात मोठ्या प्रमाणात व्यापक बँकिंग सुविधांसह इम्पीरियल बँक ऑफ इंडियाचे भारतात राष्ट्रीयीकरण झाले. तेव्हा आरबीआयचे मुख्य एजंट म्हणून काम करण्यासाठी आणि देशभरातील केंद्र व राज्य सरकारचे बँकिंग व्यवहार हाताळण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाची स्थापना केली.

१९ जुलै, १९६९ ला राष्ट्रीयीकरणाच्या प्रमुख प्रकियेला अंतिम स्वरूप देण्यात आले आणि भारतातील १४ प्रमुख वाणिज्य बँकांचे राष्ट्रीयीकरण पहिल्या टप्प्यात करण्यात आले. राष्ट्रीयीकरणाचा भारतीय बँकिंग क्षेत्रातील सुधारणेचा दुसरा टप्पा, १९८० मध्ये ६ बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने देशासाठी नियोजित आर्थिक विकासाचा (Planned Economic Development) अवलंब केला. राष्ट्रीयीकरण हे समाजातील समाजवादी पद्धतीचा अवलंब करण्याच्या राष्ट्रीय धोरणाच्या अनुषंगाने होते. बँकांचे राष्ट्रीयीकरण एक अडचणीच्या दशकाच्या शेवटी आल्याने भारताला अनेक आर्थिक तसेच राजकीय हादरे बसले. १९६२ मध्ये चीन आणि १९६५ मध्ये पाकिस्तान या देशांशी दोन युद्धे झाली, त्याचा सार्वजनिक वित्तीय व्यवस्थेवर

प्रचंड दबाव आला. सततच्या दोन वर्षाच्या दुष्काळामुळे केवळ अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली नाही तर अमेरिकन खाद्यपदार्थावर अवलंबून असल्याने कार्यक्रमामुळे राष्ट्रीय सुरक्षेचीही तडजोड करावी लागली. त्यानंतर सार्वजनिक गुंतवणूक कमी झाली त्यामुळे त्याचा तीन वर्षाच्या वार्षिक योजनेचा सरासरी मागणीवर परिणाम झाला. १९६०-७० दरम्यानचा काळ हा भारतासाठी हालाखीचा होता. कारण आर्थिक वृद्धी ही लोकसंख्येच्या वाढीपेक्षा कमी होती आणि सरासरी उत्पन्न स्थिर होते. वाणिज्य बँकांद्वारा वितरित कर्जात उद्योगांची हिस्सेदारी जवळपास १९५१ आणि १९६८ च्या दरम्यान ३४ % ते ६८ % झाली. जेव्हा की या कालावधीत कृषी क्षेत्रासाठी एकूण कर्जाचे वितरण २% पेक्षा कमी करण्यात आले. अन्नधान्याच्या बाबतीत देशाला स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने भारतातील शेती व्यवसायास हरितक्रांतीच्या प्रारंभासह शेतीला भांडवलाची गरज होती.

बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या शाखांमध्ये ८००% वाढ झाली आणि त्यांच्या अग्रिमात (Advance) ११०००% वाढ झाली. सरकारी मालकीत्वामुळे बँकांवर बँकिंग व्यवहाराबद्दलचा जनतेचा विश्वास बसला आणि दिवसेंदिवस ग्राहक बँकांशी जुळत गेले. याचा परिणाम म्हणून बँकेचा व्यवसाय हा शहरापुरता सीमित नसून ग्रामीण भागात देखील विस्तारित झालेला आहे. थोडक्यात राष्ट्रीयीकरणामुळे विशेषतः हरितक्रांतीला (Green Revolution) अधिक चालना मिळाली. त्यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेची प्रगती झाली. थोडक्यात राष्ट्रीयीकरण हे भारताच्या सर्वांगीण विकासाचे प्रमुख कारण आहे. राष्ट्रीयीकरणाचा प्रमुख हेतू शेती, लघुउद्योग आणि निर्यातीत वेगवान वाढ, नवीन उद्योजकांना प्रोत्साहन करणे आणि सर्व मागासलेला भाग विकसित करणे, हा होता.

१९९१ मधील व्यवहार शेषातील संकटामुळे उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाचे युग सुरू झाले. १९९१ च्या सुधारणानंतर देखील बँक कर्जावर राजकीय नियंत्रण कायम राहिले, ज्यामुळे बुडीत कर्जाचे संकट निर्माण झाले. त्यामुळे भारताच्या विकासाचा वृद्धिदर कमी झाला आहे. बँकिंग व्यवसाय हा एक अत्यंत स्पर्धात्मक उद्योग आहे जो नफा तत्त्वावर चालतो. बँकांचे राष्ट्रीयीकरण केल्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि खाजगी क्षेत्रातील बँका यामध्ये कमी स्पर्धा निर्माण झाल्या आहेत. जबाबदारी आणि पुढाकाराचा अभाव, समस्या सोडविण्यास विलंब इत्यादी ही राष्ट्रीयकृत बँकांची सामान्य वैशिष्ट्ये आहेत. ग्रामीण भागातील दुर्बल घटकांना आर्थिक पाठबळ मिळण्यासाठी उदारमतवादी पतधोरणाची (Liberlised Credit Policy) आवश्यकता असल्यास असे धोरण बँकिंग प्रणालीच्या स्थिरतेसाठी हानीकारक ठरू शकते. राष्ट्रीयकृत बँकांच्या अनुभवावरून असे दिसून आले की या बँकांना अलीकडे जास्त थकीत कर्ज होणार नाही आणि आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य शाखांच्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शेती आणि लघुउद्योगांच्या कर्ज वितरणात वाढ केल्यास त्यापासून कमी मोबदला (नफा) बँकांना मिळू शकतो. अशा प्रकारची कर्जे प्रबळ (सुदृढ) बँकांसाठी (Sound Banking) घातक असल्याने बँकिंग व्यवहारातील आर्थिक व्यवहार्यता कमकुवत होऊ शकते. बँकांच्या कामगिरीचे लेखा परीक्षण नसल्यामुळे, सार्वजनिक संस्थांकडून मिळणारा वित्तपुरवठा मोठ्या जनहितार्थ उत्पादक वापराकडे जात आहे हे सुनिश्चित करण्यात सरकार धोरण ठरविण्यात अपयशी ठरले.

राष्ट्रविकासाच्या कल्पनेत बँकिंग प्रणालीचे महत्त्व

लक्षात घेता बँकांचे खाजगीकरण करण्याचा एक प्रस्ताव आहे. राष्ट्रविकासात बँकांचे खाजगीकरण हा काही एक उपाय नाही. भारताने बँकांच्या खासगीकरणाकडे जाण्याची घाई करू नये. याउलट सर्वंकष शासन सुधारणा, एनपीए बाबतचा प्रस्ताव आणि मुक्त बाजारपेठेवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. जेणेकरून गुंतवणुकीचे पुनरुज्जीवन होऊ शकेल आणि अर्थव्यवस्थेची चाके पुन्हा रूळावर आणता येतील.

**संदर्भ सूची :**


1. Agarwal P. K. and Sinha S. K. (2010). "Financial Performance of microfinance Institution of India" Delhi Business Review - 2
2. Angadi V. B. and Devaray V. J. (1983), "Produectivity and protitability of banks in India", Economic and Political weekly, Vol. 18(48), Nov. 26, 1983.
3. Bidani S. N. (2002), "Managing Non-Performing Assets in Banks" Vision Books Publishing, New Delhi.
4. Chawla A. S. & Others, "Indian Banking Towards 21st Century" Deep & Deep Publications, New Delhi.
5. Garg S. C. (1993), " Indian Banking-Cost & Profitability", Anmol Publication, New Delhi.
6. Ghosh D. N. (1979), "Perfoemance of Public Sector Banks in India An Evaluation", Allied Publication Pvt. Ltd., New Delhi.
7. Government of India (1998), "Report of the committee on banking sector reforms.
8. Gujaral N. S. (2002), "Retal Banking in the changing scenario", Proceeding of the Bank economists conference.
9. Nathwani Nirmal (2004), "The Study of Financial Performance Of Banking Sector of India", Thesis submitted in Saurashtra University Rajkot.
10. Parmar S. J. (2001), "Financial Efficency - Modern Tools and Tevhiques", Raj Book Accounting, Reston Publishing Co. In.
11. Parmatam Parkash Aeya; B. B. Tandon (2003), "Economic Reforms in India, from first to second generation and Beyond, Deep & Deep PP.369.
12. Shekar K. C. (2007), "Banking Theories and Practice", Vikas Publishing House Pvt. Ltd.
13. Swami S. B. & Subrahmanyam G. E. "Comparative Performance of Public Sector Banks In India".
14. Reserve Bank of India (2015), "Social Controls the Nationalisation of Banks and the era of bank expansion - 1968 to 1985", 12th January, 2015.
15. Srivastava, Samirk (2008), "Expansion of banking in India", The Economic Times, 7th June, 2008, P.P.8.
16. Thingalaya N.K. (1985), "Banking Development in India sinc Independence", Print well Publication Jaipur.
17. Reserve Bank of India (2015), "The Adevent of Modern Banking In India: 1720 to 1850's, Retrived 12th January, 2015.


**वेबसाईट**


१) https://www.rbi.org.in

२) https://www.sbi.co.in


◆

**पुस्तक परिचय**

# 'लोकसंख्याशास्त्र' २०१९

**मंजुषा मुसमाडे** †

**लेखक :** अविनाश कुलकर्णी
डायमंड प्रकाशन, पुणे.
ISBN -978-93-86401-70-0
**पृष्ठसंख्या :** १५६, **किं :** २५० रु.

**प्रस्तावना-**

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सभासद आणि 'अर्थसंवाद'चे लेखक अविनाश कुलकर्णी यांनी लोकसंख्याशास्त्र या महत्त्वपूर्ण, आंतरविद्याशाखीय आणि गतिशील व आव्हानात्मक विषयावर प्रस्तुत पुस्तक लिहिले आहे. पुस्तकाला ख्यातनाम अर्थतज्ज्ञ संतोष दास्ताने यांची अतिशय अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभलेली आहे. किंबहुना, प्रस्तावनेतील विचारांच्या पार्श्वभूमीवर पुस्तकाचा अभ्यास करणे अधिक योग्य ठरेल.

प्रस्तावनेमध्ये दास्ताने सरांनी भारतीय लोकसंख्येचे अनेक महत्त्वाचे पैलू मांडले आहेत. ते म्हणतात, भारताच्या लोकसंख्येचे ३०-४० वर्षांपूर्वीचे प्रश्न निराळे होते आणि सध्याचे प्रश्न निराळे आहे. भारतातील जैन आणि पारशी समाजाची घटणारी लोकसंख्या चिंताजनक असून देशातील लोकसंख्येची धार्मिक आणि जातीय वर्गवारी अतिशय संवेदनशील आणि टीकेचा विषय असल्याचेही ते नमूद करतात. साक्षरता आणि विकासाचा सह-संबंध धन असला तरी त्यात देशातील उत्तर-दक्षिण दरी मोठी आहे आणि त्यानुसार मागास राज्ये केंद्राकडून अधिक अनुदान मिळवत असल्याने राज्या-राज्यांतील भेदभावाबाबत गरमागरम चर्चेलाही वाव मिळत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. तसेच, देशातील वाढत्या नागरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचाही ऊहापोह प्रस्तावनेत केलेला आहे. डॉ. दास्ताने असे म्हणतात की, लोकसंख्याशास्त्र ही अशी एकमेव विद्याशाखा आहे, जिथे दोन विरुद्ध टोकांची मते आणि भूमिका हिरिरीने मांडल्या जातात आणि त्यांचे जोरदार समर्थनही केले जाते. उदा. 'लोकसंख्या नियंत्रणाची वेळ आली आहे' आणि 'मोठी लोकसंख्या म्हणजे मोठा कामगार वर्ग आणि बाजारपेठ निर्माण होऊन विकासाला चालना मिळते' असे दोन परस्परविरोधी मतप्रवाह दिसून येतात. प्रत्यक्षात अंतिम सत्य या दोन टोकांच्या मध्ये कोठेतरी दडलेले असते, हे त्यांचे मत विचारात घेतले पाहिजे. लोकसंख्या

† अर्थशास्त्र विभागप्रमुख, नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे.
आजीव सभासद क्र.-९३१.,भ्रमणध्वनी-९८८१३४०७२५, ई मेल- manjushamusmade@gmail.com

आणि सामाजिक न्याय यावरही त्यांचे विचार मननीय आहेत. शिवाय पर्यावरण रक्षणाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केलेले आहे. एकंदरीत, या पुस्तकाच्या प्रस्तावनेत लोकसंख्याशास्त्राचा अभ्यास संख्यात्मक पातळीवर न करता गुणात्मक पद्धतीने करण्याची गरज त्यांनी विशद केली आहे. अशा प्रकारे, संपूर्ण प्रस्तावना म्हणजे पुस्तकाच्या विषयावरील थोडक्यात परंतु परिपूर्ण असे विवेचन आहे.

**पुस्तकाचा सारांश :** प्रस्तावनेतील बहुतेक सर्वच मुद्द्यांवर पुस्तकात स्वतंत्रपणे विवेचन केलेले आहे. सुरुवातीला लेखकाने विषयाचा कार्यकारी सारांश दिला आहे. पुस्तकाची भाषा सुगम आणि वस्तुनिष्ठ आहे. जरूर तेथे अधिकृत सांख्यिकी माहितीचा उपयोग करून साधार विश्लेषण केलेले आहे. पुस्तकात एकूण अकरा प्रकरणे आहेत.

पहिल्या प्रकरणात लोकसंख्याशास्त्राचा अर्थ, व्याख्या, स्वरूप, व्याप्ती अशा प्राथमिक माहिती बरोबरच जननक्षमतेवर परिणाम करणारे घटक, मर्त्यता, स्थलांतर, विभाजन, धोरण, आकार, रचना अशा विविध पैलूंचा आणि लोकसंख्याशास्त्र आणि समाजशास्त्र, मानसशास्त्र, भूगोल, विधी, राज्यशास्त्र, पर्यावरण इत्यादी विषयांचा संबंध स्पष्ट केला आहे. त्याचप्रमाणे, या अभ्यासाची आवश्यकता, महत्त्व आणि काही मूलभूत संकल्पनांचेही स्पष्टीकरण आहे. दुसऱ्या प्रकरणात लोकसंख्याशास्त्राच्या विविध सिद्धांतांचे टीकात्मक मूल्यमापन केले आहे. यात प्रामुख्याने माल्थसचा सिद्धांत, पर्याप्त लोकसंख्येचा सिद्धांत, संक्रमण सिद्धांत, अभिजात आणि नव-अभिजात सिद्धांत तसेच लोकसंख्यावाढ आणि आर्थिक विकासाचा सिद्धांत यांची चर्चा केलेली आहे.

तिसऱ्या प्रकरणात लोकसंख्येची रचना आणि तिच्या अभ्यासाचे विविध पैलू यावर व्यापक विवेचन आहे. चौथ्या प्रकरणात जन्मदर आणि मृत्युदरातील तांत्रिक बाबींचे स्पष्टीकरण आहे. पाचवे प्रकरण लोकसंख्याशास्त्रातील सद्यकालीन निवडक प्रवाहांचे विश्लेषण करते. सहावे प्रकरण स्थलांतर आणि नागरीकरण या अतिशय गुंतागुंतीच्या बाबींचे विवेचन करते. सातवे प्रकरण पर्यावरण आणि लोकसंख्या यातील संबंधांचा चिकित्सक आढावा घेते. आठव्या प्रकरणात लोकसंख्याविषयक माहितीच्या स्रोतांची चर्चा असून, नववे प्रकरण भारतातील लोकसंख्या धोरणावर प्रकाश टाकते. दहाव्या प्रकरणात विशेषकरून, भारतातील अलीकडेच जाहीर केलेल्या माता-आरोग्य आणि बालकल्याण धोरणाचा आढावा घेतला आहे. शेवटच्या प्रकरणात लोकसंख्या शिक्षणाची आवश्यकता आणि महत्त्व विशद केलेले आहे. पुस्तकाच्या शेवटी संदर्भसूची आहे. यात इंटरनेटवरील अनेक संकेतस्थळांचाही समावेश आहे.

**समारोप :** अर्थशास्त्र तसेच इतर सामाजिक शास्त्राच्या अभ्यासकांना लोकसंख्याशास्त्र या विषयाची शास्त्रशुद्ध ओळख करून देण्याचे काम हे पुस्तक करते. सामाजिक कार्यकर्ते, कामगार नेते, स्वयंसेवी संस्था, लेखक, पत्रकार, संपादक, संशोधक, विश्लेषक, धोरण विश्लेषक, भाष्यकार अशा सर्वांना हा विषय सोप्या पद्धतीने समजून घेण्यासाठी या पुस्तकाचा निश्चितच उपयोग होईल. लोकसंख्या समस्येच्या एकेका पैलूवर कराव्या लागणाऱ्या व्यापक विचार आणि संशोधनाच्या दिशेने जाणारी पहिली पायरी म्हणून या पुस्तकाची दखल घेतली जावी, हे प्रस्तावनेतील मत कोणालाही पटण्यासारखे आहे.

◆

# जागतिक भूक निर्देशांक (Global Hunger Index)

**जे. एफ. पाटील** †

वेस्ट हंगर हिल्फे (जर्मनी) व कस्तर्ब वर्ल्डवाईड (आयरिश) यांनी संयुक्तपणे प्रकाशित केलेला २०१९ चा जागतिक भूक निर्देशांक (Global Hunger Index = GHI) वाचल्यानंतर त्यातील काही शब्द वा शब्दगटासाठी पर्यायी मराठी शब्द मांडणे आवश्यक वाटले. त्यातून खालील काही शब्द तयार झाले. अधिक योग्य पर्यायी शब्द सुचविल्यास त्याचे स्वागतच होईल!

**१) Global Hunger Index**

यासाठी मराठीत 'जागतिक भूक निर्देशांक' (जाभूनि) सुचविलेला आहे. कारण Global या शब्दाचा एक मूळ अर्थ पृथ्वी असा आहे. Global चा अर्थ वैश्विक, सर्वसमावेशक व जागतिक असा तीन प्रकारे होतो. त्यातील सर्वसमावेशक सहजपणे लागू होत नाही. वैश्विक हाही शब्द अयोग्य ठरतो. कारण विश्वाच्या संकल्पनेत सर्व सूर्यमाला व आकाशगंगा (त्याहीपेक्षा अधिक) यांचा समावेश होतो. पृथ्वी हा सूर्यमालेचा, मनुष्यवस्ती असणारा एकच घटक आहे. सामान्य भाषेत World म्हणजे पृथ्वी म्हणजेच जग असा अर्थ घेतला जातो. Index म्हणजे क्रमवारी दाखविणारा निर्देशांक म्हणून Global Hunger Index साठी 'जागतिक भूक निर्देशांक' (जाभूनि) असा शब्दगट वापरला आहे.

यातील Hunger यासाठी मराठीत 'भूक' हा शब्द वापरला आहे. शरीराला/सजीवाला जेव्हा अन्नग्रहणाची तीव्र इच्छा व जाणीव होते व त्यातून कमतरतेच्या यातना वा कळा वा वेदना निर्माण होतात, त्या सर्व अनुभवाला भूक म्हणता येते. Index ला माहितीची क्रमवारी करणारे साधन या अर्थाने 'निर्देशांक' असा शब्द योग्य आहे. तसा वापर किंमत पातळीतील बदल मोजताना 'किंमत निर्देशांक' म्हणून केला जातो. कोणत्याही मापनक्षम संकल्पनेसाठी, उत्पादन, रोजगार, निर्यात, आयात, इ. निर्देशांक हा शब्द वापरणे प्रचलित आहे.

जागतिक भूक निर्देशांकांचे भूकेच्या तीव्रतेप्रमाणे उपासमारीच्या तीव्रतेप्रमाणे, काही ढोबळ गट पडले आहेत. ते -

Low GHI = अल्प भूक निर्देशांक (अल्प जाभूनि)

Moderate GHI= मध्यम भूक निर्देशांक

† माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष व विश्वस्त मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र. : ६२, भ्रमणध्वनी : ९४२२०४६३८२, ई-मेल : jfpatil@rediffmail.com

(मध्यम जाभूनि)

Serious GHI = गंभीर भूक निर्देशांक (गंभीर जाभूनि)

Alarming GHI = भयानक भूक निर्देशांक (भयानक जाभूनि)

Extremely Alarming GHI = अतिभयानक भूक निर्देशांक (अतिभयानक जाभूनि)

जागतिक भूक निर्देशांक (जाभूनि) तयार करताना मुख्यतः पुढील चार घटकांचा विचार केला जातो. त्यासाठी आपण मराठी शब्द पुढीलप्रमाणे दिले आहेत.

१) Under Nourishment = 'न्यून अन्न ग्रहण' आवश्यक उष्णांकापेक्षा कमी अन्न घेणाऱ्या लोकांचे % प्रमाण.

२) Child Wastina= 'बाल-ऱ्हास' ५ वर्षाखालील बालकांमध्ये उंचीच्या दृष्टीने कमी वजन असणाऱ्या बालकांचे % प्रमाण.

३) Child Stwnting= 'बाल कुंठितपणा' ५ वर्षाखालील बालकामध्ये वयाच्या मानाने कमी उंची असणाऱ्या बालकांचे % प्रमाण.

४) Child Mortatily= 'बालमृत्यूचे प्रमाण' ५ वर्षाखालील बालकांचे मृत्यूप्रमाण (अपुरे पोषण व रोगट वातावरण)

वरील एकसाठी उपरोक्त जागतिक संस्था PUN असा, २ साठी CWA, ३ साठी CST व ४ साठी CM असे संक्षेप वापरतात.

याचबरोबर Under Nutrition साठी 'न्यून पोषण' किंवा 'सुप्त भूक' असा शब्द वापरता येईल. अशांच्या अन्नग्रहणामध्ये उष्णांकाबरोबरच प्रथिने, व्हिटॅमिन्स व क्षार (खजिने) कमी असतात.

Malnutrition म्हणजेच 'कुपोषण' असा शब्द वापरला आहे. न्यून अन्नग्रहण तसेच अतिरिक्त अन्नग्रहण असे दोन्ही प्रकार काही रोगांचे कारक असतात. जागतिक भूक निर्देशांकामध्ये वरील सर्व घटक समाविष्ट असतात.

'जाभूनि' चे प्रमाणित सूत्र पुढीलप्रमाणे आहे.

जाभूनि (अ) = C x (PUN / 80) x 100
+ O (CWA / 30) x 100
+ O (CST / 70) x 100
+ C (CM / 35) x 100

सूत्राच्या संपूर्ण माहितीसाठी २०१९ चा Global Hunger Index पाहावा. जो https://www.globalhungerindex.org यावर उपलब्ध आहे.

◆

## निवेदन - अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना आवाहन करण्यात येते की, अर्थसंवादमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखांवर आपण ५० ते १०० शब्दांची आपली प्रतिक्रिया संपादकांकडे पाठवावी. याबरोबरच आपण अर्थशास्त्रीय विनोदी चुटकुले तसेच अर्थशास्त्रीय प्रबोधनात्मक लहान गोष्टी देखील पाठवू शकता. निवडक योग्य प्रतिक्रिया, अर्थशास्त्रीय विनोदांना व प्रबोधनात्मक अर्थशास्त्रीय गोष्टींना अर्थसंवादमधून प्रसिद्धी देण्यात येईल.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# प्रतिक्रिया - 'अर्थसंवाद'

**शि. ना. माने** †

अर्थसंवादच्या जुलै-सप्टेंबर, २०१९ च्या अंकाविषयीची ही एक उपजत (Innate) प्रतिक्रिया आहे. तो अंकातील लेखाविषयीचा शास्त्रोक्त विचारविमर्श किंवा प्रतिवाद नव्हे. कारण त्या प्रतिक्रियेचा अंकातील लेखांविषयी (युक्तिवाद, निष्कर्ष) प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध नाही.

जुन्या आर्थिक समस्या या अंशत: सोडविल्या जातात न जातात इतक्यात नवे आर्थिक प्रश्न उभे राहतात. उदाहरणार्थ, वृद्धी, विकास, भावफुगवटा, विषमता, गरिबी, दहशतवाद, इत्यादी. आज संख्यांकन (Digital) व विदाविज्ञान (Data science) युगात माहितीचा महापूर वाहात आहे. त्याचवेळी ज्ञान (माहिती) व शास्त्र यांच्यातील दरी अपेक्षेप्रमाणे कमी होत नाही. या शोकात्मिकेच्या संदर्भातील लॉर्ड केल्विन यांच्या मूळ इंग्रजी विधानाचा उल्लेख करण्याचा मोह अनावर होतो. मूळ विधान असे : " ... When you can measure what you are speaking about, and express it in numbers, you know something about it, when you cannot measure it, when you can not express it in numbers, your knowledge is of a meagre and unsatisfactory kind ; it may be the beginning of knowledge, but you have scarcely, in your thoughts, advanced to the stage of science." त्याचा मराठी अनुवाद पुढे दिला आहे, ''तुम्ही ज्याविषयी बोलत आहात त्याचे तुम्हाला मापन करणे शक्य असते आणि तुमचे बोलणे आकड्यांत अभिव्यक्त करता, त्याविषयी तुम्हाला काही माहिती असते; तुम्ही ज्यावेळी त्याचे मापन करू शकत नाही, व ते आकड्यांत अभिव्यक्त करू शकत नाही त्यावेळी त्याविषयीचे तुमचे ज्ञान अगदीच तोकडे व असमाधानकारक असते; ती तुमच्या ज्ञानाची सुरुवात असू शकते, परंतु तुम्ही, तुमच्या विचारांच्या संबंधात, क्वचितच शास्त्राच्या पायरीपर्यंत मजल मारलेली असते.'' म्हणजे एका बाजूला माहिती व दुसऱ्या बाजूला प्रयोग व संशोधन यांच्यामध्ये निश्चित सीमारेषा असते आणि त्याचे लेखकाने न चुकता भान ध्यानात ठेवले पाहिजे. अर्थसंवादमधील काही लेखांत ते भान ध्यानात घेतले आहे, ही प्रस्तुत अंकाची जमेची बाजू म्हटली पाहिजे. **अधिकतर सखोल, संशोधनपर लेख प्रसिद्ध होत आहेत, हे शुभसूचक आहे. मध्यंतरी काहीशी खंडित झालेली परंपरा पुन:स्थापित होईल, असा दृढ विश्वास वाटतो.**

काही मोजक्या व दर्जेदार लेखांत अर्थमितीचा

† माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, निवृत्त प्राध्यापक, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा. आजीव सभासद क्र. : १०८, भ्रमणध्वनी : ७७३८३५६७८१

(Econometrics) उपयोग केला आहे. २१ व्या शतकातील विदाविज्ञानाच्या (Data science) युगात ते आवश्यक आहे. माझे अर्थमितीचे आकलन अगदी मर्यादित व तोकडे आहे. परंतु हेही खरे आहे की, गणिताला अज्ञात किंवा गणितातीत असणाऱ्या अनंत व गुंतागुंतीच्या सामाजिक-आर्थिक समस्या परिगणना यंत्र सोडवू शकत नाही. स्वप्नाळू समाजवादातील उत्पादन-घटकांची किंमत निश्चिती व केंद्रीभूत नियोजनातील उभयापत्ति / श्रृंगापत्ति (Dilemma) यांच्या संदर्भात सॅम्युअलसन यांचे हे प्रसिद्ध विधान आहे आणि अर्थशास्त्राची एक शाखा असलेल्या अर्थमितीच्या उदयापासून आजपर्यंत हा गुंतागुंतीचा प्रश्न निरूत्तरित राहीला आहे. किंबहुना, या प्रश्नाविषयीची भल्या-भल्या अर्थशास्त्रज्ञांनी माफीनामादारांची (Apologists) भूमिका पार पाडणे पसंत केले आहे. पुढील उदाहरणाच्या आधाराने ही संदिग्धता स्पष्ट करू. ज्यांचा ठावठिकाणा माहीत नाही तसेच जे जीवन विमा पॉलिसी विकत घेत नाहीत अशा आत्मघातकी दहशतवाद्यांचा अचूक शोध संगणक-चलित उपकरण (Algorithm) कसा करणार? असे प्रश्न करणाऱ्या (Doubters, scaptics) अर्थशास्त्रज्ञांच्या अभ्यासांकडे दुर्लक्ष करणे योग्य नव्हे. समजा, बँकेवर हल्ला करून रोकडीवर डल्ला मारणारी दहशतवाद्यांची एक टोळी कार्यरत आहे. त्यांचा छडा लावण्यासाठी एक विदा वैज्ञानिक प्रतिज्ञा करतो. तो संगणक प्रायोजकांचे (Computer programmers) एक शोधपथक तयार करतो. ते पथक संशयित दहशतवाद्यांच्या उपलब्ध यादीच्या आधारे व संगणक-चलित उपकरणाच्या माध्यमातून विदा संकलनाचे नाजूक काम पूर्ण करतो. त्याची विभागणी पुढीलप्रमाणे :

विदा संकलन केलेल्या व्यक्ती - १,०००
(Data base)

पैकी जास्तीत जास्त संशयास्पद व्यक्ती - ३०
(Highly suspicious)

३० पैकी जवळ जवळ निश्चितपणे दहशतवादी कामांत गुंतलेल्या व्यक्ती - ५
(Almost certainly involved in terrorist activities)

**निष्कर्ष :**

३० पैकी ५ ही संख्या शतप्रतिशत परिपूर्ण नाही. संगणक-चलित उपकरणाच्या तपासातून बरेच दहशतवादी गायब आणि काही निरपराध्यांची दहशतवादी म्हणून चुकीची नोंद. अशाप्रकारे, १०० अपराधी सुटले तरी चालेल; परंतु एका निरपराध्याला शिक्षा होता कामा नये, ह्या न्यायतत्त्वाचे काय? तात्पर्य, संशयित व अपराध यांच्यामधील सामाजिक-आर्थिक दुवे व अनुबंध (Linkages) उघड करणे अशक्य नसले तरी ते कठीण आहे. प्रयोग-प्रमादावर (Trial and error) जोर देणाऱ्या अर्थमितीवरील ही आजची मर्यादा आहे.

गुन्हेगारीशी सहसंबंधित सामाजिक-आर्थिक स्वरूपाचे अमूर्त अनुबंध किंवा दुवे अचूकपणे आकड्यांत मांडणे फार कठीण काम आहे. ही अर्थमितीवरील तथाकथित व सर्वसाधारण स्वरूपाची मर्यादा आहे. कृपया लेखांतील विशिष्ट पद्धतीमीमांसेशी (Methodology) तिचा संबंध जोडू नये. प्रतिक्रिया व प्रतिवाद या दोन भिन्न बाबी आहेत.

अखेरीस, परिभाषेविषयी दोन शब्द. त्याशिवाय ही प्रतिक्रिया पूर्ण होऊ शकत नाही. काही लेख निश्चितच दिशादर्शक लेख (Milestone articles) आहेत. परंतु मूळ इंग्रजी शब्द किंवा संज्ञा यांचे मराठीत रूपांतरण करताना उपयोजित वाक्ये पल्लेदार व परिभाषा दुर्बोध झाली आहेत. अर्थात, आपण ती दुर्बोधता तुर्तास समजून घेऊया.

◆

# मराठी अर्थशास्त्र परिषद
# ४३ वे वार्षिक अधिवेशन २०१९-२० कार्यवाहांचा अहवाल

**आर. बी. भांडवलकर**
कार्यवाह - खजिनदार

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४३वे वार्षिक अधिवेशन दिनांक ३१ ऑक्टोबर आणि १ व २ नोव्हेंबर २०१९ या तीन दिवसांच्या कालावधीमध्ये अभिजीत कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँण्ड सोशल सायन्सेस, सोलापूर या हुतात्मा व ऐतिहासिक नगरीत यशस्वीरित्या संपन्न झाले. प्रा. डॉ. रामदास य. माहोरे, नागपूर हे अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी होते.

**अधिवेशन उद्‌घाटन सोहळा**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४३व्या वार्षिक अधिवेशनाचे उद्‌घाटन गुरुवार दिनांक ३१ ऑक्टोबर २०१९ रोजी खऱ्या अर्थाने भारत स्वातंत्र्य होण्यापूर्वी पहिल्यांदा स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या व हुतात्म्याचे बलिदान देणाऱ्या ऐतिहासिक सोलापूर नगरीतील भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय, पुणे संलग्नित अभिजीत कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड सोशल सायन्सेस, विजापूर रोड, सोलापूर येथे संपन्न झाले. उद्‌घाटक म्हणून डॉ. माणिकराव साळुंखे, कुलगुरू, भारती विद्यापीठ अभिमत विश्व विद्यालय, पुणे उपस्थित होते. उद्‌घाटन सोहळ्याचे अध्यक्ष आणि ४३ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. रामदास माहोरे, अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद हे होते. यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ. मृणालिनी फडणवीस, कुलगुरू, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, डॉ. व्ही. एस. मंगनाळे, स्थानिक कार्याध्यक्ष, प्रा. डॉ. कैलास पाटील, कार्याध्यक्ष, डॉ. रामदास भांडवलकर, कार्यवाह - खजिनदार, डॉ. राहुल शं. म्होपरे, संपादक, अर्थसंवाद उपस्थित होते. उद्‌घाटन सोहळ्याची सुरुवात दीपप्रज्वलन करून झाली. यजमान संस्थेच्या वतीने डॉ. व्ही. एस. मंगनाळे यांनी प्रास्ताविक केले. तर परिषदेच्या वतीने कार्यवाह-खजिनदार डॉ. आर. बी. भांडवलकर यांनी प्रास्ताविक व अहवाल वाचन केले. परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. के. के. पाटील यांनी सुद्धा मनोगत व्यक्त केले. उद्‌घाटक डॉ. माणिकराव साळुंखे यांनी उद्‌घाटनपर भाषणात समाजाच्या सर्व बाजूंचा विकास करायचा असेल तर समाजशास्त्र व विज्ञानाला अर्थशास्त्राची जोड देणे गरजेचे आहे. यापूर्वी या विद्याशाखा एकत्र आल्या नव्हत्या त्या आता एकत्र येण्याची सुरुवात झाल्याची बाब ही निश्चित समाधानकारक आहे. येथेच न थांबता लोकोपयोगी संशोधन करून त्याचा सर्व घटकांतील समाजाला फायदा होण्यासाठी काम करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. प्रमुख अतिथी डॉ. मृणालिणी फडणवीस यांनी नकारात्मक स्वरूपाचा विकास झाल्यामुळे मंदी आली आहे. सध्या रोजगार निर्मिती कमी आहे जो रोजगार आहे तो कंत्राटी पद्धतीवर आहे, असा रोजगार किती दिवस टिकेल हा महत्त्वाचा प्रश्न आहे या बाबीवर संशोधन करणे गरजेचे आहे, असे विचार व्यक्त केले. परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. आर. वाय. माहोरे, नागपूर यांनी 'आरोग्याचे अर्थशास्त्र' या विषयावर अभ्यासपूर्ण अध्यक्षीय भाषण केले. यावेळी यजमान संस्थेच्यावतीने सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

अधिवेशनाच्या निमित्ताने 'अर्थभारती' या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. प्रा.डॉ. जे. एस. इंगळे यांच्या 'गरज सेंद्रिय शेतीची', डॉ.मुकुंद दातार यांच्या 'जलसंधारणाचे अर्थशास्त्र' आणि डॉ. के. बी. दिवटे व डॉ. जे. डी. तलवारे यांच्या 'आधुनिक बँकिंग व वित्तीय प्रणाली' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ऐश्वर्या हिबारे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. प्रितम कोठारी, स्थानिक कार्यवाह यांनी केले.

**चर्चासत्रे :** अधिवेशन काळात एकूण चार चर्चासत्रे संपन्न झाली. दिनांक ३१ ऑक्टोबर २०१९ रोजी भोजनावकाशानंतर दुपारी पहिले सत्र 'महात्मा गांधींच्या आर्थिक विचाराची समर्पकता' या विषयावरील सत्राचे सूत्रसंचालन डॉ.अशोकगीर गोस्वामी यांनी केले. सत्राध्यक्ष प्रा.निवृत्ती पिस्तुलकर आणि वृत्तलेखक म्हणून डॉ. विशाल बेलूरे यांनी जबाबदारी पार पाडली. या चर्चा सत्रामध्ये डॉ. जे. एस. इंगळे, प्रा. प्रवीण डांगे, डॉ. माधुरी लेले, डॉ. अविनाश कुलकर्णी, डॉ.रूपा शहा, प्रा. महादेव पाटील, प्रा. कमलेश विसपुते, प्रा. मधुकर वेदपाठक, प्राचार्य डॉ. पी. ई. विभुते, प्रा. डॉ. डी. डी. भोसले, प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील, डॉ. सुभाष कोंबडे, डॉ. राहुल शं. म्होपरे डॉ. राजश्री रायभोग, डॉ. एस. व्ही. ढमढेरे, डॉ. शर्वरी कुलकर्णी यांनी शोधनिबंध सादर केले. तर खुल्या चर्चेमध्ये डॉ. दि. व्यं. जहागिरदार, डॉ. अविनाश निकम, डॉ. संजय तुपे, डॉ. मोहन चौधरी, डॉ. आबासाहेब कल्याणकर, डॉ. सुभाष दगडे, डॉ. जयश्री कदम इत्यादींनी सहभाग घेतला. दिनांक १ नोव्हेंबर, २०१९ रोजी दुसरे व तिसरे समांतर सत्र सकाळी अल्पोपहारानंतर घेण्यात आले. 'भारतीय शेतीसंबंधी पारित करण्यात आलेल्या कायद्याचे पुनरावलोकन' या विषयावरील सत्राचे सूत्रसंचालन प्राचार्य डॉ. पी. ई. विभुते यांनी सत्राध्यक्ष डॉ. सुभाष कोंबडे तर वृत्तसंकलक म्हणून डॉ. धीरज कदम यांनी जबाबदारी पार पाडली. या चर्चासत्रामध्ये डॉ. विकास सुकाळे, डॉ. लालासाहेब घाटगे, डॉ. समीत माहोरे, प्रा. महेश शेटे, डॉ. पंकज तायडे व डॉ. नीता वाणी यांनी शोधनिबंध सादर केले. तर खुल्या चर्चेमध्ये डॉ. दि. व्यं. जहागिरदार, डॉ. रमेश बिडवाई, डॉ. वनिता चोरे इत्यादींनी सहभाग घेतला. तिसऱ्या 'महाराष्ट्राच्या जडणघडणीत छत्रपती शिवाजी महाराजांचे आर्थिक योगदान' या विषयावरील सत्राचे सूत्रसंचालन डॉ. राजेंद्र बोरसे यांनी केले. सत्राध्यक्ष डॉ. माधव शिंदे आणि वृत्तसंकलक म्हणून डॉ. प्राचार्य आबासाहेब कल्याणकर यांनी कर्तव्य पार पाडले. या चर्चासत्रामध्ये डॉ. एस. एस. सिताफुले, डॉ. सौ. प्राची देशपांडे, डॉ. जयश्री जाधव-कदम, प्रा. सचिन कुंभार, डॉ. रमेश गाढवे, डॉ. विनोद नन्नवरे, डॉ. आर.बी.भांडवलकर यांनी शोधनिबंध सादर केले तर खुल्या चर्चेमध्ये डॉ. जे. एस. इंगळे, डॉ. संतोष कदम, डॉ. सुरेश घुमटकर, डॉ. सुभाष दगडे, डॉ. मारोती तेगमपुरे, डॉ. गणेश मांगडे, डॉ. प्रवीण डांगे, डॉ. संजय तुपे इत्यादी सहभागी झालेत. भोजनावकाशानंतर चौथ्या व ऐनवेळेच्या '१४ व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे अर्थशतक आणि सद्य:स्थिती' या विषयावरील सत्राचे प्रमुख वक्ते प्राचार्य डॉ. मधुकरराव शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. आर. वाय. माहोरे आणि डॉ. के. के. पाटील उपस्थित होते. या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. संतोष कदम यांनी केले. या सत्रामध्ये खुल्या चर्चेत डॉ. के. के. पाटील, डॉ. सूर्यकांत जगदाळे, डॉ. रामचंद्र रसाळ, डॉ. बी. के. कोरे, डॉ. विकास सुकाळे, डॉ. अविनाश निकम, डॉ. मारोती तेगमपुरे, डॉ. सुभाष दगडे, डॉ. मोहन चौधरी, डॉ. माधव शिंदे, डॉ. श्यामराव कुलकर्णी, डॉ. संजय तुपे, डॉ. जयवंत इंगळे, इत्यादींनी सहभाग घेतला. या चारही सत्राचे वेळी परिषदेचे अध्यक्ष डॉ. रामदास माहोरे, डॉ. के. के. पाटील, डॉ. आर. बी. भांडवलकर

आणि स्थानिक कार्यवाह डॉ. प्रितम कोठारी उपस्थित होते.

**प्रा. नी. वि. सोवनी स्मृती व्याख्यान**

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नी. वि. सोवनी स्मृती व्याख्यानाचे दहावे पुष्प दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१९ रोजी सुप्रसिद्ध नाट्य व सिनेकलावंत मा. राहूल सोलापूरकर, पुणे यांनी गुंफले. 'छत्रपती शिवरायांची सुराज्य संकल्पना' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान देताना शिवाजी महाराजांची महत्त्वाची मंत्रालये कशी होती आणि अर्थमंत्रालयातील कामकाजाची माहिती तसेच महाराजांना असणारी माणसांची पारख इत्यादी मुद्द्यांवर सविस्तर संभाषण केले. राज्यकर्त्यांना राज्याची स्थापना करणे सोपे असते; परंतु सुराज्याची स्थापना करणे फार कठीण आहे, जी छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या काळात निर्माण केली अशी विविध उदाहरणे दिलीत. मा. राहूल सोलापूरकर यांचा सत्कार परिषदेच्या वतीने डॉ. रामदास माहोरे यांनी केला. सदर व्याख्यानाचे प्रास्ताविक डॉ. मारोती तेगमपुरे आणि संचालन डॉ. आर. बी. भांडवलकर यांनी केले. या व्याख्यानाचे अध्यक्षस्थान डॉ. आर. वाय. माहोरे यांनी भूषविले. प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ. मृणालिनी फडणवीस व डॉ. व्ही. एस. मंगनाळे उपस्थित होते. आभार डॉ. कैलास पाटील यांनी व्यक्त केले.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४० व्या वार्षिक अधिवेशनापासून परिषदेच्या माजी अध्यक्षांच्या कार्याचा परिचय आणि गौरव व्हावा या उद्देशाने अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी दि. २ नोव्हेंबर २०१९ रोजी प्राचार्य या. शि. महाजन यांचे स्मरणार्थ व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी परिषदेचे अध्यक्ष डॉ. आर. वाय. माहोरे हे होते. प्रमुख वक्ते म्हणून सीए. डॉ. विवेक काटदरे, जळगांव हे होते. व्याख्यानाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ. आर. बी. भांडवलकर यांनी दिला. यावेळी डॉ. के. के. पाटील व डॉ. राहुल शं. म्होपरे उपस्थित होते. प्रमुख वक्ते डॉ. विवेक काटदरे यांनी 'एकात्मिक अर्थशास्त्र' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान केले आणि प्राचार्य या. शि. महाजन यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

**वार्षिक साधारण सभा (आमसभा)**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४३व्या वार्षिक अधिवेशनाच्या निमित्ताने दि. २ नोव्हेंबर २०१९ रोजी दुपारी ०२.०० वा. परिषदेचे अध्यक्ष डॉ. रामदास माहोरे, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक साधारण सभा (आमसभा) अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करून सभेची सुरुवात झाली. वार्षिक साधारण सभेतील काही महत्त्वाचे निर्णय पुढीलप्रमाणे आहेत. ४४ व्या वार्षिक अधिवेशनाचे यजमानपदाकरिता न्यू आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर यांचा एकमेव अर्ज असल्यामुळे त्यांना अनुमती देण्यात आली. ४४ व्या वार्षिक अधिवेशनात चर्चासत्राकरिता कार्यकारिणीने शिफारस केलेल्या विषयावर चर्चा होऊन पुढील तीन विषय निश्चित करण्यात आले.

१) नोबेल पारितोषिक प्राप्त अभिजीत बॅनर्जी यांचे योगदान.

२) भारतामधील वर्तमान दशकातील आर्थिक स्थित्यंतरे.

३) अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील आर्थिक दृष्टिकोन.

४४ व्या वार्षिक अधिवेशनाच्या आणि परिषदेच्या अध्यक्षपदी डॉ. अनिल सुर्यवंशी, बार्शी यांची अविरोध निवड झाली. विश्वस्तपदी डॉ. अजय दरेकर तर कार्यवाह - खजिनदार पदी डॉ. मारोती तेगमपुरे यांची अविरोध निवड झाली. कार्यकारी मंडळ सदस्यपदी डॉ. अरुण दोदू पिसे, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव, डॉ. राजाराम केरबा पाटील, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर

विद्यापीठ, सोलापूर, डॉ. दयाळू किसन राठोड, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, डॉ. सुरेश भास्कर ढाके, एस.एन.डी.टी. विद्यापीठ, डॉ. मनिषकुमार कायरकर, १ ते १० विद्यापीठ वगळता इतर विद्यापीठ गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांची अविरोध निवड झाली. **४३ व्या वार्षिक अधिवेशनाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे मागील साधारणत: २० वर्षात पहिल्यांदाच अध्यक्षांसह सर्व पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य अविरोध निवडून आले. सर्व मान्यवरांचे अभिनंदन करण्यात आले.**

**समारोप सोहळा**

दि. २ नोव्हेंबर, २०१९ रोजी सकाळी ११.०० वा. अधिवेशनाचा समारोप झाला. समारोप सोहळ्याचे अध्यक्ष डॉ.आर. वाय. माहोरे तर प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध उद्योगपती मा.यतीनजी शहा उपस्थित होते. समारोप सोहळ्याचे प्रास्ताविक डॉ.प्रितम कोठारी, स्थानिक कार्यवाह यांनी केले. स्थानिक कार्याध्यक्ष डॉ.व्ही. एस. मंगनाळे व कार्याध्यक्ष डॉ.के. के. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. परिषदेच्या वतीने देण्यात येणाऱ्या पारितोषिक व पुरस्कार तसेच सत्काराचे संचलन डॉ.आर.बी.भांडवलकर-कार्यवाह यांनी केले. प्रतिनिधीच्या वतीने डॉ. अविनाश निकम आणि डॉ. प्राची देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले. अर्थसंवादचे प्रमुख संपादक डॉ. राहुल शं. म्होपरे यांनी देखील अधिवेशनाबाबत आपले मनोगत व्यक्त करून सर्वांचे आभार मानले. समारोपप्रसंगी उपस्थित माजी अध्यक्षांचा आणि कार्यकारी मंडळाचा यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे संचालन ऐश्वर्या हिबारे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.ए. बी.नदाफ यांनी केले. परिषदेच्या वतीने यजमान संस्थेचे डॉ.व्ही. एस. मंगनाळे, डॉ. प्रितम कोठारी आणि डॉ. ए.बी.नदाफ यांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

**परिषदेच्यावतीने विविध पारितोषिके व पुरस्काराचे वितरण:**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या विविध पारितोषिकाचे आणि पुरस्काराचे वितरण प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक (रु.१०००/- आणि सन्मानपत्र) डॉ. प्रशांत हरमरकर, अमरावती यांच्या 'अर्थचिंतन' या ग्रंथाला देण्यात आले.

२) प्रा.मो. स. भावे पारितोषिक (अर्थसंवादमधील सर्वोत्कृष्ट लेखक रु.५००/- आणि सन्मानपत्र) डॉ.संतोष कदम, सोलापूर यांच्या 'सौर शेतीची भारतातील प्रगती व भविष्यकाळ' आणि डॉ. नीता सुधाकर वाणी यांच्या 'ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासातील स्त्री शेतमजुरांचे योगदान व त्यांच्या समस्या एक अध्ययन' या लेखाला विभागून देण्यात आले.

३) प्रा.सौ.अरुणा राराविकर आर्थिक लेख (वृत्तपत्रातील) पुरस्कार (प्रथम रु.१०००/- व सन्मानपत्र) डॉ. प्रमोद लोणारकर यांच्या 'लोकसंख्या लाभांशाचा अभिमान' आणि डॉ. जयश्री कदम-जाधव यांच्या 'कृषकलक्ष्मी' या लेखाला विभागून तर (द्वितीय पुरस्कार रु.५००/-व सन्मानपत्र) डॉ. कृष्णा शहाणे यांच्या 'कांदा बाजारभावाचे नियंत्रण कोणाचे?' या लेखाला देण्यात आले.

४) स्व.प्रा.भास्कर ढाले स्मृती पारितोषिक (संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथून पदव्युत्तर अर्थशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.२०००/- व सन्मानपत्र) कु. अश्विनी पांडूरंगजी भोजने, मोर्शी, जि. अमरावती यांना देण्यात आले.

५) श्रीमती बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक (रु.११०००/- आणि सन्मानपत्र)

डॉ. वनिता चोरे, चांदूरबाजार यांच्या ‘फळ उत्पादनाचे अर्थशास्त्र’ या ग्रंथाला देण्यात आले.

६) डॉ. रविंद्र सबनीस पारितोषिक (रु.४०००/- आणि सन्मानपत्र) डॉ. विजय ककडे, कोल्हापूर यांच्या Financial Inclusion : Challenges Before Indian Economy या लेखाला देण्यात आले.

**अधिवेशन काळात सादरीकरण झालेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास पारितोषिके :**

१) कै. ग. प्र. पिंपरकर पारितोषिक (रु.१०००/-व सन्मानपत्र) डॉ.विकास सुकाळे यांच्या ‘शेतीसंबंधी कालबाह्य कायद्याचा शेतीवरील परिणाम’ आणि डॉ.सुदाम कोरडे यांच्या ‘शिवाजी महाराजांचे आर्थिक धोरण’ यांना विभागून देण्यात आले.

२) प्रा. कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ.अमर्त्यसेन पारितोषिक (रु.५००/- व सन्मानपत्र) प्रा. प्रवीण डांगे व डॉ. विजय पाटील यांच्या संयुक्त ‘गांधीप्रणित सर्वसमावेशक शाश्वत विकासाची साधने’ शोधनिबंधास उत्कृष्ट सादरीकरणास देण्यात आले.

३) डॉ. ज. फा. पाटील पारितोषिक (अधिवेशन काळात विद्यार्थ्यांने सादर केलेला उत्कृष्ट शोधनिबंध (रु.२०००/- व सन्मानपत्र) म.तु.शेटे यांच्या ‘आंतरराष्ट्रीय शेती करार - आव्हाने आणि संधी’ तसेच सचिन कुंभार यांच्या ‘छत्रपती शिवाजी महाराजांचे आर्थिक धोरण’ या शोधनिबंधाला विभागून देण्यात आले.

४) पद्मजा गंधे पारितोषिक महिलाकरिता (रु.१०००/- व सन्मानपत्र) डॉ. प्राची देशपांडे यांच्या ‘स्वराज्याची स्थापना, राज्याभिषेक व कल्याणकारी दृष्टिकोन’ आणि डॉ.राजश्री रायभोग यांच्या ‘महात्मा गांधींच्या विचारातील आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू : व्यक्तीविकास’ या शोधनिबंधास विभागून देण्यात आले.

**ऋणनिर्देश** :

१) तज्ज्ञपरीक्षक

डॉ. विनायक देशपांडे (नागपूर), डॉ. रामचंद्र रसाळ (लोणी प्रवरानगर), डॉ.बी. बी. पावडे (नांदेड), डॉ.रूपा शहा (कोल्हापूर), डॉ.राजेंद्र गव्हाळे (खामगांव), डॉ. दिपक साबळे (ठाणे प.), डॉ.व्ही. बी. ककडे (कोल्हापूर) डॉ. सतिश श्रीवास्तव (नाशिक), डॉ.संतोष दास्ताने (पुणे).

२) सूत्रसंचालक, सत्राध्यक्ष व वृत्तलेखक

प्रा. निवृत्ती पिस्तुलकर (आर्णी), डॉ. अकोशगीर गोस्वामी (भुसावळ), डॉ. विशाल बेलूरे (नांदेड), डॉ.सुभाष कोंबडे (कोल्हापूर), प्राचार्य डॉ. पी.ई.विभुते (उदगीर), डॉ.धीरज कदम (नागपूर), डॉ. माधव शिंदे (अहमदनगर). डॉ.राजेंद्र बोरसे (लोणार), प्राचार्य डॉ. आबासाहेब कल्याणकर (गंगाखेड), प्राचार्य डॉ. मधुकरराव शिंदे (इस्लामपूर) प्रमुख वक्ते आणि डॉ.संतोष कदम (सोलापूर).

३) निवडणूक निर्णय अधिकारी

डॉ. बी. जी. कोरे, डॉ. संतोष कुटे, डॉ. उल्हास माळकर, प्राचार्य डॉ. पी. ई. विभुते, डॉ. एम. यू. मुलाणी, व डॉ. अशोक खाचणे.

यजमान संस्थेचे व्यवस्थापन मंडळ, डॉ.व्ही. एस. मंगनाळे, डॉ.प्रितम कोठारी, डॉ.ए.बी. नदाफ, शिक्षक व शिक्षकेतर सर्व कर्मचारी आणि उपस्थित सन्माननीय प्रतिनिधी या सर्वांच्या ऋणात राहून परिषदेचे ४३ वे वार्षिक अधिवेशन, सोलापूर येथे सर्वार्थाने यशस्वीरित्या संपन्न झाले.

मराठी अर्थशास्त्र परिषद परिवारातील सर्व सदस्यांना नवीन वर्ष २०२० च्या हार्दिक शुभेच्छा! आणि मला आपण केलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद!

आपलाच स्नेहांकित

**कार्यवाह खजिनदार**

# BHARATI VIDYAPEETH, PUNE (INDIA)

(Deemed to be University)

A+ GRADE REACCREDITED BY NAAC

## Abhijit Kadam Institute of Management and Social Sciences, Bijapur Road, Solapur

Year of Establishment 1981

# ADMISSION NOTICE

| Courses after Graduation | Course | Duration | Annual Fees(Rs.) |
|---|---|---|---|
| | M.B.A. | 2 Year | 66,000/- |
| | M.C.A. | 2*/ 3 Years | |

*Only for B.C.A. / B.Sc.(IT) / B.C.S. final year appearing or passed.

| Courses after H.S.C. (12th) or Diploma Engineering | Course | Duration | Annual Fees(Rs.) |
|---|---|---|---|
| | B.B.A | 3 Year | 17,000/- |
| | B.C.A. | 3 Year | 22,000/- |

## SALIENT FEATURES

- Highly Qualified and Dedicated Faculty
- Placement assistance through Centralized Placement Cell
- Well equipped Library and Computer lab
- NSS Cell, Skill Lab, Language Lab
- Book Bank Facilities
- Minority Scholarship available For Muslim, Jain, Christen, as per rule.
- Academic Flexibility through CBCS system
- Foundation Courses Cell - Mathematics, Accounting, English
- Foreign Language (French / German)
- Excellent Facilities on Campus such as Play Ground, Canteen, Bank, Gymkhana Etc.,

## FOR ADMISSION AND OTHER QUERIES PLEASE CONTACT


**DR. V.S. MANGNALE**

Director (M.No. 9561279988)

**For M.B.A & B.B.A.**

**Dr. P.P. Kothari :** M. No. 9923303913

**Dr. A.A. Dhavan :** M. No. 9970565555

**For M.C.A. & B.C.A.**

**Dr. A.B. Nadaf :** M. No. 9422649309

**Prof M.K. Patil :** M. No. 9975269569

**Office: (0217) 2302016/2300548**

www. akim.bharatividyapeeth.edu


